कृपाकरें। आविष्करे सामर्थ्य ॥ २५ ॥ गौरवीले सोयरे सज्जन। म्हणाल उपेक्षिले इतर जन। जो श्रीभागवतीं सावधान। तो परमार्थें जाण गौरवे ॥ २६ ॥ भावार्थासारिखें गौरवण। एका जनार्दन जाणे जाण। एका जनार्दना शरण। आपण्या आपण गौरवी ॥ ६२७ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे एकाकारटीकायां प्रकृतिपुरुषसांख्ययोगो नाम चतुर्विंशतितमोऽध्यायः ॥ २४ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे श्रीकृष्णोद्धवसंवादे चतुर्विंशोऽध्यायः ॥ २४ ॥

अध्याय पंचविसावा.

श्रीगणेशाय नमः ॥ ॥ ॐनमो देव निर्गुण। म्हणों पाहें तंव न देखें गुण। गुणेंवीण निर्गुणपण। सर्वथा जाण घडेना ॥ १ ॥ सर्वथा न घडे निर्गुणपण। तरी घडो नेदिशी सगुणपण। नातळशी गुणागुण। अगुणाचा पूर्ण गुरुराया ॥ २ ॥ अगुणाच्या विपरीत तूं गुणी। करिसी त्रिगुणगुणां झाडणी। पंचभूतांपासूनी। सोडविता जनीं जनार्दनू ॥ ३ ॥ ज्याचेनि जनांसी अर्दन। ज्याचेनि लिंगदेहा मर्दन। जो जीवासी जीवें मारी पूर्ण। तो कृपाळु जनार्दन घडे केवीं ॥ ४ ॥ जनार्दनाचें कृपाळुपण। सर्वथा नेणती जन। नेणावया हेंचि कारण। जे देहाभिमान न सांडिती ॥ ५ ॥ जननीजठरीं जन्म जाण।

सज्जन त्यांचा गौरव करीन. २५ सोयऱ्यासज्जनांचा मात्र सन्मान करून तूं इतर जनांची उपेक्षा केलीस, असें जर म्हणाल तर (तसें नव्हे) जो भागवताचें लक्षपूर्वक श्रवण करील; त्याचा परमार्थानेंच गौरव होईल. २६ भावार्थासारखा गौरव कसा करावा, हें एकनाथ-जनार्दन जाणतो. म्हणून एका जनार्दनाला शरण जाऊन आपला आपणच गौरव करीत आहे. ६२७.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील प्रकृति-पुरुषसांख्ययोगनांवाचा चोविसावा अध्याय समाप्त झाला.

ॐ नमः। देवाला निर्गुण म्हणावें तर गुण कोठेंच दृष्टीस पडत नाहींत आणि गुणांवांचून निर्गुणपणा कधींच संभवत नाहीं. १ याप्रमाणें निर्गुणत्व संभवत नाहीं व सगुणसत्वहि तूं आपल्याकडे लावून घेत नाहींस. हे गुरुराया ! असा तूं पूर्ण गुणरहित आहेस. तूं गुण अगुणांना स्पर्शीहि करीत नाहींस. २ पण अवगुणांच्या विरुद्ध असलेले जे सद्गुण त्यांनीं तूं युक्त आहेस. तूं सत्त्व-रजादि त्रिगुणांना झाडून टाकितोस. पंचभूतांपासून सोडविणारा तूं जनार्दन आहेस. ३ दुष्ट जनांचा नाश करणारा म्हणून जनार्दन, किंवा संसारदुःख भोगावयास लावणाऱ्या लिंगदेहाचा नाश करून जीवाला जीवानेंच पूर्णपणें मारितो म्हणून तो जनार्दन, तेव्हां तो दयाळु आहे हें म्हणणें कसें संभवतें ! ४ लोक जनार्दनाचा दयाळुपणा जाणत नाहींत. ते देहाभिमान सोडीत नाहींत, हेंच त्याला न जाणण्याचें कारण आहे. ५ मनुष्य जननीच्या उदरांतून जन्मतो म्हणून त्याला ‘ जन ’ असें म्हणतात. त्या जनांच्या

त्या जन्मास्तव म्हणती जन । त्या जनजन्मा करी मर्दन । यालागीं जनार्दन नाम त्यासी ॥ ६ ॥ मरण मारूनि वाढवी जिणें । जीव मारुनि जीववणें । हेंही नांदवी विदेहपणें । ऐसी जनार्दनें कृपा कीजे ॥ ७ ॥ निजभावार्थे परिपूर्ण । एकाकी देखूनियां दीन । कृपा करी जनार्दन । कृपाळु पूर्ण दीनांचा ॥ ८ ॥ जे जे भावना भावी जन । ते ते पुरवी जनार्दन । जो मागे परम समाधान । त्याचा देहाभिमान निर्दळी ॥ ९ ॥ हो कां जनार्दनासमोर । कैं आला होता अहंकार । मा तेणें घेऊनियां शस्त्र । करी शतचूर निजांगें ॥ १० ॥ जेवीं सूर्याचेनि उजियेडें । अंधारेंसीं रात्रि उडे । तेवीं जनार्दननामापुढें । अहंकार बापुडें उरे केवीं ॥ ११ ॥ ऐकतां गुरुनामाचा गजरू । समूळ विरे अहंकारू । येथ दुःखदायक संसारू । कैसेनि धीरू धरील ॥ १२ ॥ ज्याचें नाम स्मरतां आवडीं । संसारबांदवडी फोडी । जीवाचे जीवबंध सोडी । नामाची गोडी लाजवी मोक्षा ॥ १३ ॥ निजमोक्षाहीवरतें । ज्याचें नाम करी सरतें । त्याच्या कृपाळूपणातें । केवीं म्यां येथें सांगावें ॥ १४ ॥ नामप्रतापा न करवे सीमा । त्या सद्गुरूचा निजमहिमा । कैशापरी आकळे आम्हां । काय निरुपमा उपमावें ॥ १५ ॥ अगाध कीर्ति गुरूची गहन । गुण गणितां अनंतगुण । काय ध्यावें त्याचें आपण । नित्य निर्गुण निजांगें ॥ १६ ॥ धांव घेऊनि त्यापें जावों । तंव त्या नाहीं गांवठावो । त्याचे प्राप्तीसी न चले उपावो । एक सद्भावोवांचूनी ॥ १७ ॥ सद्भावें स्मरतां नामासी । गुरु प्रकटे स्मरणापाशीं । जेवीं सागरू सैंधवासी । ये भेटीसी निजांगें ॥ १८ ॥ सागरा देतां आलिंगन । जेवीं सैंधव होय जीवन । तेवीं वंदितां सद्गुरूचरण । मीतूंपण हारपे ॥ १९ ॥ सद्गुरूकृपा झालिया पूर्ण । जनचि होय जनार्दन । तेव्हां जन वन विजन । भिन्नाभिन्न भासेना ॥ २० ॥ जन तेंचि जनार्दन । जनार्दनचि सकळ जन । हेंचि उपनिषत्सार पूर्ण । हे निजखूण जनार्दनीं ॥ २१ ॥ येणेंचि अभिन्नार्थें येथ । सांख्य बोलिला भगवंत । उत्पत्तिस्थितिप्रळयांत ।

जन्माचा नाश करणारा म्हणून तुला जनार्दन हें नांव प्राप्त झालें. ६ तूं मरणाला मारून जीवित वाढवितोस, जीवाला मारून जीवंत ठेवितोस आणि विदेहपणानें वागवितोस. जनार्दनानें अशी कृपा करावी. ७ आत्मश्रद्धेनें पूर्ण भरलेला व एकटा असल्यामुळें दीन झालेला भक्त पहातांच दीनदयाळ जनार्दन कृपा करितो. ८ भाविक जनांची जी जी भावना असते, ती ती जनार्दन पूर्ण करितो. जो परम समाधान मागतो त्याचा अभिमान नाहींसा करितो. ९ आणि जनार्दनाच्या समोर अहंकार कधीं आलाच तर, तो हातांत शस्त्र घेऊन त्याचे तुकडे करितो ! १० सूर्याचा प्रकाश दिसतांच अंधारासह रात्र जशी नाहींशी होते, तसा जनार्दनाच्या नांवापुढें बापडा अहंकार उरतच नाहीं. ११ गुरुनामाचा गजर ऐकतांच अहंकार समूळ नाहींसा होतो. मग तेथें दुःखदायक संसार कसा टिकाव धरणार ! १२ आवडीनें ज्याचें नामस्मरण केलें असतां संसाराचा बंदिवास तुटतो व जीवाचा जीवबंध सुटतो, त्याच्या नामाची गोडी मोक्षालाहि लाजविते. १३ मोक्षाहूनहि ज्याचें नाम श्रेष्ठ आहे, त्याच्या दयाळुत्वाचें वर्णन मीं काय करावें ! १४ ज्याच्या नामाच्या प्रभावाला सीमा नाहीं त्या सद्गुरूचा महिमा आम्हांला कसा कळणार ! निरुपम गोष्टीला उपमा कसली द्यावी ! १५ गुरूची अगाध कीर्ति गहन आहे. त्याचे गुण मोजूं लागल्यास ते असंख्य आहेत. तेव्हां नित्य निर्गुणाचें आपण काय ध्यावें ! १६ त्याच्या पायांपाशी धांव घ्यावी, तर त्याच्या गांवाचा ठावठिकाणाच लागत नाहीं. एका सद्भावावांचून त्याच्या प्राप्तीचा दुसरा उपायच नाहीं. १७ भक्तिभावानें त्याचें नामस्मरण केलें असतां त्या स्मरणांतच गुरु प्रकट होतो. समुद्र आपण होऊन मिठाला भेटावयास आला १८ व त्यानें त्याला आलिंगन दिलें तर तें मीठ विरून समुद्राशीं जसें एकरूप होतें, त्याप्रमाणें सद्गुरुचरणांना वंदन केलें असतां 'मीतूंपणा' विरून जातो. १९ पूर्ण कृपा होतांच जनच जनार्दन बनतो. व मग जनसमूह, वन, निर्जनप्रदेश यांतील कांहींच भेद भासत नाहीं. २० जनताच जनार्दन आहे व जनार्दनच जनता आहे, हेंच उपनिषदांचें रहस्य आहे व जनार्दनाचें खरें स्वरूपहि हेंच आहे. २१ याच अभेदभावानें भगवानानें सांख्यशास्त्र सांगितलें. उत्पत्ति, स्थिति व लय

वस्तु सदोदित संपूर्ण ॥ २२ ॥ सांख्य ऐकोनियां उद्धवो । विचारी आपुला अभिप्रावो । संसार वाढवी जो अहंभावो । तो अवश्य पहा हो सांडावा ॥ २३ ॥ अहंकार जडला चित्ता । तो सांडितां न वचे सर्वथा । हें पुसों जरी श्रीकृष्णनाथा । तेणें सांख्य या अर्था निरोपिलें ॥ २४ ॥ सकळ प्राप्तीचा अभिप्रावो । सांख्य अनुवादला देवो । अवश्य सांडावा अहंभावो । हेंचि पहा वो दृढ केलें ॥ २५ ॥ माझेंनि पराक्रमें तत्त्वतां । माझें मीपण न वचे सर्वथा । लाजिरवाणें कृष्णनाथा । किती आतां पुसावें ॥ २६ ॥ ऐशी उद्धवाची चिंता । कळूं सरली श्रीकृष्णनाथा । बाप कृपाळु निजभक्तां । जेणें निवारे अहंता तें निजवर्म सांगे ॥ २७ ॥ आजि उद्धवाचें भाग्य पूर्ण । जगीं उद्धवचि धन्य धन्य । ज्यासी संतुष्टला श्रीकृष्ण । न करितां प्रश्न निजगुह्य सांगे ॥ २८ ॥ बाळक काय भूक सांगे । मग माता स्तन देऊं लागे । ते कळवळ्याचे पांगें । धांवोनि निजांगें स्तनपाना लावी ॥ २९ ॥ त्याहूनि अतिआगळा । कृष्णीं उद्धवकळवळा । तो स्वभक्तांची भजनकळा । जाणोनि जिव्हाळा पोखित ॥ ३० ॥ बाळक नेणे आपुली चिंता । परी माता प्रवर्ते त्याच्या हिता । तेवीं उद्धवाचे निजस्वार्था । श्रीकृष्णनाथा कळवळा ॥ ३१ ॥ त्या उद्धवाचें जें जें न्यून । तें तें करावया परिपूर्ण । प्रवर्तलासे श्रीकृष्ण । तो निजनिर्गुण उपदेशी ॥ ३२ ॥ पंचविसावे अध्यायीं जाण । सांगोनि गुणजयोलक्षण । लक्षवील निजनिर्गुण । हेंचि निरूपण निजनिष्ठा ॥ ३३ ॥ प्रकृतिपुरुषविवेक । झालियाही बुद्धिपूर्वक । जंव गुणजयो नाहीं निष्टंक । तंव वाढे सुखदुःख अहंभावो ॥ ३४ ॥ तिहीं गुणांस्तव देह झाला । देहीं गुणजयो न वचे केला । मूळउच्छेदु आपुला । न करवे वहिला कोणासी ॥ ३५ ॥ दांडा जन्मला वृक्षजातीसीं । तो मिळोनियां कुऱ्हाडीसीं । समूळ छेदवी वृक्षांसी । तेवीं विवेकासीं सत्वगुण ॥ ३६ ॥ विवेका मीनल्या सत्वगुण । समूळ उच्छेदी

या तिन्ही अवस्थांमध्यें परब्रह्म परिपूर्णच असतें. २२ पूर्वोक्त सांख्यशास्त्र ऐकून उद्धव मनांत म्हणाला कीं, संसार वाढविणारा जो मुख्य अहंकार, तोच सोडावा कीं.झालें; २३ पण चित्ताला जडलेला अहंकार कांहीं केल्या सुटत नाहीं, म्हणून श्रीकृष्णनाथाला विचारावें, तर त्यानें त्यासाठीं सांख्य म्ह० वेदान्ताच्या अर्थाचें निरूपण केलें. २४ चोविसाव्या अध्यायांत सांख्यशास्त्र सांगितलें आहे. त्यांत सृष्टीची उत्पत्ति व लय यांचा प्रकार सांगून एका परब्रह्मावांचून सर्व सृष्टि मायिक आहे, हें देवानें दाखविलें आहे.२५ त्याच वेळीं अहंकाराचा अवश्य त्याग करावा, असेंहि स्पष्ट सांगितलें; पण माझ्यांतील ' मीपणा ' घालविण्याचें माझ्यांत सामर्थ्य नाहीं. तेव्हां अशा लाजिरवाण्या स्थितींत श्रीकृष्णनाथास किती म्हणून विचारावें ! २६ ही उद्धवाच्या मनांतील चिंता श्रीकृष्णानें ओळखिली व आपल्या भक्तांवर अतिशय कृपा करणारा तो भगवान् ज्यायोगे अहंकाराचें निवारण होईल, असें आपलें रहस्य सांगूं लागला, २७ आज उद्धवाचें भाग्य पूर्णपणें उदयास आलें. श्रीकृष्णानें त्याच्यावर संतुष्ट होऊन त्यानें न विचारितांच आपलें गुह्य ज्ञान सांगितलें. २८ तो उद्धव जगांत खरोखर धन्य धन्य होय. ' भूक लागली ' असें तान्हें बाळ आईला सांगतें थोडेंच ! आणि त्यानें मागितल्यावर मग का त्याची आई त्याला दूध पाजते ! ती प्रेमळ माता कळवळ्यानें आपण होऊनच त्याला दूध प्यावयास देते; २९ पण कृष्णाचा कळवळा यापेक्षांहि विलक्षण आहे. तो आपल्या भक्तांचा भजनप्रकार जाणून त्यांचें प्रेम वाढवितो. ३० तान्ह्या बाळाला आपली काळजी नसते; पण त्याची माता त्याच्या हितासाठीं झटत असते, त्याप्रमाणें उद्धवाच्या हितात श्रीकृष्णनाथ तत्पर होता. ३१ उद्धवाला ज्या गोष्टीची उणीव होती, ती आपल्या निर्गुण स्वरूपाचा उपदेश करून पूर्ण करावयास श्रीकृष्णनाथ प्रवृत्त झाला आहे. ३२ या पंचविसाव्या अध्यायांत गुणजयाचें लक्षण सांगून तें निरूपण लक्षपूर्वक ऐकणारांस निर्गुणस्वरूपाची प्राप्ति करून देईल. ३३ प्रकृति-पुरुषांचें बुद्धिपूर्वक विवेचन केल्यावरहि त्रिगुणांना जोंवर पूर्णपणे जिंकिलें नाहीं, तोंवर सुख-दुःख-अहंकार वाढत असतो. ३४ तीन गुणांपासूनच देह बनला आहे; तेव्हां त्या देहानें गुणांना जिंकणें शक्य नाहीं कारण आपल्याच मूळाचा छेद कोणाच्यानेंहि करवत नाहीं. ३५ परंतु कुऱ्हाडीचा दांडा मूळ वृक्षापासूनच उत्पन्न झालेला असून तो कुऱ्हाडीला साह्य करून सगळ्या वृक्षाचा समूळ छेद करितो, त्याप्रमाणें सत्त्वगुण विवेकाला मिळतो, ३६ आणि त्या दोहोंच्या ऐक्यानें तीन्ही गुणांचा

तिनी गुण । सहजें प्रकटे निजनिर्गुण । तेव्हां गुणच्छेदन तें मिथ्या ।। ३७ ।। समूळ मिथ्या तिनी गुण । नित्य सत्य निजनिर्गुण । येचि अर्थीचें निरूपण । स्वमुखें श्रीकृष्ण सांगत ।। ३८ ।।

श्रीभ० उ०—गुणानामसमिश्राणां पुमान्येन यथा भवेत् । तन्मे पुरुषवर्येदमुपधारय शंसतः ॥ १ ॥

ज्याचेनि चरणें पवित्र क्षिती । नामें उद्धरे त्रिजगतीं । ज्याची ऐकतां गुणकीर्ती । क्षयो पावती महापापें ।। ३९ ।। ज्याचें मृदु मधुर अविट नाम । उच्चारितां निववी परम । तो उद्धवासी पुरुषोत्तम । आवडीं परम बोलत ।। ४० ।। सत्व रज तम तिनी गुण । न मिसळतां भिन्नभिन्न । पुरुषापासीं एकैक गुण । उपजवी चिह्न तें ऐका ।। ४१ ।। निःसंदेह सावधान । निर्विकल्प करूनि मन । ऐकतां माझें वचन पुरुषोत्तम । पूर्ण होइजे स्वयें ।। ४२ ।। माझे स्वरूपीं सद्भावता । ते पुरुषाची उत्तमावस्था । माझे वचनीं । विश्वासतां पुरुषोत्तमता घर रिघे ।। ४३ ।। ऐसी उत्तमा अतिउत्तम । निर्गुण पदवी निरुपम । तुज मी अर्पितसें पुरुषोत्तम । माझें वचन परम विश्वासल्या ।। ४४ ।। भक्तिभावार्थे परम श्रेष्ठ । वचन-विश्वासी अतिवरिष्ठ । यालागीं उद्धवासी पुरुषश्रेष्ठ । स्वमुखें वैकुंठ संबोधी ।। ४५ ।। संसारीं योनि अनेग । त्यामाजीं मनुष्यत्व अतिचांग । तेही अविकळ अव्यंग । संपूर्ण सांग निर्दुष्ट ।। ४६ ।। सकळ देहांमाजीं जाण । असे पुरुषदेहप्राधान्य । त्याहीमाजी विवेकसंपन्न । वेदशास्त्रज्ञ मुमुक्षू ।। ४७ ।। वेदशास्त्रविवेकसंपन्न ।

उच्छेद होतो. व मूळचें निर्गुणत्व प्रकट होतें. तेव्हां गुणच्छेदनहि मिथ्याच ठरतें. ३७ वास्तविक हे तीन्ही गुण मिथ्या आहेत. स्वाभाविक निर्गुणत्व तेवढें नित्य सत्य आहे या अर्थांचेच निरूपण स्वतः श्रीकृष्ण आपल्या मुखानें करीत आहे. ३८

[या पंचविसाव्या अध्यायांत भगवान् आपल्या निर्गुणत्वाच्या ज्ञानासाठीं चित्तापासून उत्पन्न होणाऱ्या अनेक प्रकारच्या सत्त्वादि गुणवृत्तींचें निरूपण करितात.]

—प्रकृति व पुरुष यांचें विवेकज्ञान असलेल्या पुरुषानेंहि जोंपर्यंत विशेष प्रयत्नानें गुणत्रयवृत्तींचा पराभव केलेला नसतो, तोंवर सुख-दुःखादि द्वंद्वांचा नाश होत नाहीं. यास्तव त्यांच्या पराभवाचा उपाय व गुणवृत्ति यांचें निरूपण करण्यासाठीं भगवान् म्हणतात—

श्रीभ० उ०—भगवान् म्हणाले—पुरुषवर्य—हे पुरुषश्रेष्ठ उद्धवा ! पुमान् असमिश्राणां गुणानां येन यथा भवेत् तत् इदं शंसतः मे उपधारय—पुरुष परस्पर विभक्त असलेल्या गुणांतील ज्या गुणाच्या योगानें जसा होतो तें, हें सांगत असलेल्या मजपासून ऐक. १.

ज्याच्या चरणांनीं सगळी पृथ्वी पवित्र होते; ज्याच्या नांवानें त्रैलोक्याचा उद्धार होतो; ज्याच्या गुणांची कीर्ति ऐकतांच महापातकांचा क्षय होतो; ३९ ज्याचें मृदु, मधुर, व विट न येणारें नांव उच्चारतांच परम आनंद होतो, तो पुरुषोत्तम उद्धवाला मोठ्या आवडीनें असें बोलला. ४० सत्त्व-रज-तम हे तीन्ही गुण एकमेकांत न मिसळतां पृथक् असतात. तेव्हां प्रत्येक गुण मनुष्यांत कोणतें चिन्ह उत्पन्न करितो, तें ऐक. ४१ चित्त संशयरहित, सावधान व स्वस्थ करून हें माझें वचन ऐकिलें असतां ऐकणारा स्वतःच पुरुषोत्तम होतो. ४२ माझ्या स्वरूपांत सद्भावना ठेवणें, हीच पुरुषाची उत्तम अवस्था आहे. माझ्या शब्दावर विश्वास ठेविला असतां पुरुषोत्तमत्व घरीं चालून येते ४३ अशी उत्तमांतील उत्तम, निरुपम, निर्गुण पदवी मी पुरुषोत्तम तुला अर्पण करीत आहें. माझ्या वचनावर विश्वास ठेवल्यास तुला ती प्राप्त होईल. ४४ उद्धव भक्तिभावानें अत्यंत श्रेष्ठ वचनावर विश्वास ठेवणारांमध्यें वरिष्ठ असल्यामुळें श्रीकृष्णानें त्याला 'पुरुषश्रेष्ठ' या नांवानें संबोधिलें आहे. ४५ या जगांत असंख्य योनी आहेत. त्यांत मनुष्यजन्म सर्वांत श्रेष्ठ आहे. त्यांतहि सदृढ, अव्यंग, संपूर्ण, सर्व अवयवयुक्त असा. ४६ पुरुषदेह सर्व देहांत श्रेष्ठ, व त्यांतल्या-त्यांत तो विवेकसंपन्न, वेद-शास्त्रज्ञ, मुमुक्षु ४७ व उत्तम वेद-शास्त्र-विवेकसंपन्न असून माझें भजन करणार असेल व

त्याहीमाजीं ज्या माझें भजन । भजत्यांमाजीं अनन्य शरण । सर्वस्वें जाण मजलागीं ॥ ४८ ॥ सर्वस्वें जे अनन्य शरण । तेथ माझी कृपा परिपूर्ण । माझे कृपें माझें ज्ञान । पावोनि संपन्न मद्भजनीं ॥ ४९ ॥ येहीं गुणीं विचारितां लोक । आथिला दिसे उद्धव एक । त्यालागी यदुनायक । पुरुषवर्याभिषेक वचनें करी ॥ ५० ॥ ऐसें संबोधूनि उद्धवासीं । त्रिगुणगुणस्वभावांसीं । सांगतां प्रथम सत्वासी । हृषीकेशी उपपादी ॥ ५१ ॥ उदंड सत्वाची लक्षणें । त्यांत पंधरा बोलिलीं श्रीकृष्णें । तेंचि ऐका कोणकोणें । निजनिरूपणें हरि सांगे ॥ ५२ ॥

शमो दमस्तितिक्षेक्षा तपः सत्यं दया स्मृतिः । तुष्टिस्त्यागोऽस्पृहा श्रद्धा ह्रीर्दयादिः स्वनिर्वृतिः ॥ २ ॥

आपुली जे चित्तवृत्ती । सांडूनि बाह्यस्फूर्ती । अखंड राखणें आत्मस्थिती । शम निश्चितीं त्या नांव ॥ ५३ ॥ बाह्य इंद्रियांची चडफड । शमेंसीं करावा गलजोड । निग्रहणें विषयचाड । दमाचें कोड या नांव ॥ ५४ ॥ जेणें हरिखें साहणें सुख । त्याचि वृत्तीं साहणें दुःख । तितिक्षा या नांव देख । शुद्धसत्वात्मक उद्धवा ॥ ५५ ॥ मी कोण कैंचा किमात्मक । निष्कर्म कीं कर्मबद्धक । करणें निजात्मविवेक । ईक्षापरिपाक या नांव ॥ ५६ ॥ जागृतिस्वप्नसुषुप्तीआंत । भगवत्प्राप्तीलागीं चित्त । झुरणीमाजीं पडे नित्य । तप निश्चित या नांव ॥ ५७ ॥ आवडीं जेवीं नेघवे विख । तेवीं प्राणांतें न बोले लटिक । साचचि बोलणें निश्शंक । हें सत्य देख सात्विका ॥ ५८ ॥ भूतांवरी कठिणपण । जो स्वप्नीं न देखे आपण । भूतदया ते संपूर्ण । उद्धवा जाण निश्चित ॥ ५९ ॥ माझा मुख्य निजस्वार्थ कोण । मी काय करितों कर्माचरण । ऐसें जें पूर्वानुस्मरण । स्मृति जाण या नांव ॥ ६० ॥ न करितां अति-

---

त्या भक्तांतहि मला अनन्य शरण येणारा असेल, ४८ तर त्या निष्ठायुक्त भजन करणारावर माझी पूर्ण कृपा असते. माझ्या कृपेमुळेंच त्यास माझें ज्ञान प्राप्त होतें व तो मद्भजनांत तत्पर होतो. ४९ या गुणांचा विचार केला असतां उद्धवांतच हे सर्व गुण एकवटलेले दिसत होते. (आधींच मनुष्यजन्म, त्यांत अव्यंग, वेद-शास्त्रविवेकसंपन्न, अनन्य-भजनाची आवड या सर्व गुणांनीं युक्त असा तो होता.) म्हणून श्रीकृष्णानें त्याला 'पुरुषवर्य' म्हणून त्याचा सन्मान केला. ५० अशा प्रकारें उद्धवाला संबोधून व त्रिगुणस्वभावांचें लक्षण सांगण्यास आरंभ करून श्रीकृष्ण प्रथम सत्त्व-गुणाचें निरूपण करूं लागला. ५१ सत्त्वगुणाची पुष्कळ लक्षणें आहेत. त्यांतील फक्त पंधरा लक्षणें श्रीकृष्णानें सांगितलीं. तीं कोणती तेंच निरूपण आतां हरि करीत आहे. ५२.

आतां अगोदर सत्त्ववृत्ति सांगतात—

शमः०......स्वनिर्वृत्तिः—अंतरिंद्रियांचा निग्रह, बहिरिंन्द्रियांचें दमन, द्वंद्वसहिष्णुत्व, विवेक, स्वधर्मवर्तित्व, सत्य, दया, पूर्वापरानुसंधान, यदृच्छेनें जें प्राप्त होईल त्यांत संतोष, व्ययशीलत्व, विषयांविषयीं वैराग्य, गुरुवचन व शास्त्रवचन यांवर विश्वास, अनुचित कर्माविषयीं लज्जा, दान (आदिशब्दानें आर्जव-विनयादि घ्यावें.) व आत्मरति या सात्त्विक वृत्ति आहेत. २.

बाह्य विषयांची स्फूर्ति टाकून आपली चित्तवृत्ति अखंड एकाग्र करणें याला शम म्ह० अंतरिंद्रियांचा निग्रह असें म्हणतात. ५३ शमाबरोबर ऐक्य करून बाह्य इंद्रियांची धडपड विषयेच्छेच्या निग्रहानें थांबविणें; यालाच दमाची विचित्रलीला म्हणतात. ५४ आपण सुख जितक्या संतोषानें भोगतों तितक्याच संतोषानें दुःख सहन करणें याला शुद्ध-सत्त्वयुक्त तितिक्षा म्हणतात. ५५ 'मी कोण, कोठचा, कोणत्या स्वरूपाचा आहें ! मी निष्कर्म आहें कीं कर्मानें बद्ध आहे' असा जो आत्मविचार त्याला ईक्षापरिपाक म्हणतात. ५६ जागृति-स्वप्न-सुषुप्तींमध्यें भगवत्प्राप्ती-साठीं चित्त नेहमीं झुरत असणें याला 'तप' असें म्हणतात. ५७ विषाचें सेवन जसें कोणीहि आवडीनें करीत नाहीं तसे प्राण गेला तरी असत्य भाषण न करणें, निश्चयानें खरेंच बोलणें, हें सत्य होय. ५८ हे उद्धवा ! जो सर्व प्राणिमात्रांशीं स्वप्नांतहि निष्ठुरतेनें वागत नाहीं त्याची तीच खरी भूतदया होय, हें निश्चित जाणावें. ५९ उद्धवा ! माझें मुख्य हित कशांत आहे ! मी कोठचें कर्माचरण करीत आहे ! असें जें पूर्वीचें स्मरण त्याला स्मृति

आटाटी । यथालाभें सुखी पोटीं । या नांव गा निजसंतुष्टी । जाण जगजेठी उद्धवा ॥ ६१ ॥ जे मिळाले जीविकाभाग । त्यांतही सत्पात्रीं दानयोग । विषयममता सांडणें सांग । त्या नांव त्याग उद्धवा ॥ ६२ ॥ अर्थस्वार्थीं इच्छा चढे । अर्थ जोडतां अधिक वाढे । ते इच्छा सांडणें निजनिवाडें । निस्पृहता घडे ते ठायीं ॥ ६३ ॥ जेथ निस्पृहता समूळ सांग । त्याचि नांव दृढ वैराग्य । हें परमार्थाचें निजभाग्य । येणें श्रीरंग सांपडे ॥ ६४ ॥ जो गुरुवाक्यविश्वासी । सबाह्य विकला सर्वस्वेंसीं । तोचि भावार्थ द्विजदेवांसी । श्रद्धा त्यापाशीं समूळ नांदे ॥ ६५ ॥ नरदेहीं लाभे परब्रह्म । तदर्थ न करूनि सत्कर्म । विषयार्थ करी धर्माधर्म । ते लज्जा परम अतिनिंद्य ॥ ६६ ॥ जेणें दुःखी होइजे आपणें । तें पुढिलासी नाहीं करणें । दुःख नेदूनि सुख देणें । हे दया म्यां श्रीकृष्णें वंदिजे ॥ ६७ ॥ पुढिलासी नेदूनि दुःख । स्वयें भूतमात्रीं देणें सुख । हेंचि दया पारमार्थिक । दुसरेनि देख यालागीं सांगे ॥ ६८ ॥ खातां नावडेपुढें पेंड जैसी । तैसें गौण देखोनि विषयांसी । जो विनवटला ब्रह्मसुखासी । स्वनिवृत्ति त्यासी बोलिजे ॥ ६९ ॥ रंक बैसल्या पालखीसी । उपेक्षी पूर्वील सुडक्यासी । तेवीं उपेक्षूनि विषयांसी । जो ब्रह्मसुखासी पडकला ॥ ७० ॥ कणाची वाढी भुसापाशीं । कण निडारे भुसेसीं । तो कण यावया हातासी । सांडिती भुसासी पाखडूनी ॥ ७१ ॥ तेवीं ब्रह्मसुखाचिये पाडें । नरदेहाचा पांगडा पडे । तैं ब्रह्मसुख जैं हाता चढे । तैं देहींचें नावडे विषयभूस ॥ ७२ ॥ तेवीं सांडूनि विषयप्रीती । ज्यासी ब्रह्मसुखीं सुखप्राप्ती । याचि नांव स्वनिवृत्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ७३॥ या पंधरा लक्षणांची स्थिती । वर्ते तो शुद्ध सत्वमूर्ती । शोधितसत्वाची सत्वबृत्ती । ' आदि ' शब्दें श्रीपति सांगत ॥ ७४ ॥ सर्व भूतीं अकृत्रिमता । देखे भगवद्भावें तत्त्वतां । या नांव शोधितसत्वता । गुणावस्थाछेदक

असें म्हणतात. ६० जगांतील श्रेष्ठ भक्ता उद्धवा ! अतिशय यातायात न करितां जें मिळेल त्यांत संतुष्ट रहाणें हाच आत्मसंतोष होय. ६१ उद्धवा ! आपल्या निर्वाहाचें जें कांहीं साधन असेल त्यांतीलच कांहीं थोडें सत्पात्रीं दान देऊन विषयासक्ति टाकणें, यालाच त्याग असें म्हणतात. ६२ द्रव्यार्जनाची अनिवार इच्छा असणें आणि द्रव्य संग्रहाबरोबर ती अधिक वाढणें या दोन्हींचा निश्चितबुद्धीनें त्याग केला असतां निस्पृहता प्राप्त होते. ६३ अशी निस्पृहता जेव्हां पूर्णपणें वाढते, तेव्हां तिलाच दृढ वैराग्य म्हणतात. हें परमार्थांतील थोर भाग्य आहे. यानेंच भगवत्प्राप्ति होते. ६४ जो गुरुवचनावर विश्वास ठेवितो, स्वतःला अंतर्बाह्य सर्वस्वीं विकून घेतो, त्याचीच देव-ब्राह्मणांवर भक्ति जडते व त्याच्यापाशीं श्रद्धा पूर्णपणें नांदत असते. ६५ मनुष्यदेहांतच परब्रह्माची प्राप्ति होत असतां, त्या ब्रह्मप्राप्तीसाठीं सत्कर्म न करितां विषयासक्तीनें धर्म-अधर्माचें आचरण करणें हें अत्यंत निंद्य व लज्जास्पद होय. ६६ आपल्याला ज्या गोष्टीपासून दुःख होतें, तें दुःख दुसऱ्याला कदापि न देणें उलट दुःखाऐवजीं सुख देणें, या दयेला मी श्रीकृष्ण वंदन करितों. ६७ दुसऱ्याला दुःख न देतां सर्व प्राणिमात्रास सुख देणें, हीच पारमार्थिक दया होय. म्हणून मीं ती दुसऱ्यांदा सांगितली. ६८ उत्तम साखरेपुढें जशी पेंड त्याप्रमाणें विषयांना तुच्छ लेखून जो ब्रह्मसुखांत निमग्न होतो तिलाच ' आत्मनिवृत्ति ' म्हणतात. ६९ एखादा दरिद्री पालखींत बसला कीं, आपल्या पूर्वींच्या चिंध्या जशा फेंकून देतो, त्याप्रमाणें तो भक्त विषय टाकून ब्रह्मसुखांत तल्लीन होतो. ७० धान्याची वाढ त्याच्या वरील भुशांतच असते. त्यांतील दाणा भुशासह वाढत असतो; पण तेंच धान्य परिपक्व झालें कीं, दाणे हातीं येण्यासाठीं वरील भुसा जसा पाखडून टाकितात, ७१ त्याप्रमाणें ब्रह्मसुखाच्या महत्त्वाइतकाच देहाचाहि मोह पडतो; पण एकदा ब्रह्मस्वरूप पूर्णपणें प्राप्त झालें की, मग देहांतील विषयरूपी भूस आवडेनासें होतें. ७२ अशा प्रकारची विषयप्रीति सोडून ब्रह्मप्राप्तीचा जो लाभ त्यालाच आत्मनिर्वृत्ति म्हणतात, असें हे उद्धवा ! तूं निश्चयानें जाण. ७३ जो या पंधरा लक्षणांनीं युक्त असतो, तोच शुद्ध सत्त्वाची मूर्ति होय. आतां श्रीकृष्ण ' आदि ' शब्दानें शुद्ध झालेल्या सत्त्वगुणाची वृत्ति सांगत आहे. ७४ सर्व प्राणिमात्रांच्या ठिकाणीं भगवद्भावानें

॥ ७५ ॥ ऐशियापरीं सत्वगुण । सात्विकापासीं वर्ते पूर्ण । आतां रजाचें लक्षण । स्वयें श्रीकृष्ण सांगत ॥ ७६ ॥

काम ईहा मदस्तृष्णा स्तम्भ आशीर्भिदा सुखम् । मदोत्साहो यशः प्रीतिर्हास्यं वीर्यं बलोद्यमः ॥ ३ ॥

काम म्हणिजे विषयसोसू । जेवीं इंधनीं वाढे हुताशू । तेवीं पुरवितां कामाभिलाषू । कामआसोसू पैं वाढे ॥ ७७ ॥ या नांव काम जाण । कामक्रिया ते ईहा पूर्ण । झाले विद्येचा दर्प गहन । मदाचें लक्षण या नांव ॥ ७८ ॥ झालिया अर्थप्राप्ती । वासनेसी नव्हे तृप्ती । चढतीवाढती आसक्ती । तृष्णा निश्चितीं या नांव ॥ ७९ ॥ अतिगर्वे जे स्तब्धता । कोणा दृष्टीं नाणी सर्वथा । या नांव स्तंभावस्था । जाण तत्त्वतां उद्धवा ॥ ८० ॥ अर्थप्राप्तीकारणें । इष्टदेवता प्रार्थणें । प्रापंचिक सुख मागणें । आशा म्हणणें या नांव ॥ ८१ ॥ भिदा म्हणिजे भेद जाण । स्फुरद्रूप प्रपंचभान । माझें तुझें प्रपंचवचन । भिदालक्षण या नांव ॥ ८२ ॥ राजससुखाचा नवलभाग । विषयसुखभोग जो सांग । तेंचि सुख मानिती चांग । सुखप्रयोग या नांव ॥ ८३ ॥ रणीं उत्साह शूरासी । कां पुत्रोत्साह नरासी । विवाहोत्साह सुहृदांसी । महोत्साह त्यासी बोलिजे ॥ ८४ ॥ शास्त्रविवादीं जयो घेणें । का युद्धीं शूर पराभवणें । तेणें ख्याति वाढविणें । यश मिरवणें या नांव ॥ ८५ ॥ बंदिजनांहातीं कीर्ती । स्वयें वाखाणवी दिगंतीं । या नांव यशःप्रीती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ८६ ॥ ऐकोनि वचनोक्ति छंदोबद्ध । उपहासीं अतिविनोद । तेथ राजसा हास्य विशद । जाण प्रसिद्ध उद्धवा ॥ ८७ ॥ वीर्य म्हणिजे केवळ । बलाढ्यता अतिप्रबळ ।

निष्कपट बुद्धि ठेवणें, यालाच तीन गुणांचा छेद करणारी शुद्ध सत्त्ववृत्ति म्हणतात. ७५ असा सत्त्वगुण सात्त्विक माणसांत पूर्णपणें वसत असतो. आतां श्रीकृष्ण रजोगुणाचें लक्षण सांगत आहे. ७६.

—रजोगुणाच्या वृत्ति सांगतात—

कामः ....उद्यमः—स्वर्गादि विषयांविषयीं अभिलाष, यज्ञादि व्यापार, दर्प, लाभ झाला असतांहि असंतोष, गर्व, धनादिकांच्या अभिलाषानें देवतादिकांची प्रार्थना, हा मी व हा दुसरा, अशी भेदबुद्धि, विषयभोगमदानें युद्धादिकांविषयीं अभिनिवेश, स्तुतिप्रियता, उल्हास, आपल्या प्रभावाचें आविष्करण व बलानें केलेला उद्यम या राजसवृत्ति आहेत. [न्यायानें केलेला उद्यम सात्त्विक असतो.] ३ (येथें श्रीधरांनीं ' मदोत्साह ' व एकनाथांनीं 'महोत्साह ' असा पाठ घेतला आहे.) .

काम म्ह० विषयांची आवड; सर्पण जसें अग्नीला अधिकच प्रदीप्त करीत असतें, त्याप्रमाणें कामाची इच्छा जेवढी पुरवावी, तेवढी विषयासक्ति अधिक वाढते. ७७ तिलाच ' काम ' असें म्हणतात. विषयवासनांचा जो व्यवहार त्याला ' ईहा ' म्हणतात. संपादिलेल्या विद्येचा अत्यंत गर्व असणें हें मदाचें लक्षण होय. ७८ कितीहि द्रव्य मिळालें तरी वासनेची तृप्ति न होतां जी चढती वाढती आसक्ति तीच तृष्णा होय. ७९ अत्यंत गर्वानें ताठा येणें व डोळ्यापुढें कांहीं न दिसणें यालाच स्तंभावस्था म्हणतात. ८० द्रव्यप्राप्तीसाठीं इष्ट देवतेची आराधना करणें व तिच्यापाशीं प्रापंचिक सुख मागणें, ही आशा होय. ८१ भिदा म्ह० भेद समजावा. प्रपंचभाव स्फुरणें व त्यामुळें ' माझें तुझें ' इत्यादि जें प्रपंचाविषयींचें भाषण यालाच भेद म्हणतात. ८२ राजस सुख मोठें विलक्षण आहे. जो सांग विषयोपभोग त्यालाच उत्तम सुख मानणें हेंच राजस सुख होय. ८३ शूराला युद्धांत विरश्री चढणें, सामान्य माणसाला पुत्रजन्माचा हर्ष होणें किंवा आप्तजनांस लग्नसमारंभाचा उल्हास वाटणें याला महोत्साह असें म्हणतात. ८४ शास्त्रांच्या चर्चेत जय मिळविणें, किंवा युद्धांत शूरांचा पराभव करणें, अशाप्रकारची जी कीर्ति वाढविणें त्याला यश असें म्हणतात. ८५ आपल्या आश्रितांकडून आपली कीर्ति पसरविणें यालाच यशःप्रीति म्हणतात, असें उद्धवा ! तूं निश्चित समज. ८६ छंदोबद्ध वचनोक्ति व उपहासांतील अतिविनोद ऐकून राजस पुरुषाला जें हंसूं कोसळतें तेंच हास्य होय. ८७ वीर्य म्हणजे पराक्रम, प्रबल बलाढ्यपणा, शरीरबल दाखविणें

दाखवणें शारीरबळ । या नांव शीळ वीर्याचें ॥ ८८ ॥ राजबळें उद्यमव्यवहार । आंगदट जो व्यापार । न्याय सांडूनि स्वार्थ फार । बलोद्यमप्रकार या नांव ॥ ८९ ॥ हीं पंधराही लक्षणें । ज्यापें नांदती संपूर्णें । तो राजस बोलखणें । जीवेंप्राणें निश्चित ॥ ९० ॥ केवळ अविवेकसंपत्ती । तामसाची तमोवृत्ती । सोळा लक्षणें त्याची स्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ ९१ ॥

क्रोधो लोभोऽनृतं हिंसा याञ्चा दम्भः क्लमः कलिः । शोकमोहौ विषादार्ती निद्राशाभीरनुद्यमः ॥ ४ ॥

क्रोध कामाची पूर्णावस्था । लोभ म्हणिजे अतिकृपणता । अनृत म्हणिजे असत्यता । हिंसा ते तत्त्वतां परपीडा ॥ ९२ ॥ याञ्चा म्हणिजे लोलंगता । दंभ म्हणिजे अतिमान्यता । क्लमनामें अतिआयासता । व्यर्थ कलहता कलि जाण ॥ ९३ ॥ शोक म्हणिजे हाहाकारू । मोह म्हणिजे भ्रमाचा पूरू । विषाद म्हणिजे दुःखसंचारू । अभ्यंतरू जेणें पोळे ॥ ९४ ॥ आर्ति म्हणिजे अतिसंताप । निंदा म्हणिजे असिदारोप । आशा म्हणिजे अतिलोलुप्य । महाभयकंप भीशब्दीं ॥ ९५ ॥ ऐक निद्रेचें निजवर्म । जें आळसाचें निजधाम । जाड्यता सोलींव परम । ते निद्रा निःसीम तामसी ॥ ९६ ॥ सांडूनिया सर्व कर्म । स्तब्धता राहे परम । या नांव अनुद्यम । सुखावलें तम ते ठायीं वसे ॥ ९७ ॥ या तमोगुणाच्या सोळा कळा । ज्याचे अंगीं बाणती सकळा । तो तमोरात्रीचा चंद्र काळा । अविवेक आंधळा तामसू ॥ ९८ ॥ सत्वरजतमोगुण । यांचे ओळखीलागीं जाण । केलें भिन्नभिन्न निरूपण । आतां मिश्रलक्षण तें एक ॥ ९९ ॥

सत्त्वस्य रजसश्चैतास्ततमसश्चानुपूर्वशः । वृत्तयो वर्णितप्रायः सन्निपातमथो शृणु ॥ ५ ॥

यालाच वीर्यशील म्हणतात. ८८ राजाच्या बलावर उद्यम, व्यापारादि व्यवहार करणें व न्यायाला सोडून जो अधिकारबलाबर व्यापार, त्याला बलोद्यम म्हणतात. (म्ह० न्याय-अन्याय न पहातां शक्तीच्या बलावर उद्योग करणें.) ८९ हीं सोळा लक्षणें ज्याच्यामध्यें पूर्णपणें असतात, त्याला जीवा-भावानें राजस स्वभावाचा निश्चित जाणावें. ९० आतां अविवेकाचें भांडार अशी जी तामस माणसाची तमोवृत्ति, तिचीं सोळा लक्षणें तुला सांगतों. ऐक. ९१.

—तमोगुणाच्या वृत्ति सांगतात—

क्रोधः...अनुद्यमः—असहिष्णुता, व्ययापासून पराङ्मुख होणें, मिथ्या भाषण, हिंसा, याचना, दंभ, श्रम, कलह, शोक व अविवेक, दुःख, दैन्य, आळस, 'मला हें मिळावें' अशी इच्छा, भीति व जाड्य— अनुद्यम. ४.

कामाची पूर्णावस्था म्हणजे क्रोध. अतिशय कृपणपणा म्हणजे लोभ. अनृत म्ह० खोटें भाषण. दुसऱ्याला पीडा देणें ही हिंसा होय. ९२ याञ्चा म्ह० लोलंगता. अतिमान्यता हाच दंभ. अतिशय कष्ट म्हणजे श्रम. कारणावांचून व्यर्थ भांडणें हाच कलि. ९३ हाहाकार हाच शोक. भ्रमाचा पूर म्हणजेच मोह. ज्यानें अंतःकरण पोळतें तो दुःखाचा संचार म्हणजे विषाद. ९४ अतिशय संताप म्हणजे आर्तपणा. एखाद्यावर मिथ्या आरोप करणें हीच निंदा. अतिशय लोलुपता म्हणजेच आशा. भी म्ह० अतिशय कंप, हीच भीति. ९५ आतां निद्रेचें वर्म ऐक. जें आळसाचें माहेरघरच, अत्यंत सुस्ती, तीच तामसी निद्रा होय. ९६ सगळें काम टाकून कांहीं न करितां मूढासारखें स्वस्थ बसणें यालाच अनुद्यम म्हणतात. त्या अवस्थेंत तमाची पूर्ण वस्ती असते. ९७ हीं तमोगुणाची सोळा लक्षणें ज्याच्या अंगीं पूर्णपणें बाणलीं असतील, तो अविवेकानें आंधळा झालेला तामस अमावास्येच्या रात्रीचा काळा चंद्रच होय. ९८ सत्व-रज-तम हे गुण ओळखितां यावेत, म्हणून त्यांचें भिन्न-भिन्न निरूपण केलें. आतां त्यांचें मिश्रलक्षण ऐक. ९९.

अनुपूर्वशः एताः सत्त्वस्य रजसः च तमसः वृत्तयः वर्णितप्रायाः—क्रमानें या सत्वाच्या, रजाच्या व तमाच्या वृत्ति बहुतेक वर्णन करून सांगितल्या. (इतर वृत्ति यांच्या अनुरोधानें कल्पाव्या.) **अथो सन्निपातं शृणु**—आतां या वृत्तींच सन्निपात—एकत्र संयोग ऐक. ५.

सांगीतली त्रिगुणस्थिती । त्या एकएकाच्या अनंतवृत्ती । त्याही अनंतप्राय होती । जीवासी गुणगुंती येथेंचि पडे ॥ १०० ॥ मस्तकीं केश चिकटले होती । ते ज्याचे त्या नुगवती । तेवीं त्रिगुणांची गुणगुंती । जीवाहातीं उगवेना ॥ १ ॥ मिळोनि सख्या मायबहिणी । हातीं घेऊनि तेल फणी । उगविती चिकटल्या केशश्रेणी । तेवीं त्रिगुणांची वेणी जीवासी ॥ २ ॥ त्रिगुणांची विभागवृत्ती । जीवसामर्थ्यें जरी होती । तरी शुद्धसत्वीं करूनि वस्ती । गुणातीतीं प्रवेशता ॥ ३ ॥ ऐसा निजगुणांचा उगवो । जीवाचेनि नोहे निर्वाहो । यालागीं गुरुचरणीं सद्भावो । सभाग्य पहा वो राखिती ॥ ४ ॥ जे सभाग्य भाग्यवंत जनीं । ज्यांसी सद्गुरु सखी जननी । विवेक वैराग्य घेऊनि फणी । जो त्रिगुणांची वेणी उगवितू ॥ ५ ॥ ज्यांची उगविली गुणगुंती । पुढती गुंती पडे मागुती । यालागीं ते महामती । मुंडूनि सांडिती संन्यासी ॥ ६ ॥ एकाची नवलगती । उद्भट वैराग्याची स्थिती । गुंती उगवाया न रिघती । मुळींचि मुंडिती समूळ ॥ ७ ॥ विवेकफणीचेनि मेळें । ओढितां वैराग्यबळें । जो अशक्त भावबळें । तो मध्येंचि पळे उठूनी ॥ ८ ॥ अशक्तें पळतां देखोनि दूरी । एकें पळालीं मोहअंधारीं । एकें गुंती राखोनि शिरीं । गुंतीमाझारीं रिघाली ॥ ९ ॥ एकें अत्यंत करंटीं । नव्हेचि गुरुमाउलीसी भेटी । ऐशी संसारीं पोरें पोरटीं । गुणदुःखकोटी भोगिती ॥ ११० ॥ द्विपरार्धायु विधाता । त्याचेनि नोहे गुणभागता । मग इतरांची कोण कथा । गुण तत्त्वतां निवडावया ॥ ११ ॥ ऐशिया ज्या त्रिगुणवृत्ती । मजही निःशेष न निवडती । यालागीं ध्वनितप्राय पदोक्ती । देव श्लोकार्थीं बोलिला ॥ १२ ॥ मागिल्या तीं श्लोकार्थीं ॥ सांगितल्या त्रिगुणस्थिती । त्रिगुणांची मिश्रित गती । सन्निपातवृत्ती ते ऐका ॥ १३ ॥

आतां जे तीन गुणांचे प्रकार सांगितले, त्या एकेकाच्या असंख्य वृत्ति आहेत व त्यांतहि अनंत प्रकार आहेत. त्यांत जीव अडकून पडतो. १०० स्त्रियांच्या मस्तकावरील केस गुंतले म्हणजे ते जसे तिचे तिलाच सोडवितां येत नाहींत, त्याप्रमाणें ही तीन गुणांची गुंतागुंत जीवाला सोडवितां येत नाहीं. १ आई, बहिणी, मैत्रिणी या जमून तेल-फणी घेऊन मग त्या गुंतलेल्या केसांची गुंतवळ काढितात, त्याप्रमाणें जीवाची ही तीन गुणांची तिपेडी वेणी आहे. २ जीवाला जर आपल्या सामर्थ्यानें या तीन गुणांचा विभाग करितां आला असता, तर तो शुद्ध सत्त्वगुणांत वास करून गुणातीत अवस्थेंत गेला असता. ३ पण असा हा आपल्या गुणांचा उलगडा जीवाला करितां येणें शक्य नसल्यामुळें सद्भक्त सद्गुरुचरणांवर श्रद्धा ठेवितात. ४ जगांत जे श्रेष्ठ भाग्यवान भक्त असतात त्यांची सद्गुरुमाउली सख्खी माताच आहे. सद्गुरु हातांत विवेक-वैराग्याची फणी घेऊन भक्ताच्या त्रिगुणांची वेणी सोडवितो. ५ त्यांची ही गुंतागुंत एकदां सुटली कीं, पुनः गुंत बसूं नये म्हणून ते दूरदर्शी भक्त मुंडन करून संन्यासी होतात. ६ कांहीं भक्त असे विचित्र असतात कीं, त्यांचें वैराग्य अतिशय तीव्र असतें. ते गुंतागुंत सोडविण्याच्या खटपटींत न पडतां एकदम समूळ मुंडन करून टाकितात. ७ विवेकरूपी फणीनें विंचरीत असतां विरक्तीचा ताण बसून, थोडेसें ओढतांच, ज्याची श्रद्धा लटपटित असते, ते मध्येंच उठून पळून जातात. ८ असे ते दुर्बल मनाचे लोक पळालेले पाहून कोणी मोहरूपी अंधारांत दडून बसले व कोणी डोकीवर ही त्रिगुणांची गुंतवळ तशीच ठेवून पुनः त्या गुंतागुंतींतच शिरले. ९ कोणी अत्यंत अभागी असल्यामुळें त्यांची व गुरुमाऊलीची कधीं भेटच होत नाहीं. त्यामुळें संसारांत अशीं अनेक पोरें-बाळें त्रिगुणांपासून उद्भवणारीं कोट्यवधि दुःखें भोगितात. ११० दोन परार्ध वर्षें आयुष्य असलेला जो ब्रह्मदेव त्याला जर या त्रिगुणांचा विभाग करितां आला नाहीं, तर मग इतरांची काय कथा ! त्याला या गुणांचें तत्त्वतः पृथक्करण कसें करितां येणार ! ११ अशा ज्या या त्रिगुणांच्या वृत्ति, त्यांची पूर्णपणें मलाहि निवड करितां येत नाहीं. यास्तव ध्वनित केलेलीं पदें देवानें श्लोकार्थानें सांगितलीं. १२ मागल्या तीन श्लोकांत तीन गुणांचीं पृथक् लक्षणें सांगितलीं. आतां त्यांचीं मिश्रलक्षणें सांगतों, ती सन्निपातवृत्ति आतां ऐक. ११३.

सन्निपातस्त्वहमिति ममेत्युद्धव या मतिः । व्यवहारः सन्निपातो मनोमात्रेन्द्रियासुभिः ॥ ६ ॥

गुणसन्निपातप्रकारू । एकचि जो कां अहंकारू । तो गुणसंगें त्रिप्रकारू । ऐक विचारू तयाचा ॥ १४ ॥ वर्णाश्रमविहित विलास । वेदाज्ञा पाळणें अवश्य । मी आत्मा जाण चिदंश । हा अहंविलास सात्विक ॥ १५ ॥ मी स्वधर्मकर्मकर्ता । मी स्वर्गादि सुखभोक्ता । मज पावती नानावस्था । या नांव अहंता राजस ॥ १६ ॥ मी देहधारी सुभट नर । मीचि कर्ता शत्रुसंहार । मी सर्वार्थीं अतिदुर्धर । हा अहंकार तामस ॥ १७ ॥ गुणानुसारें ममता जाण । त्रिविधरूपें स्फुरण । तेंचि अर्थीचें निरूपण । विशद श्रीकृष्ण सांगत ॥ १८ ॥ माझे हृदयींचा भगवंत । तोचि सर्व भूतीं हृदयस्थ । भूतें माझींच समस्त । हे ममता शोधित सत्वाची ॥ १९ ॥ भक्त संत साधु सज्जन । तेचि माझें सुहृज्जन । तेचि ऐशी जे ममता पूर्ण । उद्धवा जाण सत्वस्थ ॥ १२० ॥ जीवाहून परती । सद्गुरुचरणीं अतिप्रीती । ऐशी ममतेची जे जाती । ते जाण निश्चितीं सात्विक ॥ २१ ॥ ज्या देवाची उपासकता । शैवी वैष्णवी दीक्षितता । देवीं धर्मीं पूर्ण ममता । तें जाण सात्विकता सत्वस्थ ॥ २२ ॥ शैवी वैष्णवी धर्ममता । दंभरहित निष्कामता । ते ते सात्विकी ममता । ऐक अवस्था राजसाची ॥ २३ ॥ निवृत्तिमार्गे मानी लटिक । सत्य साचार लौकिक । लोकैषणेची ममता देख । ते आवश्यक राजसी ॥ २४ ॥ प्रवृत्तशास्त्रीं आवडी । लौकिकाची अतिगोडी । नामरूपांची उभवी गुडी । हे ममता रोकडी राजस ॥ २५ ॥ स्त्रीपुत्रें माझीं आवश्यक । शरीरसंबंधी आप्त लोक । द्रव्याची ममता निष्टंक । हे बुद्धि वोळख राजस ॥ २६ ॥ ज्या देवाची करितां भक्ती । नाम रूप जोडे

—विभक्त गुणांच्या वृत्ति सांगितल्या, आतां तीन श्लोकांनीं मिश्र गुणांचा सन्निपात सांगतात—

अहं इति मम इति या मतिः सः सन्निपातः–मी शांत, कामी, क्रोधी इत्यादि व मला शांति आहे, काम आहे, क्रोध आहे इत्यादि बुद्धींना सन्निपातजन्यत्व असल्यामुळें 'मी' अशी 'माझी' अशी जी बुद्धि तोच सन्निपात होय. (तत्पूर्वक सर्व व्यवहार हें त्या सन्निपाताचें कार्य आहे, असें आतां सांगतात–) **मनोमात्रेन्द्रियासुभिः व्यवहारः सन्निपातः**– मन, भूतमात्रा, इंद्रियें आणि प्राण यांनीं होणारा जो व्यवहार तोच सन्निपात होय. [मन इत्यादिक सात्विक, राजस, व तामस असल्यामुळें त्यांनीं होणारा व्यवहार सन्निपातजन्य आहे, असा याचा भावार्थ.] ६.

गुणसन्निपाताचा प्रकार म्ह० एकच अहंकार गुणांच्या संगानें तीन प्रकारचा झाला आहे. त्याचा विचार आतां ऐक. १४ वर्णाश्रमांनीं नेमून दिलेलें आचरण करून वेदाज्ञेप्रमाणें वागून मीच ज्ञानस्वरूप आत्मा आहें, असें जाणणें हा सात्विक अहंकाराचा प्रकार होय. १५ मी स्वधर्माप्रमाणें कर्म करणारा, मी स्वर्गादि सुख भोगणारा, मला अनेक अवस्था आहेत, हा राजस अहंकार होय. १६ मी देह धारण करणारा शूर योद्धा आहें, मी शत्रूंचा संहार करणारा आहें, मी सर्वप्रकारें दुर्जय आहें, हा तामस अहंकार होय. १७ सात्त्विक-राजस-तामस या तीन गुणांच्या अनुसार ममताहि तीन प्रकारची आहे. श्रीकृष्ण आतां तिचेंच स्पष्ट निरूपण करीत आहे. १८ 'माझ्या हृदयांत रहाणारा जो परमात्मा, तोच सर्व भूतांच्या हृदयांत आहे. यास्तव हीं सर्व भूतें माझींच आहेत' अशा प्रकारची ममता शुद्ध, सात्त्विक जाणावी. १९ हे उद्धवा! भक्त, साधु, संत, सज्जन हे सर्व माझे आप्त मित्र आहेत, अशी जी ममता तीहि सात्त्विक होय.२० जीवापेक्षांहि सद्गुरुचरणांवर अत्यंत प्रेम असणें हाहि सात्त्विद्मुतचा प्रकार आहे. २१ ज्या देवाची उपासना करावयाची त्याचीच शैवी किंवा वैष्णवी दीक्षा घेणें आणि देव व धर्म यांवर पूर्ण ममता ठेवणें ही सत्त्वस्थ सात्त्विकता जाण. २२ शैव-वैष्णव या दोन्ही धर्मांवर सारखी प्रीति व दंभरहित निष्कामता असणें ही सात्त्विक ममता होय. आतां राजस अवस्था ऐक. २३ निवृत्तमार्गाला मिथ्या समजणें, लौकिक तेवढा सत्य मानणें, लौकिकप्रतिष्ठेची आवड असणें ही राजस ममता झाली. २४ प्रवृत्तिशास्त्राची आवड, लौकिकाची अतिशय हौस, नाम-रूपांची कीर्ति परसविणें, २५ स्त्री-पुत्र, सोयरे-धायरे, आप्तइष्ट हीं सगळीं अवश्य माझींच आहेत, अशी बुद्धि असणें, द्रव्याची अत्यंत हांव ठेवणें, ही राजस ममता जाणावी. २६ ज्या दैवतांची भक्ति केली असतां

संपत्ती । तीं तीं दैवतें आवडती । हे ममता निश्चितीं राजस ॥ २७ ॥ काम्य कर्मीं आवडी देख । आप्त मानी सकामकर्मक । सत्य स्वर्गादि विषयसुख । हे ममता निष्टंक राजस ॥ २८ ॥ हे रजोगुणाची ममता । तुज म्यां सांगीतली तत्त्वतां । तमोगुणाची जे अवस्था । ऐक व्यवस्था सांगेन ॥ २९ ॥ आपुल्या देहासी जो हूंतूं करी । कां पूर्वपूर्वजांचा वैरी । त्यांच्या लेंकरांसीं वैर धरी । हे बुद्धि निष्ठुरी तामस ॥ १३० ॥ पुढें लेंकुरांचें लेंकुरीं । वृत्तिभूमि जीविकेवरी । आडवा येईल स्वगोत्री । त्यासी वैर धरीं तामस ॥ ३१ ॥ पूर्वापर माझे वैरी । मी निर्दाळीन संसारीं । यालागीं रिघे अभिचारीं । ते ममता खरी तामस ॥ ३२ ॥ अभिचारिकी जे मंत्रज्ञ । ते मानीं माझे आप्त स्वजन । शाकिनीडाकिनीउपासन । हे ममता संपूर्ण तामसी ॥ ३३ ॥ असो बहुसाल व्युत्पत्ती । एकेक गुणीं अनंत शक्ती । हे तिन्ही जेथ मिश्र होती । सन्निपातवृत्ती या नांव ॥ ३४ ॥ कफ वात आणि पित्त । तिन्ही एकत्र जेथ होत । तेथ उपजे सन्निपात । तेवीं सन्निपात येथ त्रिगुणांचा ॥ ३५ ॥ संकल्पविकल्पात्मक मन । पंच विषय पंच प्राण । दशेंद्रियीं व्यवहार संपूर्ण । तेथ उपजे त्रिगुणसन्निपात ॥ ३६ ॥ तेंच सन्निपातनिरूपण । त्रिगुणांचें मिश्रलक्षण । स्वयें सांगताहे श्रीकृष्ण । मिश्रगुणसन्निपातू ॥ ३७ ॥

धर्मे चार्थे च कामेच यदाऽसौ परिनिष्ठितः । गुणानां सन्निकर्षोऽयं श्रद्धारतिधनावहः ॥ ७ ॥

पुरुषाच्या ठायीं क्रियाकर्म । क्षणें स्वधर्म क्षणें काम । क्षणें वाढवी अर्थोद्यम । हा संक्रम त्रिगुणांचा ॥ ३८ ॥ गुण संक्रमून करी काय । त्रिगुणीं धर्म त्रिविध होय । कामही त्रिविध होऊनि ठाय । अर्थस्वार्थनिर्वाह त्रिगुणात्मक ॥ ३९ ॥ येथ कर्मासी दोष नाहीं । दोष कर्त्याचे बुद्धीच्या ठायीं ।

नांव-लौकिक व संपत्ति प्राप्त होते, तीं दैवतें प्रिय वाटणें ही राजस ममता होय. २७ काम्यकर्मांची आवड असणें, सकाम कर्मे करणारांस आप्त मानणें, स्वर्गादि विषयसुख सत्य मानणें, ही ममता अत्यंत राजस समजावी. २८ ही रजोगुणाची ममता तुला मीं तत्त्वतः सांगितली. आतां तमोगुणाच्या ममतेचें लक्षण सांगतों तें ऐक. २९ जो आपल्याच देहाची हेटाळणी करणारा, मागील पूर्वजांचा वैरी व त्यांच्या संततीशींहि वैर करणारा, तो निष्ठुर तामसबुद्धि होय. १३० पुढें त्यांच्या व आपल्या मुला-बाळांशीं आपलाच एखादा गोत्रज वृत्तीसाठीं कलह करील म्हणून त्यांच्याशीं जो वैर धरितो, तोहि तामस होय. ३१ 'असे जे माझे पिढ्यानुपिढ्याचे वैरी त्यांचा मी या संसारांत नाश करीन' अशा निश्चयानें जो जारण-मारणादि कर्मांत प्रवृत्त होतो, ही खरोखर तामस ममता होय. ३२ जारण-मारणादिकांच्या मंत्रज्ञांना स्वतःचे आप्त-इष्ट समजणें व शाकिनी-डाकिनींची उपासना करणें ही पूर्णपणें तामस ममता होय. असो. ३३ असे या गुणांचे पुष्कळ प्रकार आहेत. एकेका गुणांत अपार शक्ति आहे. हे तीन्ही गुण जेथें मिश्र होतात, त्याला सन्निपातवृत्ति म्हणतात. ३४ शरीरांत कफ, वात, पित्त हे तीन्ही एकदम उद्भवले असतां जसा सन्निपात होतो तसा हा तीन गुणांचा सन्निपात होय. ३५ संकल्प-विकल्पात्मक मन, पांच विषय, पांच प्राण, दहा इंद्रियांच्या योगानें होणारा सर्व व्यवहार, यांपासून होणारें सर्व कार्य म्हणजे त्रिगुणसन्निपात होय. ३६ आतां त्याच सन्निपाताचें निरूपण करितात. तीन गुणांचें मिश्रलक्षण असा जो मिश्रगुणसन्निपात तोच स्वतः श्रीकृष्ण सांगत आहे. १३७.

असौ यदा धर्मे च अर्थे च कामे च परिनिष्ठितः भवति तदा अयं गुणानां सन्निकर्षः—हा पुरुष ज्यावेळीं धर्म, अर्थ व काम यांमध्यें सर्वथा स्थिर होतो, तेव्हां हा धर्मादिनिष्ठारूप गुणांचा सन्निकर्ष आहे. (धर्मादिकांना सत्त्व, तम व रज यांचें कार्यत्व असल्यामुळें विषयतः सन्निपातजत्व सांगितलें. आतां फलतः सन्निपातजत्व सांगतात–) **श्रद्धारतिधनावहः**—सत्त्व रजस्तमोमय श्रद्धा, रति व धन यांना प्राप्त करून देणारा हा सन्निपात आहे. ७.

पुरुषाच्या मनांत क्षणांत क्रिया, क्षणांत कर्म, क्षणांत स्वधर्म, क्षणांत काम, क्षणांत द्रव्यार्जनाचा उद्योग; या भिन्न-भिन्न वृत्ति उद्भवणें हाच त्रिगुणांचा सन्निपात होय. ३८ या गुणांच्या मिश्रणानें काय होतें म्हणाल, तर तीन गुणांनीं धर्म तीन प्रकारचा होतो. काम तीन प्रकारचा होतो व अर्थ-स्वार्थ-निर्वाह हीं सगळीं त्रिविध होतात. ३९

तो जे कल्पना करील कांहीं । तें फळ पाहीं स्वयें भोगी ॥ १४० ॥ सोनें वंद्य सोनेपणें । त्याचें स्वयें घडविल्या सुणें । वंद्य तेंचि निंद्य करणें । तेवीं स्वकर्म दूषणें गुणबुद्धी ॥ ४१ ॥ भूमि सहजें शुद्ध आहे । जें पेरिजे तें पीक होये । तेवीं स्वकर्म शुद्ध स्वयें । फलभोगू लाहे गुणवृत्ती ॥ ४२ ॥ वाचा सहज सरळ गोमटी । रामनामें जोडे ब्रह्मपुष्टी । वृथा जाय करितां चावटी । भोगी निंदेपाठीं महापाप ॥ ४३ ॥ तेवीं स्वधर्म श्रद्धायुक्त । पुरुषास करी विरक्त । तेथ त्रिगुणांचा सन्निपात । श्रद्धा छळित तें ऐक ॥ ४४ ॥ स्वधर्मकर्मीं श्रद्धा जोडे । क्षणैक लागे विरक्तीकडे । क्षणें भोगफळाशा वाढे । क्षणैक पडे ममतासंधीं ॥ ४५ ॥ तैशीच कामाचीही रती । क्षणैक निष्कामी अतिप्रीती । क्षणे स्त्रीभोगआसक्ती । क्षणे कामरति परद्वारीं ॥ ४६ ॥ याचिपरी धनाची जोडी । क्षणैक द्रव्याशा सोडी । क्षणैक अर्थाची अतिगोडी । क्षणैक आसुडी परद्रव्य ॥ ४७ ॥ त्रिविध धर्म त्रिविध कर्म । त्रिविध रूपें धनागम । या गुणवृत्तीस्तव स्वधर्म । सांडूनि अकर्म करी प्राणी ॥ ४८ ॥ एवं धर्मअर्थकामाआंत । गुणसन्निपात अनंत । फोडूनि सांगतां येथ । वाढेल ग्रंथ अनिवार ॥ ४९ ॥ यालागीं गुणसन्निपात । सांगीतला संकलित । तेंचि अर्थीं श्रीकृष्णनाथ । असे सांगत संक्षेपें ॥ १५० ॥

प्रवृत्तिलक्षणे निष्ठा पुमान्यर्हि गृहाश्रमे । स्वधर्मे चानुतिष्ठेत गुणानां समितिर्हि सा ॥ ८ ॥

यांत कर्माचा कांहीं दोष नाहीं. कर्त्याच्या बुद्धीचा सगळा दोष आहे. तो जी कल्पना करितो, त्याचें फल स्वतः भोगितो. १४० सोनें मूळच्या आपल्या सोनेंपणानें पवित्रच आहे, पण त्या सोन्याचें जर कुत्रें घडविलें तर त्याच पवित्र वस्तूला अपवित्रपणा येतो. त्याप्रमाणें स्वकर्म गुणबुद्धीनें दूषित होतें. ४१ जमीन मूळची शुद्धच असते, पण त्यांत जें पेरावें तें उगवतें. त्याप्रमाणें स्वकर्म स्वभावतः शुद्धच आहे. पण गुणांच्या वृत्तीप्रमाणें त्याचें फल मिळतें. ४२ आपली वाणी स्वभावतः सरळ व शुद्ध आहे; तिनें रामनामाचा उच्चार केल्यास ब्रह्मसुख लाभतें; परंतु ती जर व्यर्थ चावटपणाची वटवट करीत बसली तर त्या निंदेचें महापातक भोगावें लागतें! ४३ त्याचप्रमाणें श्रद्धेनें धर्माचरण केलें असतां पुरुषाला विरक्ति प्राप्त होते. परंतु त्यांत त्रिगुणांचा सन्निपात झाला असतां तीच श्रद्धा कशी छळूं लागते, तें ऐक. ४४ स्वधर्मकर्मांत श्रद्धा उत्पन्न होते. त्यामुळें क्षणिक विरक्ति येते, क्षणांत फलाशा वाढते, क्षणांत साधक ममतेच्या संधींत सांपडतो. ४५ कामाचा प्रकारहि तसाच आहे. क्षणांत निष्कामता अत्यंत वाढते. तर क्षणांत स्त्रीसंगाची आसक्ति उत्पन्न होते व क्षणांत परस्त्रीची लालसा अनावर होते. ४६ धनसंपादनहि अशाच प्रकारचें आहे. क्षणांत द्रव्यसंग्रहाची आवड; तर क्षणांत द्रव्याची आशा सोडणें, क्षणांत द्रव्याचा अत्यंत लोभ व परद्रव्य हरण करण्याचीहि तयारी (अशी चंचल वृत्ति बनते.) ४७ धर्म तीन प्रकारचे आहेत. कर्में तीन प्रकारचीं आहेत. द्रव्यार्जनाचे प्रकारहि त्रिविध आहेत. या गुणवृत्तीच्या भेदामुळेंच लोक स्वधर्म सोडून अधर्मांत प्रवृत्त होतात. (धर्म सात्त्विक; अर्थ तामस आणि काम राजस होय. त्याची श्रद्धा, रति व द्रव्य हीं क्रमानें फलप्राप्ति आहे. मनुष्य धर्म-अर्थ काम या तीन गोष्टींत आसक्त होतो. तें सन्निपाताचें कार्य समजावें.) ४८ याप्रमाणें धर्म-अर्थ-काम यांमध्यें अनंत गुणसन्निपात आहेत. त्या सर्वांचें स्पष्टीकरण करूं गेल्यास ग्रंथविस्तार फार होईल. ४९ म्हणून हा गुणसन्निपात थोडक्यांत सांगितला. श्रीकृष्णनाथ पुनः त्याच अर्थाचें निरूपण संक्षेपानें करीत आहे. १५०.

—धर्मनिष्ठेंतील सन्निपात दाखवितात—

यर्हि (पुंसः) प्रवृत्तिलक्षणे निष्ठा—जेव्हां पुरुषाची काम्य कर्मामध्यें निष्ठा असते, **(तथा) यर्हि पुमान् गृहाश्रमे तिष्ठेत अनु स्वधर्मे च (तिष्ठेत) सा गुणानां समितिः**—त्याचप्रमाणें जेव्हां पुरुष गृहस्थाश्रमांतच आसक्त होऊन रहातो व मागून नित्य-नैमित्तिक स्वधर्मामध्यें रहातो, तेव्हां तोहि गुणांचा सन्निपातच होय. [कारण काम्यकर्म,, गृहासक्ति व स्वधर्म हे रजस्तमःसत्त्वमय आहेत.] ८.

पुरुषासी जो गृहाश्रम । तो जाणावा केवळ काम । तेथ नित्यनैमित्तिक कर्म । हा स्वधर्म चित्त-शुद्धी ॥ ५१ ॥ गृहाश्रमीं हिंसा पंचसून । यालागीं तमोगुण प्रधान । गृहीं स्त्रीभोग पावे जाण । रजो-गुण या हेतू ॥ ५२ ॥ नित्यनैमित्तिक स्वधर्म । हें गृहस्थाचें निजकर्म । हें चित्तशुद्धीचें निजवर्म । सत्व सुगम या हेतू ॥ ५३ ॥ गृहाश्रमप्रवृत्ति जाण । सदा मिश्रित तिनी गुण । गुणीं गुणवंत करून । कर्माचरण करविती ॥ ५४ ॥ न रंगतां तेणें रंगें । स्फटिक तद्रूप भासों लागे । तेवीं गुणात्मा गुणसंगें । वर्तो लागे गुणकर्मीं ॥ ५५ ॥ जेवीं का कसवटी आपण । कसूनि दावी सुवर्णवर्ण । तेवीं पुरुषाची क्रिया जाण । दावी गुणलक्षणविभाग ॥ ५६ ॥

पुरुषं सत्त्वसंयुक्तमनुमीयाच्छमादिभि : । कामादिभी रजोयुक्तं क्रोधाद्यैस्तमसा युतम् ॥ ९ ॥

इंद्रियनिग्रहो यथोचित । जो शमदमीं सदा क्रीडत । शांति वसे जयाआंत । तो जाण निश्चित सात्विक ॥ ५७ ॥ जो सदा फळकामें कामुक । वांछी संसारभोगसुख । द्रव्यार्थी अतिदांभिक । रजो-गुणी लोक तो जाण ॥ ५८ ॥ ज्यासी स्वधर्मीं नाहीं रती । आवडे अधर्मप्रवृत्ती । क्रोधलोभें गिळिली स्फूर्ती । तो जाण निश्चितीं तामसू ॥ ५९ ॥ एवं देखोनि कर्माचरण । लक्षिजे पुरुषलक्षण । या नांव गा अनुमान । विवेकसंपन्न जाणती ॥ १६० ॥ सामान्यतः तिन्ही गुण । सांगीतलें निरूपण । हें न कळे म्हणेल मन । गुणवृत्ति भिन्न अवधारीं ॥ ६१ ॥

पुरुषाचा गृहस्थाश्रम वास्तविक कामच आहे. त्यांत चित्तशुद्धीसाठी नित्य नैमित्तिक कर्मे करणें हा स्वधर्म होय. ५१ गृहस्थाच्या घरांत कांडणें, दळणें, चूल पेटविणें, पाणी भरणें व झाडणें हीं कामें करिते वेळीं जाणतें-नेणतेपणानें जीवजंतूंची हिंसा होते. त्याला पंचसूनादोष म्हणतात. गृहस्थाश्रमांत पंचसूना दोष घडतात. त्यांत तमोगुणच मुख्य आहे, गृहस्थ स्त्रीसुखहि अनुभवितो, तेव्हां रजोगुणहि त्यांत आहे. ५२ नित्य-नैमित्तिक कर्मे करणें व स्वधर्म आचरणें हेंच गृहस्थाचें मुख्य कर्म आहे. हेंच चित्तशुद्धीचें रहस्य व मुख्य सात्त्विक साधन होय. गृहस्थाश्रमी पुरुषाची प्रवृत्ति नेहमी या तीन गुणांनीं मिश्र असते. ते गुणच त्याला गुणयुक्त करून त्याच्या-कडून कर्माचरण करवितात. ५४ स्फटिक कोणत्याहि रंगानें रंगित होत नाहीं. पण त्या त्या रंगाचा जसा भासतो, तसा गुणांच्या संगतींत गुणात्मक जीवहि गुणकर्मामध्यें वागूं लागतो. ५५ ज्याप्रमाणें कसोटी सोन्याच्या कसाला लावून त्यांतील हीनत्व व शुद्धत्व दाखवितें त्याप्रमाणें राजस काम्यधर्म तामस गृहासक्ति व सात्त्विक स्वधर्माचरण हें सन्निपात कार्य पुरुषाच्या गुणलक्षणांचा विभाग करून दाखवितें. ५६.

—याप्रमाणें मिश्र व अमिश्र गुणवृत्ति दाखवून आतां ' पुरुष ज्या गुणानें जसा होतो ' असें जें म्हटलें आहे, तेंच पुढील तीन श्लोकांनीं सांगतात—

शमादिभिः पुरुषं सत्त्वसंयुक्तं अनुमीयात्—शमादिकांवरून पुरुष सत्त्वसंयुक्त आहे, असें अनुमान करावें. **कामादिभिः रजोयुक्तं क्रोधाद्यैः तमसा युतं**—कामादिकांवरून तोरजोयुक्त आहे व क्रोधादिकांवरून तो तमोयुक्त आहे असें अनुमान करावें. ९

जो योग्यप्रकारें इंद्रियनिग्रह करितो, शम-दम ज्याच्या हातांतील खेळणें होतें, ज्याच्या अंगीं पूर्ण शान्ति वसत असते, तो निश्चयानें सात्त्विक जाणावा. निरंतर फलाशेचा लोभ असणें, संसारांतील सुखोपभोगाची इच्छा करणें, द्रव्यार्थित्व व अतिदांभिकता, ही रजोगुणी लोकांची वृत्ति जाणावी. ५८ स्वधर्माची नावड, अधर्म प्रवृत्तीची अत्यंत आवड व क्रोधलोभानें ग्रासिलेली वृत्ति निश्चयानें तामस जाणावी. ५९ याप्रमाणें पुरुषाचें कर्माचरण पाहून त्यावरून त्याच्या गुणाचें लक्षण ओळखिणें याला अनुमान म्हणतात. विवेकसंपन्न लोक तें चांगलें जाणतात. १६० या तीन्ही गुणांचें सामान्यतः निरूपण केलें. पण तें कळलें नाहीं, असें जर तुझें मन म्हणेल तर त्या गुणांच्या भिन्नभिन्न वृत्ति ऐक. १६१.

यदा भजति मां भक्त्या निरपेक्षः स्वकर्मभिः । तं सत्त्वप्रकृतिं विद्यात्पुरुषं स्त्रियमेव वा ॥ १० ॥

स्वकर्मीं वांछित फळ । तेंचि मायेचें दृढ पडळ । ते फळाशा सांडोनि केवळ । जे भजनशीळ मद्रूपीं ॥ ६२ ॥ करूनि फळाशेचें शून्य । स्वधर्में करिती माझें भजन । पुरुष अथवा स्त्रिया जाण । ते सत्त्वसंपन्न निश्चित ॥ ६३ ॥ देहावयवलिंगदर्शन । तेणें स्त्रीपुरुषनामाभिधान । परी आत्मीं आत्मा नाहीं जाण । जीवत्व समान स्त्रीपुरुषीं ॥ ६४ ॥ चित्तवृत्तिक्रियाचरण । त्या नांव गा कर्म जाण । तेथ निरपेक्ष तें माझें भजन । स्वधर्म संपूर्ण या नांव ॥ ६५ ॥ ऐशिया स्वधर्मवृत्ती । जेथ प्रकटे माझी भक्ती । ते ते सात्विक प्रकृती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ६६ ॥ आशंका ॥ कर्म करितांफळाशा वाढे । तो फळभोग भोगणे पडे । स्वकर्में भक्तिकेवीं घडे । कर्म तें कुडें अत्यंत ॥ ६७ ॥ कर्म करितां फळ बाधक । न करितां प्रत्यवाय नरक । कर्में कर्मबद्ध लोक । केले देख संसारीं ॥ ६८ ॥ जीव होता जो स्वतंत्र । तो कर्में केला परतंत्र । एवढें कर्माचें चरित्र । अतिविचित्र बाधक ॥ ६९ ॥ स्वकर्में भगवद्भक्ती । म्हणशी घडे कैशा रीतीं । तोचि अर्थीची उपपत्ती । स्वयें श्रीपति सांगत ॥ १७० ॥ सर्प धांवोनि धरिल्या तोंडीं । तो सर्वांगीं घाली आढी । तेणें धाकें जो सोडी । तरी तो विभांडी महाविखें ॥ ७१ ॥ ते सर्पबाधेची सांकडी । निवारी मंत्रवादी गारुडी । तेवीं कर्मीं कर्मबाधा गाढी । निवारी रोकडी गुरुरावो ॥ ७२ ॥ रिघतां सद्गुरूसी शरण । कर्म करवी ब्रह्मार्पण । हेंचि निरपेक्षलक्षण । उद्धवा जाण निश्चित ॥ ७३ ॥ ब्रह्म कर्माचें प्रकाशक । कर्म तितुके ब्रह्मात्मक । हेंचि मदर्पण चोख । माझें भजन देख या रीतीं ॥ ७४ ॥ सर्वेंद्रियीं ज्ञानस्फूर्ती । ते ब्रह्मीची ब्रह्मशक्ती । ऐसेनि निश्चियें कर्मस्थिती । स्वकर्मभक्ति या नांव ॥ ७५ ॥ ऐसेनि स्वकर्में स्वाभाविक । जे मज भजती भाविक । ते ते शुद्ध सात्विक

यदा स्वकर्मभिः निरपेक्षः भक्त्या मां भजति तदा तं पुरुषं स्त्रियं एव वा सत्त्वप्रकृतिं विद्यात्—जेव्हां पुरुष स्वधर्मरूप कर्मांनीं, फलाची इच्छा न करितां, भक्तीनें माझें भजन करितो तेव्हां त्या पुरुषाला व स्त्रीलाहि सत्त्वप्रकृति जाणावें. १०.

स्वकर्म आचरीत असतां फळाची आशा धरणें हेंच मायेचें पटल होय. ती फलाशा सोडून, मत्स्वरूप होऊन माझ्या भजनांत तत्पर होणारे, ६२ व फलाशेला शून्य करून स्वधर्मानें माझें भजन करणारे स्त्री-पुरुष निश्चयानें सत्त्वसंपन्न जाणावे. ६३ स्त्री-पुरुष हा भेद त्यांच्या देहावयवांवरून झालेला आहे. त्या बाह्य चिन्हावरून त्यांस स्त्री किंवा पुरुष हें नांव प्राप्त होतें; परंतु स्त्री-पुरुषांमध्यें जीवभाव सारखाच असतो. त्यांत आत्मा व आत्मी असा भेद नाहीं. ६४ एकाग्र चित्तानें जी क्रिया आचरिली जाते, त्याला कर्म असें म्हणतात. त्यांत निरपेक्षपणें माझें भजन करणें हाच स्वधर्म होय. ६५ जेथें अशी धर्मवृत्ति असते तेथें माझी भक्ति प्रकट होते. उद्धवा ! ही सात्त्विक प्रकृति जाणावी. ६६ (आशंका) कर्म केलें असतां फलाशा वाढते, मग तें फल भोगावें लागतें; तेव्हां स्वकर्मानें भक्ति कशी घडते ! कारण कर्म तर अत्यंत दोषयुक्त आहे. ६७ कर्म करावें तर त्याचें फल बाधक होतें, बरें न करावें तर प्रत्यवायप्राप्तीनें नरक भोगावा लागतो ! कर्मानेंच लोकांना कर्मबद्ध करून संसारीं बनविलें आहे. ६८ स्वतंत्र असलेल्या जीवाला कर्मांनींच परतंत्र बनविलें आहे कर्मांचें हें चरित्र अतिशय विचित्र व बाधक आहे. ६९ स्वकर्मानें भगवद्भक्ति कशी घडते, म्हणून म्हणशील तर त्या विषयींची उपपत्ति श्रीहरि स्वतः सांगत आहे. एखाद्यानें धांवत जाऊन सर्पाचें तोंड धरिल्यास तो आपल्या हाताला सगळ्या अंगाचा विळखा घालितो. बरें त्याचें तोंड सोडावें. तर तो दंश करून आपल्या घातक विषानें नाश करितो; ७१ परंतु मंत्र जाणणारा गारुडी या सर्पबाधेच्या संकटाचें निवारण करूं शकतो, तसा सद्गुरुराय ही गाढ कर्मबाधा तत्काल नाहींशी करितो. ७२ सद्गुरूला शरण गेलें असतां तो कर्में ब्रह्मार्पण करवितो. उद्धवा ! हेंच निष्काम बुद्धीनें भगवत्सेवा करणाऱ्या सत्त्वगुणांचें लक्षण आहे, असें खात्रीनें जाण. ७३ ब्रह्म कर्माचें प्रकाशक आणि कर्म तेवढें ब्रह्मात्मक आहे, हेंच खरें मदर्पण कर्म होय. अशा रीतीनें माझें भजन करावें. ७४ सर्व इंद्रियांत ज्ञानाची स्फूर्ति होणें हीच ब्रह्माची ब्रह्मशक्ति आहे. अशा निश्चयानें कर्माचरण करणें यालाच स्वकर्मभक्ति असें म्हणतात. ७५ उद्धवा ! अशा स्वाभाविक स्वकर्मानें जे भाविक जन माझें भजन करितात, ते अत्यंत शुद्ध, सात्त्विक भक्त

लोक । जाण निश्चंक उद्धवा ॥ ७६ ॥ स्वधर्म सर्वथा निष्फळ । म्हणती ते मूर्ख केवळ । स्वधर्म निरसी चित्तमळ । कर्म समूळ निर्दळी ॥ ७७ ॥ एवढी स्वधर्माची जोडी । सांडूनि वांछिती विषयगोडी । तें तें राजसें बापुडीं । केवळ वेडीं विषयार्थीं ॥ ७८ ॥ विषयफळ वांच्छितां देख । देह धरणें आवश्यक । देहसंभव दुःखदायक । स्वर्गनरकफळ भोगी ॥ ७९ ॥ यापरी जनीं दुःखदाती । राजसतामसप्रकृती । ऐक त्या दोनी गुणवृत्ती । विशद तुजप्रती सांगेन ॥ १८० ॥

यदा आशिष आशास्य मां भजेत स्वकर्मभिः । तं रजःप्रकृतिं विद्याद्धिंसामाशास्य तामसम् ॥ ११ ॥

जो कां आचरोनि स्वधर्म । वांछी नाना फळकाम । तें तें जाण काम्य कर्म । राजस धर्म या नांव ॥ ८१ ॥ जो अभ्यंतरीं अतिसकाम । तो जे जे आचरे कर्मधर्म । ते ते अवघेचि सकाम । फळसंभ्रम निजहेतू ॥ ८१ ॥ स्वरूपीं काम्य कर्म नाहीं । कामना काम्य करी पाहीं । सोनें स्वभावें असे ठायीं । लेणें उपायीं स्वयें कीजे ॥ ८३ ॥ स्वकर्म स्वभावें पवित्र जाण । स्वधर्में माझें शुद्ध भजन । तेथ कामनाफळ कामून । काम्य आपण स्वयें कीजे ॥ ८४ ॥ फळकामें जें माझें यजन । तें केवळ फळाचेंचि भजन । सकामें जें स्वधर्माचरण । ते प्रकृति जाण राजस ॥ ८५ ॥ ऐसऐशिये प्रकृतीचा विलास । स्त्री अथवा हो कां पुरुष । तें तें जाण पां राजस । ऐक तासम गुणवृत्ति ॥ ८६ ॥ क्रोधयुक्त अंतःकरण । तेणेंसीं ज्याचें स्वधर्माचरण । फळ वांछी शत्रुमरण । ते प्रकृति जाण तामसी ॥ ८७ ॥ जेथें द्वेषें बांधलें घर । जे ठायीं क्रोध अनिवार । जो भूतमात्रीं निष्ठुर । ज्याची प्रकृति क्रूर सर्वदा ॥ ८८ ॥ ऐशिया स्वभावावरी । नर अथवा हो कां नारी । ते ते तामस संसारीं । निजनिर्धारीं उद्धवा ॥ ८९ ॥ जीव

होत, असें निश्चयानें जाणावें. ७६ स्वधर्म सर्वथा निष्फळ आहे, असें जे म्हणतात ते केवल मूर्ख होत. स्वधर्मच चित्ताचा मल नाहींसा करून कर्माचें समूळ निरसन करितो. ७७ स्वधर्मापासून होणारा एवढा मोठा लाभ टाकून जे विषयांची चव इच्छितात ते बापडे राजस लोक केवल विषयांसाठीं वेडे होतात. ७८ विषयांच्या फलाची इच्छा केली असतां देह धारण करणें प्राप्त होतें. ती देहधारणा दुःखदायक असून त्यामुळें स्वर्ग, नरक इत्यादि फलें भोगावीं लागतात. ७९ अशाप्रकारें जगांतील राजस-तामस प्रकृति दुःख देणाऱ्या आहेत. त्या दोन्ही गुणवृत्ति तुला अधिक स्पष्ट करून सांगतों, ऐक. १८०.

यदा आशिषः आशास्य स्वकर्मभिः मां भजेत तं रजःप्रकृतिं विद्यात् —जेव्हां विषयांचा अभिलाष धरून धरून स्वकर्मांनीं माझें भजन करितो, तेव्हां त्याला रजःप्रकृति समजावें, **हिंसां आशास्य तामसं**—जेव्हां शत्रूंच्या मरणादिकांची इच्छा करून स्वकर्मांनीं माझें भजन करितो, तेव्हां तामस समाजावें. [तात्पर्य या गुणांनीं तो तसा होतो.] ११.

स्वधर्माचरण करून जो अनेकप्रकारच्या फलाची इच्छा करितो, त्याचें तें काम्य कर्म होय. यालाच राजसधर्म म्हणतात. ८१ जो चित्तांत अतिशय सकाम असतो, तो जेवढें कर्मधर्म आचरितो, तेवढें सगळें सकाम असतें. त्यांत कर्माचें फल मिळावें हाच त्याचा हेतु असतो. ८२ कर्माच्या मूळ स्वरूपांत काम्यत्व नसतें; परंतु कामना त्याला काम्य कर्म बनविते. सोनें आपल्या स्वरूपांतच स्थित असतें, पण त्याचे दागिने घडवावयाचे झाल्यास ते जसे उद्योग करूनच तयार करावे लागतात, ८३ त्याप्रमाणें स्वकर्म स्वभावतःच पवित्र आहे. स्वधर्मानें माझें शुद्ध भजन करितेवेळीं त्याच्या इष्ट फलाची कल्पना करून आपण स्वतःच त्याला काम्यकर्म बनवितों. ८४ फलाच्या इच्छेनें जें माझें भजन तें वास्तविक फलाचेंच भजन होय. असें जें सकाम स्वधर्माचरण, तें राजस प्रकृतीचें लक्षण समजावें. ८५ असे जे प्रकृतीचे विलास, ते स्त्रीचे असोत किंवा पुरुषाचे असोत ते सर्व राजस समजावे. आतां तामस गुणवृत्तींचा प्रकार ऐक—८६ क्रोधयुक्त अंतःकरणानें जो स्वधर्माचरण करितो आणि 'शत्रूचें मरण' हेंच त्याचें फल इच्छितो त्याच्या तामस प्रकृतीचें तें लक्षण जाणावें. ८७ जेथें द्वेषानें घर केलें तेथें अनिवार क्रोध सतत नांदत असतो. ज्याची प्रकृति निरंतर क्रूर असते, तो भूतमात्राविषयीं निष्ठुर असतो. ८८ उद्धवा ! अशा स्वभावाचे जे स्त्री-पुरुष असतात, ते संसारांत तामस होत, हें निश्चित समज. ८९ 'जीव तरी ब्रह्मस्वरूपच आहे. तेव्हां देव त्याला तूं भजन कर असें कां सांगता ! जीवाकडे

स्वरूपें चैतन्य पहा हो। त्यासी भज कां म्हणे देवो। जीवासी कां सेवकभावो। सेव्य देवो कैसेनी॥ १९०॥ येच अर्थींचें निरूपण। कृष्ण सांगताहे आपण। सेव्यसेवकलक्षण। मायागुणसंबंधें॥ ९१॥

सत्त्वं रजस्तम इति गुणा जीवस्य नैव मे। चित्तजा यैस्तु भूतानां सज्जमानो निबध्यते॥ १२॥

बांधोनि नाणिता आया। जेवीं देहाधीन असे छाया। तेवीं भगवंताधीन माया। नातळोनियां वर्तवी॥ ९२॥ माया वर्तविता निवर्तविता। स्वामी भगवंत तत्त्वतां। यालागीं मायाअध्यक्षता। त्यासीचि सर्वथा वेद बोले॥ ९३ सूर्य अंधारातें नाशी। परी तो संमुख न ये त्यापाशीं। तेवीं मायानियंता हृषीकेशी। परी माया देवासी दृष्ट नव्हे॥ ९४॥ माझें जें देखणेपण। तेंचि मायेचें मुख्य लक्षण। मजपाशीं माया जाण। गुणाभिमानेंसीं नाहीं॥ ९५॥ मायाबिंबित चैतन्य। त्यासी बोलिजे जीवपण। त्या जीवासी त्रिगुणीं बांधोन। देहाभिमान दृढ केला॥ ९६॥ जीवासी लागतां देहाभिमान। तो झाला मायाधीन। मायानियंता नारायण। तो स्वामी जाण जीवाचा॥ ९७॥ जीव गुणाभिमानें बद्धक। यालागीं झाला तो सेवक। आत्मा गुणातीत चोख। बंधमोचक जीवाचा॥ ९८॥ यापरी सेव्यसेवकभावो। विभाग दावोनियां पहा वो। त्रिगुणगुणांचा अन्वयो। विशद देवो स्वयें सांगे॥ ९९॥ गुण तिन्ही समसमान। त्यांमाजीं शोभोनियां जाण। जो जो वाढे अधिक गुण। तें तें लक्षण हरि सांगे॥ २००॥ ब्रह्म निर्मळत्वें प्रसिद्ध। कर्म शोधकत्वें अतिशुद्ध। येथ कर्मीं उपजे कर्मबाध।

सेवकभाव कां आला व देव थोर कशानें झाला! १९० मायेच्या गुणसंबंधानें सेव्य-सेवकभाव कोणाकडे कसा येतो!' याच अर्थाचें निरूपण करून श्रीकृष्ण आतां सांगत आहे. १९१.

—पण हे भगवन्, गुणवशात् जीवाप्रमाणेंच तुलाहि जर कर्तृत्व आहे तर तूं सेव्य व जीव सेवक हा नियम कोणत्या विशेषामुळें आहे कीं, ज्यासाठीं तूं मला भज, असें वारंवार सांगतोस! उत्तर—

सत्त्वं रजः तमः इति गुणाः जीवस्य एव न एव मे—सत्त्व, रज आणि तम हे गुण जीवाचेच आहेत, माझे नाहींत. कारण, चित्तजाः—ते जीवाची उपाधि जें चित्त त्यामध्यें अभिव्यक्त होतात. म्हणून, यैः तु भूतानां सज्जमानः निबध्यते—त्या गुणांच्या योगानें तोच बद्ध होतो कीं जो देहरूप व अन्य भूतांमध्यें आसक्त होतो. [मी कोणत्याहि भूतामध्यें आसक्त होत नाहीं. गुणांच्या नियंतृत्वानें सृष्ट्यादिकांचा कर्ता असूनहि नित्य मुक्तच आहे. असा जीवामध्यें व माझ्यामध्यें मोठा फरक आहे. किंवा अपंचीकृत भूतांचें कार्य असें जें चित्त त्यांच्यापासून सत्त्वादि गुण उत्पन्न होतात. म्हणून भूतें या उपाधीनें युक्त असलेल्या जीवाचेच ते गुण आहेत] १२.

छाया जशी मनुष्याच्या बरोबर बांधलेली नसूनहि देहाधीन असते, ती आपणच देहाबरोबर जात असते, तशी माया भगवानाच्या अधीन असून तो तिला स्पर्शहि न करितां आपल्याबरोबर वागवीत असतो. ९२ मायेला वागविणारा व तिला नाहींशी करणारा स्वामी भगवंतच आहे. म्हणूनच वेदानें त्याला गुणमायेचा नियंता म्हटलें आहे. ९३ सूर्य अंधाराचा नाश करितो, पण अंधार जसा सूर्याच्या समोर कधींहि येत नाहीं, त्याप्रमाणें मायेचें नियमन करणारा जरी परमात्मा आहे, तरी माया देवाच्या पुढें उभी रहात नाहीं. ९४ माझें जें देखणेंपण तेंच मायेचें मुख्य लक्षण आहे. माझ्यापाशीं माया गुणाभिमानासह रहात नाहीं. ९५ मायेंत प्रतिबिंबित झालेलें जें चैतन्य त्यालाच जीवपणा बोलतात. त्या जीवाला त्रिगुणांनीं बांधून देहाभिमान दृढ केला आहे. ९६ जीवाला देहाभिमान लागतांच तो मायेच्या अधीन झाला आणि मायेचा नियंता नारायण जीवाचा स्वामी झाला. ९७ जीव गुणाभिमानानें बद्ध असल्यामुळें तो सेवक झाला. आत्मा गुणातीत असल्यामुळें तो जीवाला जन्म-मरणांच्या बंधनापासून सोडविणारा झाला. ९८ अशा प्रकारें सेव्य-सेवकभावाचा विभाग दाखवून त्रिगुणांचा परस्पर संबंध देव स्पष्ट करून स्वतः सांगत आहे. ९९ तीन्ही गुण सम-समान आहेत. त्यांत ज्या ज्या गुणांचा क्षोभ होऊन, तो अधिक वाढतो, तें तें लक्षण हरि सांगत आहे. २०० ब्रह्म निर्मळ असल्याचें प्रसिद्धच आहे. कर्महि पवित्रपणानें शुद्धच आहे. असें

तो चित्तसंबंध गुणक्षोभें ॥ १ ॥ कर्मब्रह्मीं दोष नाहीं । दोष चित्तवृत्तीच्या ठायीं । तोही गुणक्षोभें पाहीं घाली अपायीं पुरुषातें ॥ २ ॥ येचि अर्थीचें निरूपण । सांगितलें मिश्रलक्षण । आतां वाढल्या एकेक गुण । गुणलक्षण तें ऐक ॥ ३ ॥ जो गुण वाढे अतिउन्नतीं । इतर त्या तळीं वर्तती । ते काळींची पुरुषस्थिती । उद्धवाप्रती हरि सांगे ॥ ४ ॥

यदेतरौ जयेत्सत्त्वं भास्वरं विशदं शिवम् । तदा सुखेन युज्येत धर्मज्ञानादिभिः पुमान् ॥ १३ ॥

समूळ फळाशा त्यागूनी । निर्विकल्प निरभिमानी । जो लागे स्वधर्माचरणीं । तैं रज तम दोनी जिणे सत्व ॥ ५ ॥ जैं भाग्याचें मरण उघडे । तैं हरिकथाश्रवण घडे । मुखीं हरिनामकीर्ति आवडे । तेणें सत्व वाढे अतिशुद्ध ॥ ६ ॥ कां दैवें जोडिल्या सत्संगती । श्रवणीं श्रवण लांचावती । वाचा लांचावे नामकीर्तीं । अतिप्रीतीं अहर्निशीं ॥ ७ ॥ ऐसऐशिया अनुवृत्ती । रज तम दोनी क्षण होती । सत्व वाढे अनुद्वेगवृत्ती । त्या सत्वाची स्थिति समूळ ऐक ॥ ८ ॥ भास्वरत्वें प्रकाश बहुळ । विशदत्वें अतिनिर्मळ । शिव म्हणिजे शांत सरळ । हें सत्वाचें केवळ स्वरूप मुख्य ॥ ९ ॥ हे सत्वाची सत्ववृत्ती । आतुडे ज्या साधकाहातीं । ते काळींची पुरुषस्थिती । ऐक तुजप्रती सांगेन ॥ २१० ॥ तैं विवेकाचें तारूं आतुडे । वैराग्याचें निजगुज जोडे । सर्वेंद्रियीं प्रकाश उघडे । शिगे चढे स्वधर्म ॥ ११ ॥ ते काळीं जन अधर्मता । गर्व अभिमान असत्यता । बलात्कारेंही शिकवितां । न करी सर्वथा अधर्म ॥ १२ ॥ निकट असतां दुःखसाधन । सात्विक सदा सुखसंपन्न । बलात्कारें क्षोभवितां मन । सात्विक जाण

असतां कर्मांमध्यें जो कर्मबंध उत्पन्न होतो, तो गुणक्षोभानें झालेला चित्ताचा संबंध होय. १ कर्म आणि ब्रह्म हीं दोषरहित आहेत; पण चित्तवृत्तींत दोष आहे. तोहि गुणक्षोभानें मनुष्याला अनर्थांत टाकितो. २ याच अर्थाचें निरूपण करून मीं गुणांचें मिश्र लक्षण सांगितलें. आतां एकेक गुण वाढला असतां, त्या गुणाचें लक्षण काय असतें, तेंहि ऐक. ३ जेव्हां एका गुणाचा अतिशय क्षोम होऊन तो वाढतो, तेव्हां दुसरे दोन गुण त्याच्या ताब्यांत रहातात. त्या वेळची पुरुषाची स्थिति आतां श्रीहरि उद्धवाला सांगत आहे. २०४.

—याप्रमाणें मिश्रामिश्र गुणांचीं कार्यें दाखवून आतां या पुढील सात श्लोकांनीं एकेका गुणाच्या उत्कर्षामुळें होणारीं कार्यें दाखवितात—

यदा सत्त्वं इतरौ जयेत् तदा भास्वरं विशदं शिवं भवेत्—जेव्हां सत्त्वगुण इतर दोन गुणांचा पराभव करून वृद्धि पावतो, तेव्हां चित्त प्रकाशक, स्वच्छ व शांत होतें. तदा पुमान् सुखेन धर्मज्ञानादिभिः युज्येत—त्यावेळीं पुरुष सुख, धर्म व ज्ञान यांनीं आणि 'आदि-'शब्दानें शमदमादिकांनीं युक्त होतो. [कारण शिवत्व, विशदत्व व भास्वरत्व यांना क्रमानें सुख, धर्म व ज्ञान यांचें हेतुत्व आहे.] १३.

पुरुष जेव्हां समूळ फळाशा सोडून निर्विकल्प व निरभिमानी होऊन स्वधर्माचरण करितो, त्या वेळीं सत्त्वगुण रज-तमाला जिंकितो. ५ जेव्हा भाग्याचें भांडार उघडतें, तेव्हांच हरिकथेचें श्रवण घडतें व मुखानें हरिनामाची कीर्ति गाण्यास आवडते. त्यामुळें शुद्ध सत्त्वगुण अतिशय वाढतो. किंवा दैवयोगानें सत्संगति लाधली असतां भगवंताचे गुणानुवाद ऐकण्याविषयीं कान उत्सुक होतात व वाणी रात्र-दिवस अत्यंत प्रेमानें भगवंताच्या नाम-कीर्तीचें वर्णन करण्यांत तल्लीन होते. ७ अशाप्रकारच्या आचरणानें रज-तम क्षीण होतात आणि सत्त्वगुण मोठ्या उत्साहानें वाढतो. त्या सत्त्वगुणाचा सविस्तर प्रकार ऐक. ८ तेजोरूपानें अत्यंत प्रकाशयुक्त, निर्मलत्वानें अतिशय पवित्र, शिव म्ह० शांत सरळ हें सत्त्वगुणाचें मुख्य स्वरूप आहे. ९ ही सत्त्वगुणाची सत्त्ववृत्ति ज्या साधकांच्या हातीं लागते, त्याची त्यावेळीं स्थिति कशी होते, तें तुला सांगतों, ऐक. २१० त्याला त्यावेळीं विवेकाची नौका सांपडते, वैराग्याचें आत्म-रहस्य त्याच्या हातीं येतें, सर्व इंद्रियें प्रकाशित होतात आणि स्वधर्माला शीग लागते. (तो पूर्णतेस पोंचतो) ११ त्यावेळीं अधर्म, गर्व, अभिमान, असत्य भाषण इत्यादि त्याच्याकडून कोणी जुलमानें करविलें तरी तो करीत नाहीं. १२ दुःखांचीं साधनें त्याच्या अगदीं समीप येऊन ठेपलीं, तरी तो सर्वदा सुखसंपन्नच असतो. सात्विकाला मुद्दाम

क्षोभेना ॥ १३ ॥ ऐशिया निजसत्वदृष्टी । सुख सुखा येतां भेटी । त्यासी स्वानंदें कोंदें सृष्टी । शुद्ध सत्वपुष्टी या नांव ॥ १४ ॥ ऐसें विशद सत्व जयांपाशीं । शमदम सेविती तयांसी । वैराग्य लागे पायांसी । शुद्ध सत्वराशी ते उद्धवा ॥ १५ ॥ तैसेंचि सत्व तम जिणोन । जैं वाढे गा रजोगुण । तैं राजसाचें लक्षण । ऐक संपूर्ण हरि सांगे ॥ १६ ॥

यदा जयेत्तमः सत्त्वं रजः सङ्गं भिदा बलम् । तदा दुःखेन युज्येत कर्मणा यशसा श्रिया ॥ १४ ॥

रजोवृद्धीचें कारण । देहीं उपजे ज्ञानाभिमान । पदोपदीं देखे दोषगुण । वांछी सन्मान प्रतिष्ठा ॥ १७ ॥ नवल रजोगुणाची ख्याती । ज्ञातेपणें कामासक्ती । नाना भोग वांछी चित्तीं । तेणें रजाची प्राप्ती अनिवार ॥ १८ ॥ ऐसेनि रजोगुण वाढोनि वाढी । सत्वतमांतें तळीं पाडी । त्या रजाची स्वरूपता मोडी । ऐक निरवडी सांगेन ॥ १९ ॥ श्लोकीं त्रैपदीं प्रबळ । रज संग भिदाबळ । बोलिला रजोगुण केवळ तेंचि विवळ हरि सांगे ॥ २२० ॥ संग म्हणिजे देहाभिमान । भेद म्हणिजे मीमाझेंपण । बळ म्हणिजे काम गहन । आग्रहो पूर्ण वृत्तीचा ॥ २१ ॥ देहाभिमानें दुःख उठी । भेदें भय लागे पाठी । त्या नश्वर देहाचिया पुष्टी । काम्यकामाठी कर्मांची मांडी ॥ २२ ॥ ज्या कर्माचेनि कैवाडें । यश श्री उदंड जोडे । तें तें कर्म वाढवी पुढें । हें रजोगुणें घडे आचरण ॥ २३ ॥ मी एक पवित्र त्रिजगतीं । माझीच उत्तम कर्मस्थिती । प्रवृत्ती मान्यता आसक्ती । ते जाणावी स्थिति राजस ॥ २४ ॥ राजाचें बळ उद्भट । कर्म आदरी अचाट । वाढवी कर्मकचाट । तो जाण श्रेष्ठ राजस ॥ २५ ॥ बाहेर दिसे सात्विकस्थिती ।

बलात्कारानें संताप आणण्याचा प्रयत्न केला, तरी त्याच्या मनाला क्षोभ उत्पन्न होत नाहीं. १३ अशा सात्त्विक दृष्टीनें सुखच सुखाच्या भेटीला आलें असतां, सर्व सृष्टि आत्मानंदानें भरून जाते. यालाच शुद्ध सत्त्वाची वाढ म्हणतात. १४ असें स्पष्ट सत्त्व ज्याच्यापाशीं असतें त्याची सेवा शम-दम करितात. वैराग्य त्याच्या पायां पडतें. उद्धवा ! तीच शुद्ध सत्त्वाची रास होय. १५ तसेंच आतां सत्त्व व तम या दोन गुणांना जिंकून रजोगुण कसा वाढतो, तें त्या राजसाचें लक्षण श्रीहरि सविस्तर सांगत आहे, तें तूं ऐक. २१६.

यदा रजः तमः सत्त्वं जयेत् तदा सङ्गं भिदा बलं भवति—जेव्हां रज तम व सत्त्व यांना जिंकतें तेव्हां तें आसक्तीचें व भेदाचें निमित्त होतें व प्रवृत्तिस्वभाव बनतें, तदा दुःखेन कर्मणा यशसा श्रिया युज्येत—त्यावेळीं पुरुष दुःखानें, कर्मानें यशानें व श्रीनें युक्त होतो. [तें सङ्गहेतु असल्यामुळें पुरुष यश व श्री यांनीं युक्त होतो, म्हणजे तो त्यांची इच्छा करूं लागतो. रजाला भेदहेतुत्व असल्यामुळें पुरुष, दुःखानें युक्त होतो. कारण ‘ दुसऱ्यापासून भय होतें ’ अशी बृहदारण्यक श्रुति आहे. बृ. १-४-२, सु. उ. पृ. ५४६. त्याला बलहेतुत्व असल्यामुळें पुरुष कर्मानें युक्त होतो.] १४.

देहामध्यें ज्ञानाभिमानाचा उद्भव होणें हेंच रजोगुणाच्या वृद्धीचें कारण आहे. पावलोंपावलीं गुणदोष पहाणें आणि सन्मान व प्रतिष्ठा, यांची इच्छा होणें हें त्याचें लक्षण आहे. १७ रजोगुणाची ख्याति मोठी विलक्षण आहे. राजस मनुष्य ज्ञाता असूनहि कामासक्त असतो व मनांत नाना भोगांची इच्छा करीत असतो. त्यामुळें रजोगुण अनिवार वाढतो. १८ असा रजोगुण वाढला म्हणजे तो सत्त्व व तम या दोन गुणांना दाबून टाकितो. त्या रजोगुणाचा बींमोड करण्याचा उपाय तुला सांगतों, ऐक. १९ श्लोकांत ‘ संग-भिदा-बलं ’ या तीन पदांनीं प्रबल रजोगुणाचें वर्णन केलें आहे. तेंच आतां हरि स्पष्ट करून सांगत आहे. २२० संग म्ह० देहाभिमान; भेद म्ह० ‘ मीं व माझें ’ हा भेदभाव; बळ म्ह० गहन काम व प्रवृत्तीचा पूर्ण आग्रह. २१ देहाभिमानानें दुःख उद्भवतें. भेदानें भय पाठीस लागतें व त्या नश्वर देहाच्या आश्रयानें काम्य वस्तूंच्या प्राप्तीसाठीं कर्माचें अनुष्ठान सुरू होतें. २२ ज्या कर्मानें साक्षात् यश व अलोट संपत्ति प्राप्त होईल, तें कर्म वाढविण्याकडे प्रवृत्ति होते. असें रजोगुणाचें कार्य आहे. २३ ‘ मीच काय तो एक त्रैलोक्यांत पवित्र आहें, माझेंच कर्माचरण श्रेष्ठ आहे ’ अशाप्रकारची प्रवृत्ति, मान्यता व आसक्ति हें राजस लक्षण जाणावें. २४ रजोगुणाचें बल मोठें अद्भुत असतें. जो अचाट कर्में आरंभितो व उद्योगाचा पसारा वाढवितो तो श्रेष्ठ राजसगुण जाणावा. २५ बाहेरून दिसण्यास ज्याची वृत्ति सात्त्विक असते,

अंतरीं कर्मवासना द्रव्यासक्ती । ज्यासी प्रिया आवडे चित्तीं । तो निश्चितीं राजसू ।। २६ ।। जेव्हां सत्व रज दोनी गुण । जिणोनि तम वाढे पूर्ण । ते काळींचें पुरुषलक्षण । स्वयें नारायण सांगत ।। २७ ।।

यदा जयेद्रजः सत्त्वं तमो मूढं लयं जडम् । युज्येत शोकमोहाभ्यां निद्रया हिंसयाशया ।। १५ ।।

रज सत्व करूनि गूढ । जैं तमोगुण होय रूढ । तैं तो पुरुषातें सदृढ । करी जडमूढ अतिस्तब्ध ।। २८ ।। विश्वासूनि वाडेंकोडें । जैं परद्रव्य बुडवणें पडे । कां परदारागमन घडे । तैं तेणें वाढे तमोगुण ।। २९ ।। स्वमुखें परापवाद बोलणें । स्वयें साधुनिंदा करणें । संतसज्जनां द्वेषणें । तैं तमाचें ठाणें अनिवार ।। २३० ।। धुईचेनि आलेपणें । पडे सूर्यासी झांकणें । तेवीं विवेकाचें जिणें । तमोगुणें ग्रासिजे ।। ३१ ।। सत्वगुण प्रकाशक । रज प्रवृत्तिप्रवर्तक । दोहींतें गिळूनि देख । तमाचें आधिक्य अधर्में वाढे ।। ३२ ।। करितां पूज्याचें हेळण । साधूचे देखतां दोषगुण । तेणें खवळला तमोगुण । त्याचें स्वरूप पूर्ण तें ऐक ।। ३३ ।। तमोगुण वाढल्या प्रौढ । स्फूर्तिमात्र होय मूढ । लयो उपजवोनि दृढ । करी जड जीवातें ।। ३४ ।। कार्याकार्यविवेकज्ञान । ते स्फूर्ति अंध होय पूर्ण । या नांव गा मूढपण । ऐक चिह्न लयाचें ।। ३५ ।। जागृतीमाजीं असतां चित्त । अर्थ स्वार्थ परमार्थ । कांहीं स्फुरेना कृत्याकृत्य । लयो निश्चित या नांव ।। ३६ ।। समस्ताही इंद्रियवृत्ती । अनुद्यमें स्तब्धगती । निःशेष लोपे ज्ञानशक्ती । जडत्वप्राप्ती या नांव ।। ३७ ।। मुढत्वें पावे शोक दुःख । जडत्वें मिथ्या मोह देख । मोहास्तव होय पातक । अतिअविवेक अधर्मी ।। ३८ ।। ऐक लयाचें कौतुक । अहोरात्र निद्रा

परंतु अंतःकरणांत कर्मांची अनिवार इच्छा आणि द्रव्यलोभ असतो व जो स्त्रीवर अत्यंत लोलुप असतो, तो निश्चयानें राजस जाणावा. २६ आतां सत्त्व व रज या दोहोंना जिंकून तमोगुण जेव्हां प्रबल होतो, त्यावेळचें पुरुषाचें लक्षण स्वतः नारायण सांगत आहे. २२७.

यदा तमः सत्त्वं रजः जयेत् तदा मूढं लयं जडं–जेव्हां तम रज व सत्त्व यांचा पराभव करितें तेव्हां तें विवेकभ्रंश करणारें, आवरणरूप व अनुद्यमरूप होतें. शोक-मोहाभ्यां निद्रया हिंसया आशया युज्येत–अर्थात् पुरुष मूढत्वामुळें शोक, मोह व हिंसा यांनीं, लयत्वामुळें निद्रेनें व जडत्वामुळें उद्यमाच्या अभावानें व केवळ आशेनें युक्त होतो. १५.

सत्त्व व रज या दोहोंना मागें सारून जेव्हां तमोगुण प्रबल होतो, तेव्हां तो पुरुषाला पक्का जड-मूढ व अत्यंत स्तब्ध करितो, २८ जेव्हां तो अनेक प्रकारें विश्वास दाखवून दुसऱ्याची ठेव बुडवितो, परस्त्रीसंग करितो तेव्हां तमोगुणाची वृद्धि झाली आहे, असें समजावें. २९ आपल्या मुखानें दुसऱ्याचे दोष सांगणें, साधूंची स्वतः निंदा करणें, संत-सज्जनांचा द्वेष करणें, हें तमोगुण खवळल्याचें चिन्ह होय. २३० धुकें पसरलें असतां सूर्य जसा झांकून जातो, तसा तमोगुण वाढला असतां तो विवेकाला ग्रासून टाकितो. ३१ सत्त्वगुण प्रकाश देणारा आहे. रजोगुण प्रवृत्तींत प्रवृत्त करणारा आहे. परंतु तमोगुणांची वाढ झाली असतां तो या दोन्हीं गुणांना गिळून अधर्म वाढवितो. ३२ पूज्यांचा अपमान करणें व साधूंचे गुणदोष पहाणें यामुळें खवळलेल्या तमोगुणाचें स्वरूप कसें असतें, तें ऐक. ३३ तमोगुण अनिवार झाला म्हणजे स्फूर्ति मंदावते. तो आळस उत्पन्न करून जीवाला जड-मूढ करून ठेवितो. ३४ कार्य व अकार्य यांविषयींचा विचार करण्याची बुद्धि नष्ट होते. स्फूर्ति पूर्णपणें अंध बनते. यालाच मूढपणा म्हणतात. आतां लयाचें लक्षण ऐक. ३५ जागृतींत असतांना चित्ताला अर्थ, स्वार्थ, परमार्थ, कृत्य-अकृत्य हें कांहीं स्फुरत नाहीं. याळाच लय असें म्हणतात. ३६ सगळ्या इंद्रियांचा व्यापार स्तब्ध होणें व चंचलत्व सोडून स्तब्ध राहिल्यानें ज्ञानशक्तीचा निःशेष लोप होणें याला जडत्व असें म्हणतात. ३७ मूढपणानें शोक-दुःख होतें. जडपणानें मिथ्या मोह प्राप्त होतो. मोहामुळें अतिशय अविवेक व अधर्म वाढून पातक घडतें. ३८ आतां लयाचें कौतुक ऐक. रात्रं-दिवस अतिशय निद्रा येते, तामस माणसाला

आधिक । निद्रेवेगळें ब्रह्मसुख । नावडे देख तामसा ॥ ३९ ॥ पूर्ण वाढल्या तमोगुण । ऐसें होय पुरुष-लक्षण । वाढल्या सत्वादि गुण । फळ कोण तें हरि सांगे ॥ २४० ॥

यदा चित्तं प्रसीदेत इन्द्रियाणां च निर्वृतिः । देहेऽभयं मनोऽसङ्गं तत्सत्त्वं विद्धि मत्पदम् ॥ १६ ॥

वाढलिया सत्वगुण । चित्त सदा सुप्रसन्न । कामक्रोधलोभाचें स्फुरण । सर्वथा जाण स्फुरेना ॥ ४१ ॥ जें चित्त वणवणी विषयांलागीं । तें उदास होय विषयभोगीं । विषय आदळतांही अंगीं । तैं विषयसंगीं विगुंतेना ॥ ४२ ॥ जेवीं जळामाजीं जळस्थ । पद्मिणीपत्र जळीं अलिप्त । तेवीं विषयांमाजीं चित्त । विषयातीत मद्बोधें ॥ ४३ ॥ सदा मरणभय देहासी । तें मरण आलिया देहापाशीं । भय नुपजे सात्विकासी । भावें मत्पदासी विनटले ॥ ४४ ॥ जंववरी भासे मीतूंपण । तंववरी अवश्य बाधी मरण । सात्विक मत्पदीं अभिन्न । यालागीं मरणभय त्या नाहीं ॥ ४५ ॥ सात्विक मत्पदीं अनन्य शरण । यालागीं बाधीना जन्ममरण । या स्थितीं वर्तवी सत्वगुण । आतां ऐक लक्षण रजाचें ॥ ४६ ॥

विकुर्वन् क्रियया चाधीरनिवृत्तिश्च चेतसाम् । गात्रास्वास्थ्यं मनो भ्रान्तं रज एतैर्निशामय ॥ १७ ॥

खवळलिया रजोगुण । विषयचिंता अतिदारुण । कर्मेंद्रियीं क्रियाभरण । नाना परींचें जाण उपपादी ॥ ४७ ॥ शरीर असतांहि स्वस्थ । मन चिंतातुर अतिभ्रांत । वाढवितां विषयस्वार्थ । दुःखी होत सर्वदा ॥ ४८ ॥ असतां पुत्रवित्तसंपत्ती । अधिक स्वार्थ वाढवी चित्तीं । राजसाची चित्तवृत्ती । न मनी निवृत्ती क्षणार्धं ॥ ४९ ॥ नसतां विकाराचें कारण । चित्तीं विकार चिंती आपण । हेंचि राजसाचें लक्षण । मुख्यत्वें जाण उद्धवा ॥ २५० ॥ रात्री नोहे पैं प्रबळ । ना दिवस नव्हे सोज्ज्वळ । जैसी झांबळी

निद्रेवांचून दुसरें कशांत ब्रह्मसुख वाटत नाहीं. ३९ तमोगुण पूर्णपणें वाढला असतां पुरुषाची अशी स्थिति होते. सत्त्वादिगुण वाढले असतां कोणतें फल प्राप्त होतें, तें आतां हरि सांगत आहे. २४०.

यदा चित्तं प्रसीदेत इंद्रियाणां च निर्वृतिः देहे अभयं मनः असङ्गं तत् मत्पदं सत्त्वं विद्धि—जेव्हां चित्त स्वच्छ होतें, इंद्रियांची शांति होते, देहामध्यें अभय व असंगत्व होतें तेव्हां माझ्या उपलब्धीचें स्थान जें सत्त्व तें वृद्धि पावलें आहे, असें तूं जाण. १६.

सत्त्वगुण वाढला असतां चित्त सर्वदा अतिशय प्रसन्न होतें. काम-क्रोध-लोभांचें स्फुरण सर्वथा होत नाहीं. ४१ जें चित्त पूर्वीं विषयांच्या मागें वणवण करीत भटकत होतें, तेंच चित्त विषयभोगांविषयीं विरक्त होतें. विषय येऊन अंगावर पडले तरी तो त्यांच्या मोहांत गुंतून पडत नाहीं. ४२ जलामध्यें राहणारें कमलाचें पान जसें जलानें लिप्त होत नाहीं, तसें माझ्या ज्ञानामुळें चित्त विषयांत राहूनहि त्या विषयांपासून अलिप्त असतें. ४३ शरीराला नेहमीं मरणाचें भय असतें. तें मरण देहाजवळ येऊन ठेपलें तरीहि श्रद्धेनें मत्पदामध्यें रंगलेल्या सात्त्विकाच्या मनांत भय उत्पन्न होत नाहीं. ४४ जोंवर 'मी-तूं-पणा' भासतो, तोंवर मरण अवश्य बाधतें. पण सात्त्विक भक्त माझ्या पदाहून भिन्न नसल्यामुळें त्याला मरणाचें भय नसतें. ४५ सात्त्विक भक्त मत्पदाला अनन्य शरण येत असल्यामुळें त्यास जन्म-मरण बाधत नाहीं. सत्त्वगुणानें अशी स्थिति प्राप्त होते. आतां रजोगुणाचें लक्षण ऐक २४६.

यदा च—क्रियया विकुर्वन् पुमान् आधीः भवति—आणि जेव्हां क्रियेनें विकार पावणारा पुरुष सर्वतः विक्षिप्तचित्त होतो, चेतसां अनिर्वृत्तिः—आणि ज्ञानेंद्रियांची अशांति असते, गात्रास्वास्थ्यं—कर्मेंद्रियांमध्यें विकाराचें आधिक्य होतें, मनः भ्रान्तं—मन अस्थिर होतें तेव्हां, एतैः रजः निशामय—या चिन्हांवरून रजोगुण वृद्धि पावला आहे, असें समज. १७.

रजोगुण खवळला म्हणजे अतिशय दारुण विषयचिंता उत्पन्न होते. कर्मेंद्रियांनीं कर्मांचा नानाप्रकारचा थाटमाट आरंभितो. ४७ शरीर जरी स्वस्थ असलें, तरी मन चिंतातुर व अतिशय भ्रांत असतें. विषयांचा स्वार्थ वाढवून सर्वदा दुःखी होतें. ४८ पुत्र, धन, संपत्ति या सर्वांची अनुकूलता जरी असली तरी ती अधिक असावी या स्वार्थानें चित्त अतृप्त रहातें. अशी राजसाची चित्तवृत्ति असते. अर्धाक्षणहि त्याला निवृत्ति आवडत नाहीं. ४९ विकारांचें कांहीं कारण नसतांहि तो मनांत त्यांचें चिंतन करीत असतो. उद्धवा! हें राजसाचें मुख्य लक्षण समजावें.

सांजवेळ । तैसा केवळ रजोगुण ॥ ५१ ॥ सत्वरजांची उणखूण । तुज दाविली ओळखण । आतां ऐक तमोगुण । जड लक्षण तयाचें ॥ ५२ ॥

सीदच्चित्तं विलीयेत चेतसो ग्रहणेऽक्षमम् । मनो नष्टं तमो ग्लानिस्तमस्तदुपधारय ॥ १८ ॥

चित्तीं चिंता अतिगहन । ते महामोहीं होय निमग्न । कोणेही अर्थीचें ज्ञान । हृदयीं जाण स्फुरेना ॥ ५३ ॥ सुषुप्तीवेगळें अज्ञान । सदा पळे देखोनि ज्ञान । तेथ नवल कैसें झालें जाण । त्या ज्ञानातें अज्ञान गिळूनि ठाके ॥ ५४ ॥ जागाचि परी निजेला दिसे । कर्म करी स्फुरण नसे । जेवीं कां आभाळांतिले अंवसे । रात्रीं चाले जैसें आंधळें ॥ ५५ ॥ सकळ शरीराचा गोळा । होय आळसाचा मोदळा । हा तमोग्लानीचा सोहळा । पडळ ये डोळा चित्तवृत्ती ॥ ५६ ॥ संकल्पविकल्पांची ख्याती । उपजवी सदा मनोवृत्ती । त्या मनाची जड होय स्थिती । संकल्पस्फुर्ति स्फुरेना ॥ ५७ ॥ आणिकही नवलस्थिती । चित्तासी नाठवे चित्तस्फूर्ती । एवढी वाढे तमाची ख्याती । मनोवृत्तिविनाशक ॥ ५८ ॥ यापरी तमाचें बळ होय । तैं मनातें अज्ञान खाय । ते काळीं मन नष्टप्राय । मूर्च्छित राहे मूढत्वें ॥ ५९ ॥ मन निःशेष जैं नासतें । तैं महादुःख कोण भोगितें । यालागीं तमाचेनि ऐक्यमतें । मन उरे तेथें जडमूढ ॥ २६० ॥ यापरी जे वर्तती गती । तेचि अत्यंत दुःखदाती । या नांव गा तमाची स्थिती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ६१ ॥ वाढवितां गुणवृत्ती । कोणें गुणें कोण वाढती । येचि अर्थीची उपपत्ती । स्वयें श्रीपति सांगत ॥ ६२ ॥

---

२५० गाढ अंधकाराची रात्रहि नव्हे आणि स्वच्छ प्रकाशाचा दिवसहि नव्हे, अशा या दोहोंच्या मधली अंधुक संध्याकाळ जशी असते तसा हा रजोगुण आहे. सत्त्व व रज यांचें लक्षण मीं तुला सांगितलें. आतां तमोगुणाचें जाड्य हें लक्षण ऐक. २५२.

यदा सीदत् चेतसः ग्रहणे अक्षमं चित्तं विलीयेत मनः नष्टं तमः ग्लानिः तत् तमः उपधारय—जेव्हां निर्बल व चिदाकार परिणामाचें ग्रहण करण्यास असमर्थ झालेलें चित्त विलीन होतें, संकल्पात्मक मनहि लीन होतें व विषाद होतो, तेव्हां तम उत्कर्ष पावलें आहे असें तूं जाण. १८

मनांत दारुण चिंता उत्पन्न झाली म्हणजे तें महामोहांत निमग्न होतें आणि मग कसलेंहि ज्ञान त्याच्या अंतःकरणांत स्फुरत नाहीं. ५३ गाढ झोंपेची वेळ खेरीज करून अज्ञान नेहमीं ज्ञानाला पहातांच पळून जात असतें; परंतु येथें काय आश्चर्य होतें, पहा ! त्या ज्ञानालाच अज्ञान गिळून टाकितें. ५४ तामस मनुष्य जागा असला तरी निजल्यासारखाच दिसतो. एखादा आंधळा मेघांनीं व्यापिलेल्या अमावास्येच्या रात्रीं जसा चांचपडत, ठेंचाळत चालत असतो, ५५ तसा तो उत्साहावांचून कर्म करीत असतो. सगळें शरीर आळसाचा एक गोळाच बनतें. या तमोगुणाच्या ग्लानीची लीला अशी असते कीं, त्यामुळें चित्तवृत्तीच्या दृष्टीवर पडदा येतो. ५६ ज्या मनोवृत्तीची सदासर्वदा संकल्प-विकल्प करण्याविषयीं प्रसिद्धि आहे ती मनोवृत्ति इतकी जड होते कीं, तिला संकल्प स्फुरतच नाहीं. ५७ आणखीहि एक आश्चर्य घडतें. मनाचा मनपणा नाहींसा होतो, मनोवृत्तीचा नाश करणाऱ्या तमाची अशी प्रसिद्धि आहे. ५८ अशा प्रकारें जेव्हां तम प्रबल होतें, तेव्हां अज्ञान मनाला ग्रासून टाकितें. त्यामुळें मन नष्ट होऊन मूढत्वानें मृतप्राय झाल्यासारखें रहातें. ५९ जेथें मनाचाच निःशेष नाश होतो, तेथें महादुःख कोण भोगणार ! तमाशीं म्ह० अज्ञानाशीं एकरूप होऊन मन जड-मूढ होऊन रहातें. २६० अशा प्रकारची जी स्थिति तीच अत्यंत दुःख देणारी तमाची अवस्था जाणावी. ६१ उद्धवा ! आतां गुणवृत्तींची वाढ होत असतां कोणत्या गुणानें काय वाढतें याचेंच निरूपण स्वतः श्रीहरि करीत आहे. २६२.

एधमाने गुणे सत्त्वे देवानां बलमेधते । असुराणां च रजसि तमस्युद्धव रक्षसाम् ॥ १९ ॥

दैवी आसुरी राक्षसी स्थिती । हे त्रिगुण गुणांची संपत्ती । जे जे ब्रह्मांडीं इंद्रियवृत्ती । तेचि स्थिति पिंडींही ॥ ६३ ॥ ब्रह्मांडीं सकळ देव । महापुरुषाचे अवयव । पिंडींही तेचि स्वयमेव । वर्तती सर्व निजऐक्यें ॥ ६४ ॥ उचित स्वधर्मशास्त्रस्थिती । निवृत्तिकर्मी जे प्रवृत्ती । ऐशी जेथ इंद्रियवृत्ती । ते दैवी संपत्तीं सत्वस्थ ॥ ६५ ॥ कामाभिलाष दृढ चित्तीं । आणि स्वधर्मीं तरी वर्तती । ऐशी जे इंद्रियस्थिती । ते आसुरी संपत्ति राजसी ॥ ६६ ॥ सलोभमोहें क्रोध चित्तीं । सदा अधर्मीं प्रवृत्ती । ऐशी जे इंद्रियस्थिती । ते राक्षसी संपत्ती तामसी ॥ ६७ ॥ क्षणें सकाम क्षणें निष्काम । ऐसा जेथ वाढे स्वधर्म । तेथ देवां असुरां परम । होय संग्राम वृत्तीसी ॥ ६८ ॥ चित्तीं वाढवूनि मोहभ्रम । अधर्मचि मानी स्वधर्म । तैं राक्षसाचा पराक्रम । देवासुरां परम निर्दाळी ॥ ६९ ॥ सकामनिष्काममोहभ्रमेंसीं । वृत्ती वर्ते गा जयापाशीं । तेथ देवांअसुरांराक्षसांसी । कलहोअहर्निशीं अनिवार ॥ २७० ॥ क्षणैक रति परमार्थीं । क्षणैक रति अर्थस्वार्थीं । क्षणैक होय अनर्थीं । परदाररती परद्रव्यें ॥ ७१ ॥ ऐशिये गा चित्तवृत्तीं । कदा नुपजे निजशांती । मा परमार्थाची प्राप्ती । कैशा रीती होईल ॥ ७२ ॥ साधक सर्वदा पुसती । कोण बाधा असे चित्तवृत्तीं । ते बाधकत्वाची स्थिती । विशद तुजप्रती सांगीतली ॥ ७३ ॥ एकचि गुण जैं पुरता जोडे । तैं एकविध वृत्ति वाढे । हें तंव सर्वथा न घडे । गुण गुणासी भिडे उपमर्दें ॥ ७४ ॥ एकचि न जोडे गुणावस्था । यालागीं नव्हे एकविधता । तेणें अनिवार भवव्यथा । बाधी भूतां गुणक्षोभें ॥ ७५ ॥ तम अधर्माकडे वाढे । रजोगुण देहकर्माकडे । सत्त्वगुणासी वाढी न घडे ।

सत्त्वे गुणे एधमाने देवानां बलं एधते—सत्त्वगुण वाढूं लागला असतां देवांचें बल वृद्धि पावतें. रजसि च असुराणां-रजोगुणाची वृद्धि झाली असतां असुरांचें बल वाढतें. हे उद्धव, तमसि रक्षसां—हे उद्धवा ! तमोगुण वाढला असतां राक्षसांचें बल वाढतें. [निवृत्तिस्वभाव, प्रवृत्तिस्वभाव व मोहस्वभाव इंद्रियेंच देव, असुर व राक्षस आहेत, असें जाणावें किंवा प्रसंगतः आधिदैविक गुणांच्या उत्कर्षाचीं कार्यें सांगितलीं आहेत, असें जाणावें.]

दैवी, आसुरी, राक्षसी अशी तीन प्रकारची गुणांची संपत्ति आहे. (सु. गी. १६ पृ. २८९.) जी इंद्रियवृत्ति ब्रह्मांण्डांत असते, तीच देहांतहि असते. ६३ ब्रह्मांडांतील सगळे देव महापुरुषाचे अवयव आहेत. तेच शरीरांतहि एकरूपानें रहात असतात. ६४ विहित स्वधर्माप्रमाणें वागून निष्काम कर्मांत प्रवृत्त होणारी जी इंद्रियवृत्ति ती सत्त्वगुणांत रहाणारी दैवी संपत्ति होय. ६५ मनांत अनिवार कामासक्ति असून स्वधर्माचरणांत इंद्रियांची प्रवृत्ति होणें ही राजस आसुरी संपत्ति होय. ६६ मनांत लोभ-मोह-क्रोध भरलेला असून इंद्रियांची अधर्माचरणाकडे प्रवृत्ति होणें ही तामसी राक्षसी संपत्ति समजावी. ६७ क्षणांत कामासक्ति आणि क्षणांत निष्कामता अशी मनाची जेव्हां अस्थिर स्थिति होते व असा स्वधर्म जेव्हां वाढतो तेव्हां दैवी आणि आसुरी वृत्तींमध्यें तुमुल युद्ध होतें ६८ मनांतील मोहभ्रम वाढवून अधर्मालाच स्वधर्म मानणें हा राक्षसी वृत्तीचा प्रताप होय. ती दैवी व असुरी वृत्तींचा नाश करून प्रबल होते. ६९ सकाम-निष्कम मोहात्मक भ्रम अशी जेव्हां वृत्ति होते, तेव्हां देव, असुर व राक्षस यांचें अनिवार भांडण जुंपतें २७० त्या वेळीं मन क्षणभर परमार्थांत रंगतें, क्षणभर द्रव्यादि विषयांत लोलुप होते आणि क्षणांत परदारा व परद्रव्य यांच्या अभिलाषानें अनर्थांत प्रवृत्त होतें. ७१ अशा चित्तवृत्तींत खरी शांति कधींच उपजत नाहीं. मग परमार्थाची प्राप्ति कशी होणार ! ७२ साधक नेहमीं विचारीत असतात कीं, चित्तवृत्ति कशी बाधक होते ! तें बाधेचें कारण मीं तुला स्पष्ट करून सांगितलें. ७३ एकच गुण जर पूर्णपणें संपादिला तर एकच वृत्ति वाढावी. पण तसें घडत नाहीं. गुण परस्परांचा पाडाव करून भांडत असतात. ७४ त्यामुळें एकच गुणावस्था प्राप्त होत नाहीं. म्हणून एकाच प्रकारची वृत्ति न रहातां गुणांच्या क्षोभामुळें संसारव्यथा बाधत असते. ७५ तमोगुण अधर्माकडे वळत असतो. रजोगुण देहकर्माकडे वळतो आणि सत्त्वगुण तर

मुक्तता जोडे कैसेनी ॥ ७६ ॥ रजतमउभयसंधीं । सत्व अडकलें दोहींमधीं । तें वाढों न शके त्रिशुद्धीं । नैराश्यें वृद्धी सत्वगुणा ॥ ७७ ॥ त्रिगुण गुणांची त्रिपुटी । आपण कल्पी आपल्या पोटीं । तेंचि भवभय होऊनियां उठी । लागे पाठीं बाधकत्वें ॥ ७८ ॥ सत्वें देवांसी प्रबळ । रजोगुणें दैत्य प्रबळ । तमोगुणें केवळ । अतुर्बळ राक्षसां ॥ ७९ ॥ हे गुणवृत्तीची व्यवस्था । समूळ सांगीतली कथा । आतां त्रिगुणांच्या तीन अवस्था । ऐक तत्त्वतां सांगेन ॥ २८० ॥

सत्त्वाज्जागरणं विद्याद्रजसा स्वप्नमादिशेत् । प्रस्वापं तमसा जन्तोस्तुरीयं त्रिषु सन्ततम् ॥ २० ॥

सत्वगुणाचिये स्थिति । नातळे स्वप्न आणि सुषुप्ती । जीवीं सदा नांदे जे जागृती । इंद्रियप्रवृत्ती सावध ॥ ८१ ॥ रजोगुणाचेनि आधिक्यें । चित्तवृत्तीतें स्वप्न जिंके । जागृति सुषुप्ति दूरी ठाके । बैसला देखे स्वप्नचि ॥ ८२ ॥ तमोगुण वाढल्या वाढी । जागृति स्वप्न दूरी दवडी । मग सुषुप्तीची अतिगाढी । आदळे रोकडी जीवाअंगीं ॥ ८३ ॥ त्यासा सभे बैसविल्या पाहे । बोलतांबोलतां डुलकी जाये । जेवितांजेवितांही पाहे । झोंपीं जाये कडकडां ॥ ८४ ॥ क्षणां जागृति क्षणां सुषुप्ती । क्षणैक स्वप्नाची प्रतीती । हे त्रिगुणांची मिश्रित वृत्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ८५ ॥ जागृति स्वप्न सुषुप्ती । तिहीं अवस्थांतें प्रकाशिती । यालागीं तें चौथी । तुरीय म्हणती सज्ञान ॥ ८६ ॥ जे जागृतीतें जागवित । जे स्वप्नीं स्वप्नातें नांदवित । जे सुषुप्तीतें निजवित । त्यातें तुरीय म्हणत उद्धवा ॥ ८७ ॥ जें तिहीं अवस्थांआंत । असोनि नव्हे अवस्थांभूत । जे निर्गुण निजनित्य । त्यातेंचि म्हणत तुरीय ॥ ८८ ॥ जेवीं पुत्राचेनि जाहलेपणें । पुरुषें पिता नांव पावणें । तेवीं तिहीं अवस्थागुणें । तुरीय म्हणणें वस्तूसी ॥ ८९ ॥

वाढतच नाहीं. मग मुक्ति कशी लाभणार ! ७६ रज आणि तम या दोहोंच्या संधींत सत्त्व अडकून पडतें. त्यामुळें तें वाढूं शकत नाहीं. आशेचें निर्मूलन केलें असतां सत्त्वगुणाची वाढ होते. ७७ त्रिगुणांची त्रिपुटी आपल्याच कल्पनेनें मनांत उद्भवते आणि मग संसारभयाच्या रूपानें पाठीस लागते. ७८ सत्त्वगुणानें देव प्रबल होतात, रजोगुणानें दैत्य बलवान् होतात आणि तमोगुणानें राक्षस बलाढ्य होतात ७९ अशी ही गुणांच्या वृत्तीची सविस्तर कथा मीं तुला सांगितली, आतां तीन गुणांच्या तीन अवस्था सांगतों, त्या ऐक. २८०.

—गुणोत्कर्षानें होणाऱ्या भिन्नभिन्न अवस्था दाखवितात—

सत्त्वात् जागरणं विद्यात्–सत्त्वगुणाच्या उत्कर्षामुळें जागृति होते. रजसा स्वप्नं आदिशेत्–रजोगुणामुळें स्वप्न होतें, तमसा जन्तोः प्रस्वापं–तमोगुणानें प्राण्यांची सुषुप्ति होते, (प्रसंगानें निर्गुणावस्था सांगतात–) तुरीयं त्रिषु सन्ततं–तुरीय ही चवथी अवस्था म्हणजे जागरादि तीन अवस्थामध्यें एकरूप असलेलें आत्मतत्त्वच आहे. २०.

अंतःकरणांत सत्त्वगुणाचें प्राबल्य असलें म्हणजे जीवाला स्वप्न व सुषुप्ति स्पर्शहि करीत नाहींत. जीव सर्वदा जागृतींत नांदत असतो. त्यामुळें इंद्रियवृत्ति सावध असते. ८१ रजोगुण वाढला म्हणजे स्वप्न चित्तवृत्तीला जिंकितें. जागृति व सुषुप्ति दूर रहातात आणि राजस मनुष्य बसल्या बसल्याच स्वप्न पाहूं लागतो. ८२ तमोगुण प्रबल झाला कीं, जागृति स्वप्न यांना दूर घालवून जीव गाढ सुषुप्तींत मग्न होतो. ८३ त्याला सभेंत नेऊन जरी बसविलें, तरी तो बोलतां-बोलतां डुलकी घेतो. जेवतां जेवतां गाढ झोंपीं जातो. ८४ उद्धवा ! क्षणांत जागृति क्षणांत सुषुप्ति व क्षणांत स्वप्नप्रतीति ही तीन मिश्रगुणांची वृत्ति होय, हें खात्रीनें जाण. ८५ जागृति, स्वप्न व सुषुप्ति या तीन्ही अवस्थांना प्रकाशित करणारें जें साक्षिस्वरूप आत्मतत्त्व म्ह० संवित् तिलाच ज्ञाते चवथी तुर्यावस्था म्हणतात. ८६ उद्धवा ! जो जीवाला जागृतींत जागवितो, स्वप्नांत स्वप्नानुभव देतो, सुषुप्तींत गाढ झोंपवितो त्याला तुरीय असें म्हणतात. जो तीन्ही अवस्थांमध्यें असून कोणत्याच अवस्थेनें युक्त नसतो, जो निर्गुण नित्य असतो, त्यालाच तुरीय म्हणतात. ८८ एखाद्याला पुत्र झाला म्हणजे त्याला 'पिता' हें नांव जसें प्राप्त होतें त्याप्रमाणें या गुणांच्या तीन अवस्थांमुळें परमात्मवस्तूच तुरीय म्हटली जाते. ८९ परब्रह्मावर या तीन अवस्था भासतात. ती ती भासलेली अवस्था तत्काल नाश पावते; परंतु या

वस्तूवरी अवस्था भासे । भासली अवस्था सर्वेचि नासे । त्या नाशामाजीं वस्तु न नासे । उरे अविनाशें तुरीय ॥ २९० ॥ तुरीय त्रिकाळीं संतत । यापरी जाणावें एथ । आतां गुणवृद्धिभूमिकाप्राप्त । तोही वृत्तांत हरि सांगे ॥ ९१ ॥

उपर्युपरि गच्छन्ति सत्त्वेन ब्राह्मणा जनाः । तमसाऽधोध आमुख्याद्रजसाऽन्तरचारिणः ॥ २१ ॥

सत्त्वगुणाचें आयतन । मुख्यत्वें ब्राह्मण जन । ते न करूनि ब्रह्मार्पण । स्वधर्माचरण जे करिती ॥ ९२ ॥ त्यांसी स्वधर्माच्या कर्मशक्तीं । ऊर्ध्वलोकीं होय गती । लोकलोकांतरप्राप्ती । ब्राह्मण पावती ते ऐक ॥ ९३ ॥ स्वर्गलोक महर्लोक । क्रमूनि पावती जनलोक । उल्लंघोनियां तपोलोक । पावती सात्विक सत्यलोक पैं ॥ ९४ ॥ वाढलियां रजोगुण । शूद्रादि चांडाळपण । पुढती जन्म पुढती मरण । अविश्रम जाण भोगवी ॥ ९५ ॥ वाढलिया तमोगुण । पश्वादि योनि पावोन । दंश मशक वृक्ष पाषाण । योनि संपूर्ण भोगवी ॥ ९६ ॥ प्राण्यासी अंतकाळीं जाण । देहांतीं जो वाढे गुण । त्या मरणाचें फळ कोण । तेंही श्रीकृष्ण स्वयें सांगे ॥ ९७ ॥ अनन्य करितां माझी भक्ती । भक्तांसी अंतीं कोण गती । तेही विखींची उपपत्ती । श्लोकांतीं हरि सांगे ॥ ९८ ॥

सत्त्वे प्रलीनाः स्वर्यान्ति नरलोकं रजोलयाः । तमोलयास्तु निरयं यान्ति मामेव निर्गुणाः ॥ २२ ॥

नाशाबरोबर आत्मतत्त्व नष्ट होत नाहीं. असें जें अविनाशी तत्त्व उरतें तेंच तुरीय होय २९० तुरीय त्रिकाळीं अखंड असतें, असें जाणावें. आतां गुणवृद्धीच्या योगानें होणारा कर्मगतीचा भेद कसा होतो, तोहि वृत्तांत हरि सांगत आहे. २९१.

गुणोत्कर्षांच्या द्वारां त्या त्या कर्मांची फलनिष्ठाच सांगतात—

सत्त्वेण ब्राह्मणाः जनाः उपरि उपरि गच्छन्ति—सत्त्वगुणानें वेदानुष्ठानयुक्त ब्राह्मण लोक उच्च उच्च लोकांना जातात. तमसा आमुख्यात् अधः अधः—तमोगुणानें स्थावरापर्यंत अधोगतीला जातात. रजसा अन्तरचारिणः—रजोगुणानें मनुष्य होतात. [' आब्राह्मणः ' असा पाठ घेतल्यास जीव सत्त्वगुणानें ब्रह्मलोकापर्यंत ऊर्ध्वगतीला जातात, असा अर्थ करावा.] २१.

ब्राह्मणच मुख्यत्वेंकरून सत्त्वगुणाचें आश्रयस्थान आहेत. ब्रह्मार्पण न करितां जे स्वधर्माचरण करितात, ९२ ते सात्त्विक ब्राह्मण वेदोक्त अनुष्ठानानें ब्रह्मलोकापर्यंत ऊर्ध्वगतीस जातात. ब्राह्मणांना उत्तरोत्तर श्रेष्ठ लोक कसे प्राप्त होतात, तें ऐक. ९३ सात्त्विक ब्राह्मण स्वर्गलोक, महर्लोक यांचें आक्रमण करून जनलोकाला जातात; तेथून तपोलोकाचें उल्लंघन करून सत्यलोकीं पोंचतात. ९४ रजोगुण वाढला म्हणजे जीव शूद्रादि हीन योनींत जन्म घेऊन पुनः पुनः जन्म-मरणपरंपरा अव्याहत भोगीत असतात. ९५ तमोगुण वाढला म्हणजे स्थावरांपर्यंत पश्वादिकांचा जन्म घेऊन डांस, माशी, वृक्ष, पाषाण इत्यादि सगळ्या योनी भोगाव्या. लागतात. ९६ आतां जीवांच्या मरणकाळी त्याच्या देहांतील जो गुण वाढतो त्याचें मरणद्वारां कोणतें फल प्राप्त होतें, तें श्रीकृष्ण सांगत आहे. त्याचप्रमाणें माझी अनन्य भक्ति केली असतां भक्ताला अंतकाळीं कोणती गति प्राप्त होते त्याविषयींचेंहि विवेचन श्रीहरि श्लोकाच्या शेवटीं सांगत आहे. २९८.

—देह सोडून जातांना गुणांच्या उत्कर्षानुसार फल सांगतात—

सत्त्वे प्रलीनाः स्वर्यान्ति—सत्त्वगुणाची वृद्धि झाली असतां मृत झालेले स्वर्गास जातात. रजोलयाः नरलोकं यान्ति—रजोगुणाची वृद्धि झाली असतां जे लय पावतात ते नरकलोकास जातात. तमोलयाः तु निरयं यान्ति—तमोगुण वृद्धि पावला असतां जे मरतात ते नरकास जातात. निर्गुणाः मां एव—जीवदवस्थेंत जे गुणातीत होतात ते मलाच प्राप्त होतात. [येथें ' लय- ' शब्दाचें ग्रहण केलेलें नाहीं, त्यामुळें जिवंतपणीं गुणातीत झालेले असा अर्थ करावा.] २२.

संसारीं मुख्यत्वें त्रिगुण । तेथ वाढोनियां सत्वगुण । ज्यासी प्राप्त होय मरण । तो स्वर्गभोगी जाण दिव्य देह पावे ॥ ९९ ॥ सत्वें निमाल्या सात्विक । ते पावती स्वर्गलोक । रजोगुणें निमाल्या देख त्या मनुष्यलोक मानवां ॥ ३०० ॥ अंतीं वाढोनियां तमाधिक्य । तमोगुणें निमाल्या देख । ते भोगिती महानरक । दुःखदायक दारुण ॥ १ ॥ सप्रेम करितां माझी भक्ती । माझिया भक्तांसी देहांतीं । हृदयीं प्रकटे माझी मूर्ती । घवघविती निजतेजें ॥ २ ॥ शंखचक्रगदादि संपूर्ण । पीतांबरधारी श्रीकृष्ण । ध्यानीं धरूनि पावे मरण । तो वैकुंठीं जाण मी होये ॥ ३ ॥ सर्वभूतीं मी आत्मा पूर्ण । ऐसें ज्याचें अखंड भजन । ते जितांचि तिन्ही गुण । जिणोनि निर्गुण पावती ॥ ४ ॥ त्यांचे देहासी दैवें आल्या मरण । मजवेगळें नाहीं स्थान । ते निजानंदें परिपूर्ण । निजनिर्गुण स्वयें होती ॥ ५ ॥ माझें स्वरूप निजनिर्गुण । अथवा वैकुंठींचें सगुण । दोन्हीं एकचि निश्चयें जाण । सगुण निर्गुण समसाम्य ॥ ६ ॥ स्वर्ग नरक मनुष्यलोक । प्राप्ति पावले निर्गुण चोख । त्यांच्या साधनाचें कौतुक । स्वयें यदुनायक सांगत ॥ ७ ॥

मदर्पणं निष्फलं वा सात्त्विकं निजकर्म तत् । राजसं फलसंकल्पं हिंसाप्रायादि तामसम् ॥ २३ ॥

सकळ कर्मक्रियाचरण । संकल्पेंवीण आपण । सहजें होय ब्रह्मार्पण । हें निर्गुण साधन शोधितसत्वें ॥ ८ ॥ वर्णाश्रमधर्म सकळ । आचरे परी न वांछी फळ । माझे भक्तीचें प्रेम प्रबळ । हें कर्म केवळ सात्त्विक ॥ ९ ॥ माझें भजन हाचि स्वधर्म । याचि नांव गा निजकर्म । ऐसें ज्यासी कळे वर्म । सात्विक कर्म या नांव ॥ ३१० ॥ स्वधर्म । आचरोनि सकळ । इंद्रादि देवां यजनशीळ । जो वांछी इहामुत्र

संसारांत तीन गुण मुख्य अहोत. सत्त्वगुण वाढला असतां ज्याला मरण येतें, तो दिव्य देह घेऊन स्वर्गांतील सुख भोगितो. ९९ सात्त्विक मनुष्य सत्त्वगुणाच्या प्राबल्यांत मरण पावल्यास स्वर्गलोकाला प्राप्त होतो. रजोगुणाचा उत्कर्ष झाला असतां मृत्यु आल्यास त्याला पुनः मनुष्यजन्मच येतो. ३०० मरणसमयीं तमोगुण वाढला असतां, त्याच स्थितींत मरण आल्यास तो जीव दुःखदायक, भयंकर महानरक भोगितो. १ माझ्या भक्तानें माझी सप्रेम भक्ति केली असतां अंतकालीं माझी देदिप्यमान असलेली मूर्ति त्याच्या हृदयांत प्रकट होते. २ शंख. चक्र, गदा, पद्म इत्यादिकांनीं युक्त, पितांबरधारी श्रीकृष्णाचें ध्यान करीत असतां ज्यांस मरण येतें, तो माझा भक्त वैकुंठांत मद्रूप होऊन रहातो. ३ सर्व भूतमात्रांत मीच आत्मराम पूर्णपणें भरलेला आहें, असें ज्याचें अखंड भजन चालतें, तो तीन्ही गुणांना जिंकून निर्गुणाला प्राप्त होतो. ४ त्याच्या देहाला दैवयोगानें जेव्हां मरण येतें तेव्हां त्याला माझ्याहून अन्य स्थान मिळत नाहीं. तो परिपूर्ण आत्मानंदांत स्वतः निर्गुण होऊन रहातो. ५ माझें निर्गुण आत्मस्वरूप किंवा वैकुंठांतील सगुण रूप हीं दोन्हीं एकच आहेत, असें तूं निश्चित जाण. सगुण आणि निर्गुण यांचें समसाम्य आहे. ६ तीन गुणांच्या उत्कर्षामुळें स्वर्ग, नरक, मनुष्यलोक किंवा शुद्ध निर्गुण ब्रह्म, यांस प्राप्त होणाऱ्या साधकांच्या साधनांचें कौतुक श्रीकृष्ण आतां सांगत आहे. ३०७.

—आतां गुणोत्कर्षामुळेंच होणारें त्या त्या फळाचें, साधनाचें व कर्माचें त्रिविधत्व सांगतात—

मदर्पणं निष्फलं वा यत् निजकर्म तत् सात्त्विकं—माझ्या प्रसादाच्या उद्देशानें केलेलें किंवा केवल दासभावानेंच केलेलें जें स्वकर्म वगैरे तें सात्त्विक होय. फलसंकल्पं राजसं—ज्यामध्यें फळाचा संकल्प केला जातो तें राजस, हिंसाप्रायादि तामसं- हिंसेच्या उद्देशानें केलेलें व हिंसाप्रचुर असें जें कर्म तें तामस होय. [हिंसाप्रायादि येथील आदिशब्दानें दंभ, मात्सर्य इत्यादिकांनीं केलेलें कर्म घ्यावें.] २३.

सर्व कर्मानुष्ठान संकल्पावांचून केलें असतां तें सहजच ब्रह्मार्पण होतें. शोधित सत्त्वानें तें निर्गुणस्वरूपाचें साधन आहे. ८ फलाची इच्छा न धरितां वर्णाश्रमाचे सगळे धर्म माझ्यावर निःसीम प्रेम ठेवून आचरणें हेंच केवळ सात्त्विक कर्म होय. ९ माझें भजन हाच स्वधर्म यालाच स्वकर्म म्हणतात. हें वर्म ज्याला कळतें त्याच्या कर्माला सात्त्विक कर्म हें नांव आहे. ३१० आपला सगळा स्वधर्म आचरून इंद्रादि देवांचें यजन करण्याचें ज्याचें शील

फळ । हें कर्म केवळ राजस ॥ ११ ॥ जे कर्मीं प्रकट हिंसा घडे । कां अभिचारिक करणें पडे । स्वरूपें जें कर्म कुडें । तें जाण धडफुडें तामस ॥ १२ ॥ जेथ दांभिक कर्माचारू । जेथ साधूंसी अतिमत्सरू । जेथ निंदेचा प्रबळ भरू । तो कर्मादरू तामस ॥ १३ ॥ आतां त्रिगुण आणि निर्गुण । यांचें चतुर्विध लक्षण । या श्लोकीं श्रीकृष्ण । स्वमुखें आपण सांगत ॥ १४ ॥

कैवल्यं सात्त्विकं ज्ञानं रजो वैकल्पिकं च यत् । प्राकृतं तामसं ज्ञानं मन्निष्ठं निर्गुणं स्मृतम् ॥ २४ ॥

देहीं असोनि देहातीत । भूतीं भूतात्मा भगवंत । भूतां सबाह्य सभराभरित । हें ज्ञान निश्चित सात्विक ॥ १५ ॥ भिन्न खाणी भिन्नाकार । भिन्न नांवें भिन्न व्यापार । तेथ वस्तु देखे अभिन्नाकार । हें ज्ञान साचार सात्विक ॥ १६ ॥ करूनि वेदशास्त्रपठन । निर्धारितां निजज्ञान । सर्वेंचि विकल्पी आपण । विकल्पी पूर्ण रजाचे ॥ १७ ॥ करून वार्तिकांत व्युत्पत्ती । अद्वैतनिश्चयो नाहीं चित्तीं । आपण विकल्पी आपुल्या युक्ती । तें ज्ञान निश्चितीं राजस ॥ १८ ॥ करूनि वेदशास्त्रश्रवण । होय शिश्नोदरपरायण । इंद्रियार्थीं श्रद्धा पूर्ण । तो केवळ जाण राजस ॥ १९ ॥ एक निश्चयो नाहीं चित्तीं । विकल्प उपजती नेणों किती । हे रजोगुणाची ज्ञानवृत्ती । ऐक निश्चितीं तमोगुण ॥ ३२० ॥ महामोहो गिळी ज्ञानस्फूर्ती । मी जड अंध मानी निश्चितीं । नश्वर पदार्थीं आसक्ती । तें ज्ञान निश्चितीं तामस ॥ २१ ॥ आहार निद्रा भय मैथुन । केवळ पशुप्राय जें ज्ञान । तें निश्चयें तामस जाण । ऐक निर्गुणविभाग ॥ २२ ॥ कार्य कर्ता आणि कारण । त्रिपुटी त्रिगुणेंसी करूनि शून्य । केवळ जें चैतन्यघन । तें निर्गुण ज्ञान उद्धवा ॥ २३ ॥ सत्वाचेनि निजउल्हासें । सर्वेंद्रियीं ज्ञान प्रकाशे । तें ज्ञानचि मानी वायवसें । मी

आहे व जो इह-परलोकींचें सुख इच्छितो त्याचें कर्म केवल राजस होय. ११ ज्या कर्मांत उघड उघड हिंसा घडते, ज्यांत जारण-मारणादि परपीडा असते, ज्या कर्मांचें स्वरूपच ओंगळ असतें, तें कर्म तामस आहे, असें समजावें. १२ ज्यांत दांभिक कर्माचरण असतें, साधु-संतांचा अत्यंत मत्सर घडतो, ज्यांत दुसऱ्यांची निंदा भरपूर असते, तें हिंसात्मक समत्सर व दांभिक कर्म तामस होय. १३ आतां त्रिगुण आणि निर्गुण यांचें चार प्रकारचें लक्षण श्रीकृष्ण पुढील श्लोकांत आपल्या मुखानें सांगत आहे. ३१४.

—आतां सगुण-निर्गुणभेदानें ज्ञानादिकांचे चार प्रकार सांगतात—

कैवल्यं ज्ञानं सात्त्विकं—देहादि व्यतिरिक्त आत्मविषयक ज्ञान सात्त्विक होय, **यत् च वैकल्पिकं तत् रजः**—देहादिकांहून व्यतिरिक्त आत्म्याविषयींचें जें ज्ञान तें राजस. **प्राकृतं ज्ञानं तामसं**—बाल, मुक इत्यादिकांच्या ज्ञानासारखें जें ज्ञान तें तामस होय. **मन्निष्ठं निर्गुणं स्मृतं**—मज परमेश्वराविषयींचें जें ज्ञान तें निर्गुण म्हटलेलें आहे. २४.

भगवान् देहांत राहून देहातीत, सगळ्या भूतांतील भूतात्मा, सर्व भूतांना सबाह्य व्यापणारा आहे. हें सात्त्विक ज्ञान होय. १५ भिन्न जाति, भिन्न आकार, भिन्न नांवें व भिन्न क्रिया या सर्वांतील ब्रह्माला अभिन्न आकारानें पहाणें हें सात्त्विक ज्ञान होय. १६ वेद-शास्त्राचा अभ्यास करून आत्मज्ञानाचा विचार करते वेळीं स्वतःच विकल्प करणें हें राजस ज्ञान जाणावें. १७ वार्तिकापर्यंत अध्यापन करूनहि मनांत अद्वैत बाणत नाहीं, म्हणून आपणच आपल्या तर्कानें विकल्प करीत बसणें हें खरोखर राजस ज्ञान होय. १८ वेद-शास्त्राचें श्रवण करून विषयासक्त होणें, इंद्रियांच्या तृप्तीकडेच लक्ष ठेवणें, हें राजसपणाचेंच लक्षण जाणावें. १९ मनाचा एक निश्चय न रहातां क्षणोक्षणीं चित्तांत अगणित विकल्प उद्भवणें ही राजस ज्ञानवृत्ति होय. आतां तमोगुणाचा प्रकार ऐक. ३२० ज्ञानाची सगळी स्फूर्ति महामोहानें ग्रासून टाकिल्यामुळें 'मी जड, अंध,' इत्यादिक निश्चय आणि नाशिवंत पदार्थांविषयीं आसक्ति, हें तामस ज्ञान होय. २१ आहार, निद्रा, भय व स्पर्शसुख एवढेंच जें पशुवृत्तीचें ज्ञान तें तामस जाणावें. आतां निर्गुणाचा विभाग ऐक. २२ उद्धवा ! कार्य, कर्ता, कारण या त्रिगुणांच्या त्रिपुटीस शून्य करून केवळ जें चैतन्यरूप तेंच निर्गुण ज्ञान होय. २३ सत्त्वाच्या उल्हासानें सर्व इंद्रियांत जें ज्ञान प्रकट होतें, तें ज्ञानच मुळीं व्यर्थ आहे. कारण मी ज्ञानरूपानें अनादि आहें. २४ समुद्राच्याच पाण्याचें रूपांतर होऊन नद्या वाहूं लागतात. त्या

ज्ञानरूपें असें अनादि ॥ २४ ॥ सिंधुजळें सरिता वाहती । त्या आलिया सिंधूप्रती । तेणें उल्हासेना आपांपती । तेवीं ज्ञानस्फूर्तीं श्लाघेना ॥ २५ ॥ रजोगुणें आलिया सकाम । त्यासी क्षोभूं न शके काम । म्हणे माझेनि चाले काम्य कर्म । शेखीं मी निष्काम निजांगें ॥ २६ ॥ होतां काम्य कर्माचा सोहळा । जेवीं सूर्या न बाधी उन्हाळा । तेवीं काम्य कर्मीं मी जिव्हाळा । माझेनि सोज्ज्वळा काम सवेग ॥ २७ ॥ तमोगुणाच्या झडाडा । पडिला महामोहाचा वेढा । न करितां मोहाचा निझाडा । मोहनिर्णय गाढा आपण पैं जाणे ॥ २८ ॥ सूर्यो न दिसे जिकडे । अंधारू व्यापी तिकडे । तेवीं स्वरूपनिष्ठेपुढें । न बाधी सांकडें मोहाचें ॥ २९ ॥ अंगीं आदळतां तिन्ही गुण । जो गजबजीना आपण । ते निजनिष्ठा निज-निर्गुण । उद्धवा जाण निश्चित ॥ ३३० ॥ अज्ञानाच्या अवसरीं । ज्ञानाची चाड न धरी । प्रवर्तता कामाचारीं । निष्कामाचा न करी पांगडा ॥ ३१ ॥ आदळतां मोहाचीं झटें । ज्याचा बोध कदा न पालटे । त्रिगुणी निर्गुणत्वें राहाटे । माझिया निष्ठें मद्भक्त ॥ ३२ ॥ त्रिगुणांचा त्रिविध वास । निर्गुण निजरहिवास । येचि अर्थीं हृषीकेश । विशद विलास सांगत ॥ ३३ ॥

वनं तु सात्त्विको वासो ग्रामो राजस उच्यते । तामसं द्यूतसदनं मन्निकेतं तु निर्गुणम् ॥ २५ ॥

पवित्र आणि तीर्थभूत । विजन वन एकांत । ऐशिये वस्तीं सुखावे चित्त । तो वास निश्चित सात्त्विक ॥ ३४ ॥ वस्तीं व्यवहारीं व्यापारीं । कां सदा सन्मानें राजद्वारीं । विवाहमंडपामाझारीं । ज्यासी प्रीति भारी वस्तीसी ॥ ३५ ॥ ज्यासी आवडे धनसंपदा । निकटवासें वसती प्रमदा । जो नगरीं ग्रामीं वसे सदा । हे वस्ती संपदा राजस ॥ ३६ ॥ जेथ सन्मान वांछी चित्त । सदा क्षोभे विषयासक्त । ऐसऐशी वस्ती जेथ । ते जाण निश्चित राजस ॥ ३७ ॥ जेथ साधुनिंदा जोडे । जेथ गुणदोषीं दृष्टि

समुद्राला येऊन मिळाल्या असतां, त्यांत समुद्राला जसा उल्हास वाटत नाहीं, त्याचप्रमाणें ज्ञानी ज्ञानस्फूर्तीची मोठी प्रतिष्ठा मानीत नाहींत. २५ रजोगुणानें त्याच्या मनांत एखादी इच्छा उद्भवली, तरी तो तिच्या योगानें क्षुब्ध होत नाहीं. तो म्हणत असतो कीं, माझ्यामुळेंच जरी काम्यकर्म चालत असतें, तरी मी निष्कामच आहें. २६ सूर्याला जसा उन्हाळा ताप देत नाहीं तसा मी काम्यकर्म करण्यास पुढाकार घेतला व तें कर्म सुव्यवस्थित केलें तरी मीं त्यानें लिप्त होत नाहीं. २७ तमोगुण वाढला असतां महामोहाचा वेढा पडतो. परंतु त्या मोहाला झाडून न टाकितां तो त्याचें खरें स्वरूप पक्कें ओळखून असतो. २८ जेथें सूर्याचा प्रकाश नसतो, त्याच प्रदेशाला अंधार व्यापून टाकितो. त्याप्रमाणें आत्मस्वरूपनिष्ठेला महामोहाचें संकट भासत नाहीं. २९ उद्धवा ! याप्रमाणें सत्त्व-रज-तम हे तीन्ही गुण अंगावर येऊन आदळले, तरीहि जो यःकिंचित्‌हि डळमळत नाहीं, तोच खरा आत्मनिष्ठ निर्गुण वृत्तीचा होय, हें खात्रीनें जाण. ३३० अज्ञानाच्या प्रसंगीं तो ज्ञानाची चाड धरीत नाहीं, विषयांमध्यें प्रवृत्त असतां निष्कामाची अपेक्षा करीत नाहीं, ३१ मोहाची धोंड त्याच्यावर येऊन आदळली तरी त्याच्या ज्ञानांत कधीं बदल होत नाहीं, तर माझा भक्त माझ्यावर निष्ठा ठेवून त्रिगुणांतच निर्गुण होऊन रहातो. ३२ त्रिगुणांचें तीन प्रकारचें वास्तव्य आणि निर्गुणाची वस्ती यांचा निवासस्थानाचा प्रकार श्रीकृष्ण आतां स्पष्ट करून सांगत आहे. ३३३.

वनं तु सात्त्विकः वासः-वन हा विविक्त-एकान्त व पवित्र देश असल्यामुळें त्यांतील वास सात्त्विक होय. ग्रामः राजसः उच्यते-ग्राम हा राजस वास म्हटला आहे. द्यूतसदनं तामसं-द्यूतादि क्रीडास्थानें हा तामस वास आहे. तु मन्निकेतनं निर्गुणं-परंतु माझें स्थान हा निर्गुण वास आहे. [कारण त्यांत साक्षात् माझा आविर्भाव झालेला असतो.] २५.

पवित्र तीर्थांच्या ठिकाणीं, निर्जन वनांत किंवा एकान्त जागीं रहाण्यांत ज्याला समाधान वाटतें तो खरोखर सात्त्विक होय. ३४ व्यवहाराच्या किंवा व्यापाराच्या जागीं वास्तव्य, मोठ्या सन्मानानें राजदरबारीं रहाण्यास किंवा विवाहादि समारंभाच्या मंडपांत वस्ती करण्याची ज्याला अत्यंत आवड असते; ३५ ज्याला द्रव्य, संपत्ति व स्त्रिया यांचा सहवास अतिशय प्रिय वाटतो; जो शहरांत किंवा गांवांत नेहमीं रहातो तो राजस जाणावा. ३६ जेथें मन मान-सन्मानाची इच्छा करीत असतें, सतत विषयासक्तीनें क्षुब्ध झालेलें असतें तें स्थल निश्चयानें राजस समजावें

वाढे । ऐशिया ठायीं वस्ती आवडे । तें तामसाचें गाढें निवासस्थान ॥ ३८ ॥ जेथ कलहाचें कारण । जेथ अविवेकी होय मन । वेश्या द्यूत मद्यसदन । हें निवासस्थान तामस ॥ ३९ ॥ देवालयीं घवघविती । देखोनि माझी निजमूर्ती । साचार सुखावे चित्तवृत्ती । ते निर्गुण वस्ती उद्धवा ॥ ३४० ॥ अभेदभक्तांचें निजमंदिर । तें मज निर्गुणाचें निजघर । तेथ सुखत्वें ज्याची वृत्ति स्थिर । ते वस्ती साचार निर्गुण ॥ ४१ ॥ निर्गुणासी घरठावो । हें बोलणें म्हणसी वावो । जेथ उपजे ब्रह्मसद्भावो । ते वस्ती पहा वो निर्गुण ॥ ४२ ॥ विषयातीत निजस्थिती । सुखें सुखरूप राहे वृत्ती । ते निर्गुणाची निजवस्ती । जाण निश्चितीं उद्धवा ॥ ४३ ॥ सांडूनि आकाराचें ज्ञान । निराकारीं सुखसंपन्न । वृत्ति स्थिरावे परिपूर्ण । ते वस्ती निर्गुण जनीं विजनीं ॥ ४४ ॥ त्रिगुणसंगें त्रिविध कर्ता । निर्गुणलक्षणीं लक्षिजे चौथा । चतुर्विध कर्त्यांची व्यवस्था । ऐक आतां सांगेन ॥ ४५ ॥

सात्त्विकः कारकोऽसङ्गी रागान्धो राजसः स्मृतः । तामसः स्मृतिविभ्रष्टो निर्गुणो मदपाश्रयः ॥ २६ ॥

कांटेनि कांटा फेडितां । जेवीं निवारे निजव्यथा । तेवीं संगें संगातें छेदितां । सात्त्विकर्ता असंगी ॥ ४६ ॥ सद्गुरुचरणसत्संगें । सकळ संग छेदी विरागें । सात्त्विक कर्ता निजांगें । विषयसंगें असंगी ॥ ४७ ॥ फळाभिलाषेच्या चित्तीं गांठी । तेणें अंध झाली विवेकदृष्टी । राजस कर्ता फळाशेसाठीं । अतिदुःखकोटी स्वयें सोशी ॥ ४८ ॥ निशेष हारपे विवेकज्ञान । स्मृति सैरा बळवे रान । नाठवे कार्य कारण । ऐसा कर्ता जाण तामस ॥ ४९ ॥ अनन्य भावें हरीसी शरण । कर्मचाळक श्रीनारायण । कदा

---

३७ ज्या ठिकाणीं साधूंची निंदा होत असते, दृष्टि नेहमीं गुण-दोषांना पहात असते व अशा जागीं रहाण्यास ज्यांना आवडतें तें तामस लोकांचें निवासस्थान जाणावें. ३८ जेथें मन अविवेकी होतें व जेथें कलहाचें कारण असतें, अशीं वेश्यागृहें, जुगारीचा अड्डा, दारूचा गुत्ता इत्यादि हीं तामस निवासस्थानें होत. ३९ उद्धवा ! देवालयांतील माझी घवघवीत मूर्ति पाहून मन प्रसन्न होतें. ती निर्गुण वस्ती समजावी. ३४० अद्वैत बुद्धीनें माझी भक्ति करणाऱ्या माझ्या भक्तांचें जें हृदयमंदिर तेंच मज निर्गुणाचें माहेरघर आहे. ४१ तेथें ज्याचें चित्त मोठ्या सुखानें स्थिर होतें ती खरी निर्गुण वस्ती समजावी. निर्गुणाचें घर-दार, ठाव-ठिकाण हें बोलणेंहि वास्तविक व्यर्थ आहे. जेथें परब्रह्मस्वरूप प्रकट होतें तेंच निर्गुणाचें वसतिस्थान जाणावें. ४२ उद्धवा ! विषयांच्या पलीकडली जी आत्मस्थिति त्यांत वृत्ति एकरूप होऊन रहाणें, हीच खरोखर निर्गुणाची रहाण्याची जागा आहे. ४३ आकाराचें ज्ञान सोडून निराकारांत सुख-संपन्न होणें, त्यांतच वृत्ति पूर्णपणें स्थिर करणें, हेंच जनांतील किंवा वनांतील निर्गुणाचें निवासस्थान होय. ४४ उद्धवा ! तीन गुणांच्या योगें तीन प्रकारचे कर्ते आणि निर्गुणाच्या लक्षणाचा चवथा कर्ता अशा चार प्रकारच्या कर्त्यांची स्थिति सांगतों, ती ऐक. (सद्गुरूच्या संगतीनें वैराग्ययुक्त होऊन विषयासक्ति टाकणारा कर्ता सात्त्विक; फलाभिलाषी विषयासक्त कर्ता राजस; विवेकज्ञान नष्ट झाल्यामुळें मनसोक्त आचरण करणारा तामस आणि कोणत्याहि कर्माचा अभिमान न धरणारा कर्ता निर्गुण होय.) ३४५.

असङ्गी कारकः सात्त्विकः—अनासक्त कर्ता सात्त्विक आहे. रागान्धः राजसः स्मृतः—अतिशय अभिनिवेशवान् कर्ता राजस म्हटला आहे. स्मृतिविभ्रष्टः तामसः—अनुसंधानरहित कर्ता तामस होय. मदपाश्रयः निर्गुणः—व मदेकशरण कर्ता निरहंकारत्वामुळें निर्गुण होय. २६.

कांट्यानें कांटा काढला असतां जशी व्यथा दूर होते, तसा संगानेंच संग घालविला असतां असंग सात्त्विक कर्ता होतो. ४६ सद्गुरुचरणांच्या संगतीमुळें उपजलेल्या विरक्तीनें जो सर्व आसक्तींचा छेद करितो व विषयांविषयीं अनासक्त होतो, तो सात्त्विक कर्ता होय. ४७ मनांत फलाच्या अभिलाषाच्या गांठी बसल्यामुळें ज्याची विवेकदृष्टि आंधळी होते तो राजसकर्ता होय. तो फलाशेनें दुःखाच्या राशी भोगीत असतो. ४८ ज्याचें विवेकज्ञान निःशेष नाहींसें होऊन स्मृति सगळ्या रानांत सैरा-वैरा भटकत फिरते, कार्य-कारण आठवेनासें होतें, असा कर्ता तामस समजावा. ४९ अनन्य भावानें प्रभूला शरण जाऊन या सर्वांचा चालक श्रीहरि आहे, असें मानून जो

न धरी कर्माभिमान । हा कर्ता निर्गुण निश्चयें ॥ ३५० ॥ त्रिगुणांची श्रद्धा त्रिविध । निर्गुणाची श्रद्धा शुद्ध । येच अर्थीचें विशद । स्वयें गोविंद सांगत ॥ ५१ ॥

सात्त्विक्याध्यात्मिकी श्रद्धा कर्मश्रद्धा तु राजसी । तामस्यधर्मे या श्रद्धा मत्सेवायां तु निर्गुणा ॥ २६ ॥

देह इंद्रियें चेतना प्राण । येणेंसीं स्फुरे जें मीपण । तेथ विवेक करूनियां पूर्ण । आपुलें मीपण आपण पाहे ॥ ५२ ॥ देह नव्हें मी जडमूढत्वें । इंद्रियें नव्हें मी एकदेशित्वें । प्राण नव्हें मी चपळत्वें । मन चंचळत्वें कदा मी नव्हें ॥ ५३ ॥ चित्त नव्हें मी चिंतकत्वें । बुद्धि नव्हें मी बोधकत्वें । 'अहं' नव्हें मी बाधकत्वें । मी तों येथें अनादिसिद्ध ॥ ५४ ॥ एवं मीपणाचें निजसार । विवंचूं जाणे बुद्धिचतुर । ते अध्यात्मश्रद्धा उदार । सात्विक नर सदा वाहती ॥ ५५ ॥ जें जें मी नव्हें म्हणत जाये । तें मी देखल्या मीचि आहें । माझ्या मीपणाचे वंदिल्या पाये । मीचि मी ठायें कोंदोनी ॥ ५६ ॥ हे आध्यात्मिकी शुद्ध श्रद्धा । सात्विकापाशीं वसे सदा । आतां राजसाची श्रद्धा । ऐक प्रबुद्धा सांगेन ॥ ५७ ॥ मी एक येथें वर्णाश्रमी । मी एक येथें आश्रमधर्मी । मी एक येथें कर्ता कर्मी । हें मनोधर्मी दृढ मानी ॥ ५८ ॥ येणें भावार्थें कर्मतत्परू । कुशमृत्तिकेचा अत्यादरू । अतिशयें वाढवी शौचाचारू । विधिनिषेधां थोरू आवर्त भोंवे ॥ ५९ ॥ दोषदृष्टीच्या रंगणीं । मिरवती गुण-दोषांच्या श्रेणी । पवित्रपणाच्या अभिमानीं । ब्रह्मयासी न मनी शुचित्वें ॥ ३६० ॥ देहाभिमान घेऊनि खांदा । सत्य मानणें कर्मबाधा । ते हे राजसाची कर्मश्रद्धा । जाण प्रबुद्धा उद्धवा ॥ ६१ ॥ अधिक अविवेक वाढे । जेणें अकर्म अंगीं घडे । अधर्माची जोडी जोडे । हे श्रद्धा आवडे तामसी ॥ ६२ ॥ जेथ अपेयाचें पान । स्वेच्छा अभक्ष्यभक्षण । अगम्यादि घडे गगन । हे श्रद्धा संपूर्ण तामसी

कसलाहि कर्माभिमान धरीत नाहीं, तो निर्गुण कर्ता समजावा. ३५० आतां त्रिगुणांची तीन प्रकारची श्रद्धा आणि निर्गुणाची शुद्ध श्रद्धा, यांविषयींचें स्पष्ट विवेचन स्वतः गोविंद करीत आहे. ३५१.

आध्यात्मिकी श्रद्धा सात्त्विकी—प्रत्यग्‌आत्म्याविषयींची जी श्रद्धा ती सात्त्विक होय. कर्मश्रद्धा तु राजसी—कर्माविषयींची जी श्रद्धा ती राजसी, अधर्मे या श्रद्धा सा तामसी—अधर्मामध्यें जी धर्मश्रद्धा ती तामसी, मत्सेवायां तु निर्गुणा—पण माझ्या सेवेविषयींची जी श्रद्धा ती निर्गुण होय. २७.

देह, इंद्रियें, चेतना आणि प्राण यांच्या योगानें मीपणाचा जो भास होतो, त्याचा पूर्णपणें विचार करून आपला 'मीपणा' आपणच पहाणें; देहाला जड-मूढत्व असल्यामुळें मी देह नव्हें; इंद्रियांना एकदेशित्व असल्यामुळें मी इंद्रियें नव्हें; प्राण चंचल असल्यामुळें मी प्राणहि नाहीं; मन चंचल असल्यामुळें मी मनहि नव्हें; ५३ चित्ताला चिंतनत्व असल्यामुळें मी चित्त नव्हें; बुद्धीला बोधकत्व असल्यामुळें मी बुद्धीहि नव्हें; 'अहं-'पणाला बाधकत्व असल्यामुळें मी 'अहं' हि नव्हें; तर मी अनादिसिद्ध आत्मतत्त्व आहें. ५४ याप्रमाणें बुद्धिमान् मनुष्य मीपणाच्या साराचें पूर्ण विवेचन करण्यास समर्थ होतो. अशा प्रकारची उदार अध्यात्मश्रद्धा सात्त्विक लोक नेहमीं बाळगितात. ५५ जें जें मी नव्हें असें म्हणतांच निवृत्त होतें, तें मीं पाहिल्यास मीच आहें. माझ्या मीपणाचें पायांना वंदन करून मीच सर्व भरून राहिलों आहें. ५६ अशी ही आध्यात्मिक शुद्ध श्रद्धा निरंतर सात्त्विकापाशीं अस्ते. आतां हे बुद्धिमान् उद्धवा, राजसाची श्रद्धा सांगतों, ती ऐक. ५७ मीच काय तो एक वर्णाश्रमी आणि आश्रमधर्मी कर्म-कर्ता; अशी दृढ मनोभावना ठेवणारा ५८ आणि या भावनेनेंच कर्मांत तत्पर होणारा व दर्भ, माती इत्यादि शुचिर्भूतपणाच्या साधनांना अतिशय महत्त्व देणारा असा जो साधक, त्याला विधिनिषेधांचा भोंवरा फार बाधत असतो; ५९ तो दोषदृष्टीच्या अंगणांत गुण-दोषांचे ढीग रचून ठेवितो; तो पवित्रपणाच्या अभिमानानें ब्रह्मदेवालाहि शुद्ध समजत नाहीं; ३६० तर देहाभिमानाला खांद्यावर घेऊन कर्माची बाधा सत्य मानितो. उद्धवा ! ही राजस माणसाची कर्मश्रद्धा जाण. ६१ ज्यायोगें अविवेक वाढतो, हातांनीं अकर्म घडतें, अधर्म जडतो, अशी श्रद्धा तामस माणसाला आवडते. ६२ अपेयपान, अभक्ष्यभक्षण, अनुचित स्थलीं गमन याविषयीं रुचि असणें

॥ ६३ ॥ अधर्म तोचि मानी धर्म । हें तामसी श्रद्धेचें वर्म । आतां निर्गुण श्रद्धा परम । उत्तमोत्तम ते ऐक ॥ ६४ ॥ सर्व भूतीं भगवंत । ऐशिये श्रद्धें श्रद्धावंत । अनन्य भावें भूतां भजत । तो भजनभावार्थ निर्गुण ॥ ६५ ॥ स्त्री पुत्र वित्त जीवित । मजलागीं कुरवंडी करित । अनन्य भावें जे मज भजत । ते श्रद्धा निश्चित निर्गुण ॥ ६६ ॥ चारी पुरुषार्थ त्यागिती । उपेक्षूनि चारी मुक्ती । ऐक्यभावें मज भजती । ते श्रद्धासंपत्ति निर्गुण ॥ ६७ ॥ निष्काम नामस्मरण । निर्लोभ हरिकीर्तन । भावार्थें जें जें भजन । ते श्रद्धा निर्गुण उद्धवा ॥ ६७ ॥ त्रिगुणांचा त्रिविध आहारू । स्वयें सांगे शार्ङ्गधरू । निर्गुण आहाराचा प्रकारू । सखोल विचारू हरि सांगे ॥ ६९ ॥

पथ्यं पूतमनायस्तमाहार्यं सत्त्विकं स्मृतम् । राजसं चेन्द्रियप्रेष्ठं तामसं चार्तिदाशुचि ॥ २८ ॥

पवित्र आणि अळुवार । सत्ववृद्धीसी हितकर । अप्रयासीं प्राप्ति साचार । सात्विक आहार या नांव ॥ ३७० ॥ अल्पाहार या नांव पथ्य । पवित्र म्हणिजे धर्मार्जित । तेंही अप्रयासानें प्राप्त । तो जाण निश्चित सात्विकाहार ॥ ७१ ॥ गोड खरपूस आंबट । तळींव घोळींव तिखट । चिरींव चोळींव तुरट । वळींव वळिवट आळिलें ॥ ७२ ॥ रसीं रसांतर मिळणी । पन्हीं कालवणीं शिखरिणी । कुडकुडीं निर्पूस सणाणी । आहारभरणी राजस ॥ ७३ ॥ नाना परींच्या आवडी । सडिवा सोलिवा परवडी । रसनासुखाची अतिगोडी । तो आहार निरवडी राजस ॥ ७४ ॥ नाना परींचे आयास । करूनि अतिप्रयास । आहार सेविती राजस । ऐक तामस भोजन ॥ ७५ ॥ सेवितां दुर्गंधि उन्मादक । परिपाकें करी मूर्ख । अशुचि आणि दुःखदायक । हा आहार देख तामस ॥ ७६ ॥ भगवंताचा भुक्तप्रसाद ।

हें तामसश्रद्धेचें लक्षण जाणावें. ६३ अधर्माला धर्म समजणें हेंच तामसी श्रद्धेचें वर्म आहे. आतां उत्तमांतील उत्तम अशी श्रेष्ठ निर्गुण श्रद्धा ऐक. ६४ सर्व भूतांमध्यें भगवंत आहे, अशा श्रद्धेनें तो श्रद्धाळु अनन्य भावानें सर्व प्राणिमात्रांची सेवा करितो. हा निर्गुण भजनाचा प्रकार आहे. ६५ जो आपली स्त्री, पुत्र, धन, जीवित हीं सर्व माझ्यावरून ओवाळून टाकितो, अनन्यभावानें मला भजतो त्याची ती निर्गुण श्रद्धा समजावी. ६६ चारहि पुरुषार्थांचा त्याग करून, चारी मुक्तींची उपेक्षा करून जो ऐक्यभावानें माझें भजन करितो त्याची श्रद्धा खरोखर निर्गुण होय. ६७ उद्धवा ! निष्काम नामस्मरण, निर्लोभ हरिकीर्तन, भावार्थानें माझें भजन, हें निर्गुण श्रद्धेचें लक्षण जाणावें. ६८ आतां तीन गुणांचा तीन प्रकारचा आहार आणि निर्गुण आहाराचाहि प्रकार, यांविषयींचा गूढ विचार श्रीकृष्ण सांगत आहे. ३६९.

पथ्यं पूतं अनायस्तं आहार्यं सात्त्विकं स्मृतं—हितकर, शुद्ध व अनायासानें प्राप्त झालेलें जें भक्ष्यभोज्यादि तें सात्त्विक म्हटलेलें आहे. **इंद्रियप्रेष्ठं च राजसं**—इंद्रियांना अतिशय प्रिय असलेलें जें कडू, आंबट वगैरे भक्ष्यभोज्यादि तें राजस होय. **आर्तिदाशुचि तामसं च**—दैन्य उत्पन्न करणारें व अशुद्ध अन्न तामस आहे. ['च' शब्दानें मला निवेदन केलेलें अन्न निर्गुण आहे, असा अभिप्राय सुचविला आहे.] २८.

पवित्र, पचनास हलका, सौम्य, हितकर, विशेष प्रयासावांचून मिळणारा असा आहार सात्त्विक होय. ३७० अल्पाहार म्ह० पथ्य; पवित्र म्ह० धर्मानें मिळविलेला आणि तोहि प्रयासावांचून प्राप्त झालेला, याला सात्त्विक आहार म्हणतात. ७१ गोड, खमंग, आंबट, तळलेलें घोळलेलें, तिखट, चिरलेलें, चोळलेलें, तुरट, वळलेलें, वाटलेलें, आळिवलेलें रसांत मिसळलेलें, ७२ पन्हें, कालवण शिखरण, कुडकुडीत, खर्पूस, झणझणीत, तिखट अशा प्रकारच्या पदार्थांनें युक्त असलेला आहार राजस होय. ७३ धान्य किंवा फळभाज्या इत्यादि सोलून, सडून त्याचे नाना प्रकारच्या आवडीनें बनविलेलें अन्नाचे प्रकार ही जिव्हासुखाची गोडी राजस जाणावी. ७४ अनेक प्रकारें परिश्रम करून अतिशय मेहनतीनें बनविलेला आहार राजसांना प्रिय असतो. आतां तामस भोजनाचा प्रकार ऐक. ७५ ज्याचा नुसता वास घेतला असतां धुंदी चढते, जें सेवन केलें असतां मनुष्य झिंगून जातो असा अपवित्र, दुःखदायक पदार्थांचा आहार तामस होय. ७६ भगवानानें सेवन केल्यावर उरलेला प्रसाद, साधु-सज्जनांना देऊन राहिलेले पदार्थ हा प्रसिद्ध निर्गुण

साधुसज्जनांचें शेष शुद्ध । हा निर्गुण आहार प्रसिद्ध । 'च' कारें गोविंद बोलिला ॥ ७७ ॥ ग्रासोग्रासीं गोविंद । येणें स्मरणें अन्न शुद्ध । हा निर्गुण आहार प्रसिद्ध । 'च' कारें गोविंद बोलिला ॥ ७८ ॥ 'अन्नं ब्रह्म अहं च ब्रह्म' । पंक्तीकर तोही ब्रह्म । ऐसा ज्याचा भोजनानुक्रम । तो आहार परम निर्गुणत्वें ॥ ७९ ॥ त्रिगुणांचें त्रिविध सुख । निर्गुण सुख अलौलिक । त्याही सुखाचा परिपाक । यदुनायक स्वयें सांगे ॥ ३८० ॥

सात्त्विकं सुखमात्मोत्थं विषयोत्थं तु राजसम् । तामसं मोहदैन्योत्थं निर्गुणं मदपाश्रयम् ॥ २९ ॥

सांडूनि विषयसुखाची स्फूर्ती । आत्मसुखें सुखावे चित्तवृत्ती । ऐशिया निजसुखाची प्राप्ती । तें सुख निश्चितीं सात्त्विक ॥ ८१ ॥ गंगापूर भरे उन्नतीं । तेणें अमर्याद वोत भरती । तेवीं आत्मसुखाचिये प्राप्ती । इंद्रियां तृप्ति स्वानंदें ॥ ८२ ॥ नाना विषयांचें कोड । इंद्रियांचा अतिधुमाड । विषयसुख लागे गोड । तें सुख सुदृढ राजस ॥ ८३ ॥ अतिनिंद्य आणि उन्मादी । तेंचि सुख आवडे बुद्धी । तामस सुखाची हे सिद्धी । जाण त्रिशुद्धी उद्धवा ॥ ८४ ॥ हृदयीं प्रकटल्या माझी मूर्ती । विसरे संसाराची स्फूर्ती । त्यावरी जे होय सुखप्राप्ती । तें सुख निश्चितीं निर्गुण ॥ ८५ ॥ सर्व भूतीं वसे भगवंत । तोचि मी हा तात्त्विकार्थ । ऐसेनि मदैक्यें सुख प्राप्त । तें निजसुखार्थ निर्गुण ॥ ८६ ॥ देखिल्या निजात्मसुखरूप । स्वयें होइजे सुखरूप । हे निर्गुणसुखाचे निजदीप । झडल्या पुण्यपाप पाविजे ॥ ८७ ॥ आपण सुखस्वरूप सर्वांगीं । सुखस्वरूप स्वयें भोगी । हे निर्गुण सुखाची मागी । भक्ती अंतरंगीं भोगिजे ॥ ८८ ॥ कल्पांताचें पूर्ण भरितें । उरों नेदी नदीनदांतें । तेवीं निर्गुण सुख येथें । देहेंद्रियांतें उरों नेदी ॥ ८९ ॥ जेवीं मृगजळीं

आहार होय, असें श्लोकांतील 'च' या पदानें श्रीहरीनें सुचविलें आहे. ७७ अन्न ब्रह्म आहे, मी ब्रह्म आहें, आणि माझ्या पंक्तीला जेवणारेहि सर्व ब्रह्मच आहेत. ७८ अशी ज्याची भोजनाविषयीं दृढ भावना असते, त्याचा आहार निर्गुणत्वामुळें अत्यंत श्रेष्ठ होय. ७९ त्रिगुणांचे सुख तीन प्रकारचें असतें. परंतु निर्गुणाचें सुख मात्र अलौकिक आहे. त्या सुखाचीहि पूर्णावस्था यदुनायक श्रीकृष्ण स्वतः सांगत आहे. ३८०.

आत्मोत्थं सात्त्विकं—आत्म्यापासून उत्पन्न झालेलें सुख सात्त्विक आहे. विषयोत्थं तु राजसं—विषयांपासून उत्पन्न झालेलें राजस, मोहदैन्योत्थं तामसं—मोह व दैन्य यांपासून उत्पन्न झालेलें तामस, मदपाश्रयं निर्गुणं—आणि तत्-त्वं-पदार्थविषयत्वानें माझा आश्रय करून राहिलेलें जें सुख तें निर्गुण होय. २९.

विषयसुखाची स्फूर्ति टाकून चित्तवृत्ति आत्मसुखांतच रंगते. अशा आत्मसुखाची प्राप्ति हेंच खरें सात्त्विक सुख होय. ८१ गंगेसारख्या महानदीला पूर आला म्हणजे तिच्या जवळपासचे ओढे, नाले पाण्यानें जसे तुडुंब भरतात, त्याप्रमाणें आत्मसुखाला भरती आली म्हणजे इंद्रियें स्वानंदानें तृप्त होतात. ८२ अनेक विषयांची आवड, इंद्रियांचा गोंधळ, त्यांतील विषयसुखाची गोडी हें राजस सुख समजावें. ८३ अत्यंत निंद्य, उन्माद आणणारें सुख बुद्धीला आवडणें म्हणजे तामस सुखाचीच सिद्धि होय, असें हे उद्धवा तूं खात्रीनें जाण. ८४ हृदयांत माझी मूर्ति प्रकट झाली असतां संसारस्फूर्तीचा विसर पडतो. त्यामुळें ज्या सुखाची प्राप्ति होते, तें निश्चयानें निर्गुण सुख जाणावें. ८५ सर्व भूतांमध्यें भगवंत रहात आहे, तोच मी आहें, असा तात्त्विक अर्थ जाणून माझ्या ऐक्यानें ज्याला सुख होतें, तें निर्गुण आत्मसुख समजावें. ८६ आत्मसुखाचें स्वरूप पाहिलें असतां स्वतः तद्रूप होणें; या निर्गुण सुखाचा प्रकाश पापपुण्य निःशेष झाडून टाकल्यावरच प्राप्त होतो. ८७ आपण स्वतः सर्व अंगांनीं सुखस्वरूप होणें व सुखस्वरूपाची स्वतः प्रतीति घेणें, हा निर्गुणसुखाचा मार्ग भक्तानें अंतःकरणांतच अनुभवावा. ८८ कल्पांतींची पूर्ण भरती नदी व नद यांना जलमय केल्यावांचून जशी सोडीत नाहीं, त्याप्रमाणें हें निर्गुण सुख देह व इंद्रियें यांना बाकी ठेवीत नाहीं. ८९

जळ नाहीं । तेवीं परब्रह्माच्या ठायीं । प्रपंच स्पर्शिलाचि नाहीं । तें सुख निर्वाही निर्गुण ॥ ३९० ॥ ज्या सुखाची मर्यादा । करितां न करवे कदा । सुखें सुखस्वरूप होइजे सदा । हे सुखसंपदा निर्गुण ॥ ९१ ॥ त्रिगुण आणि निर्गुण । यांचें दाविलें भेदलक्षण । आतां त्याचें उपसंहरण । ग्रंथांतीं जाण हरि करी ॥ ९२ ॥

द्रव्यं देशः फलं कालो ज्ञानं कर्म च कारकः । श्रद्धाऽवस्थाऽऽकृतिर्निष्ठा त्रैगुण्यः सर्व एव हि ॥ ३० ॥

द्रव्यशब्दें आहार त्रिविध । देशशब्दें वनग्रामभेद । फळशब्दें सुखउद्बोध । सत्वसंबंधविभागें ॥ ९३ ॥ काळशब्दें भगवद्भजन । कैवल्यनिष्ठा या नांव ज्ञान । कर्म म्हणिजे मदर्पण । कर्ता तो जाण असंगी ॥ ९४ ॥ श्रद्धाशब्दें आध्यात्मिकी । अवस्थाशब्दें जागरणादिकी । आकृतिशब्दें उपरिलोकीं । देवतादिकीं क्रीडन ॥ ९५ ॥ जो गुण वाढे देहांतीं । जेणें गुणें होय अंतःस्थिती । त्या नांव निष्ठा म्हणती । जाण निश्चिती उद्धवा ॥ ९६ ॥ भिन्न भिन्न भाग अनेक । किती सांगूं एकेक । अवघें जगचि त्रिगुणात्मक । जाण निष्टंक निजभक्ता ॥ ९७ ॥ संसार समस्त त्रिगुण । यांमाजीं मी अवघा निर्गुण । हे तुज कळावया निजखूण । गुणनिरूपण म्यां केलें ॥ ९८ ॥

सर्वे गुणमया भावाः पुरुषाव्यक्तधिष्ठिताः । दृष्टं श्रुतमनुध्यातं बुद्ध्या वा पुरुषर्षभ ॥ ३१ ॥

देखिजे अथवा ऐकिजे । कां मनें जें जें चिंतिजे । तें तें अवघेंचि जाणिजे । मायागुणकाजें त्रिगुणात्मक ॥ ९९ ॥ करावया त्रिगुणांचें मर्दन । प्रकृतिनियंता पुरुष भिन्न । तो सर्वदा सर्वांगें

मृगजलांत जसा पाण्याचा थेंबहि नसतो, त्याप्रमाणें परब्रह्माला प्रपंचाचा लेशहि स्पर्श करीत नाहीं; असें जें सुख तें निर्गुण समजावें. ३९० ज्या सुखाला कोणालाहि मर्यादा घालतां येत नाहीं, ज्या सुखानें तो निरंतर सुखस्वरूप होतो ती निर्गुण सुखसंपत् होय. ९१ याप्रमाणें त्रिगुण आणि निर्गुण यांचें भेदलक्षण दाखविलें. आतां हरि अध्यायाच्या शेवटीं त्याचा उपसंहार करीत आहे. ३९२.

—याप्रमाणें सांगितलेलें जें संसारहेतुभूत त्रैगुण्य त्यांचा दोन श्लोकांनीं उपसंहार करितात—

द्रव्यं०.........निष्ठा—हित व शुद्ध इत्यादि द्रव्य, वन, ग्राम इत्यादि देश, सात्त्विकादि सुखरूप फल, माझ्या भजनाचा वगैरे काल, पूर्वोक्त सात्त्विकादि ज्ञान, कर्म, कर्ता, श्रद्धा, अवस्था ऊर्ध्वगमनादि कृति, स्वर्गगमनादि निष्ठा, **सर्व एव हि त्रैगुण्यः**—असा हा सर्वहि भाव त्रिगुणात्मक आहे. ३०.

द्रव्यशब्दानें तीन प्रकारचा आहार, देशशब्दानें वन, गांव इत्यादि भेद, फल शब्दानें सुखाचा अनुभव, यांचे सत्त्वगुणांच्या संबंधानें विभाग होतात. ९३ काळशब्दानें भगवद्भजन, कैवल्यनिष्ठा म्हणजे ज्ञान, कर्म, म्ह० मदर्पण, जो असंग तो कर्ता, असें जाण. ९४ श्रद्धा म्ह० आध्यात्मिक श्रद्धा, कर्ता अवस्था म्ह० जागरणादिक; आकृति म्ह० ऊर्ध्व लोकांतील देवतादिकांचें विलास. ९५ उद्धवा ! मरणसमयीं जो गुण वाढतो त्या गुणानुसार अंतःकरणाची वृत्ति होते. त्यालाच निष्ठा असें म्हणतात. ९६ असे त्याचे अनेक भाग आहेत. त्यांतील एकेक कोठपर्यंत सांगूं ! हे एकंदर जगत् सत्त्व-रज-तमो-गुणांनीं युक्त आहे, हे माझ्या भक्ता उद्धवा ! हें तूं खात्रीनें समज. ९७ हा सगळा संसारच त्रिगुणात्मक आहे. त्यांत मीच काय तो निर्गुण आहें, हें तुला कळावें म्हणून मीं एवढें गुणनिरूपण केलें. ३९८.

—केवल हा एवढाच भाव त्रिगुणात्मक आहे असें नाहीं तर—

पुरुषाव्यक्तधिष्ठिताः सर्वे भावाः गुणमयाः—पुरुष व अव्यक्त यांनीं अधिष्ठित असलेले पदार्थ गुणमय आहेत. (आतां यांचाच विस्तार—) **पुरुषर्षभ**—हे पुरुषश्रेष्ठा ! **दृष्टं श्रुतं बुद्ध्या वा अनुध्यातं**—जें प्रत्यक्ष पाहिलेलें, ऐकलेलें किंवा बुद्धीनें चिंतिलेलें तें सर्व गुणमय आहे. ३१.

आपण जें जें कांहीं पहातों, ऐकतों, मनानें चिंतितों तें तें सगळें मायेच्या गुणकार्यानें त्रिगुणात्मकच झालेलें आहे. ९९ या तीन गुणांचें निरसन करणारा पुरुष प्रकृतीचा नियंता असून तो प्रकृतीहून भिन्न आहे. तो सदा-

निर्गुण । वर्तवी गुण निजसत्ता ॥ ४०० ॥ पुरुषावेगळें समस्त । प्रकृतिकार्य मिथ्याभूत । त्यातें बोलिजे गुणवंत । जाण निश्चित उद्धवा ॥ १ ॥ नरदेह पावोनियां येथ । जे न साधिती गुणातीत । ते नाडले हातोहात । निजस्वार्थ बुडाला ॥ २ ॥ तैसी नव्हे तुझी मती । विनटलासी भगवद्भक्ती । तेव्हांचि तूं गुणातीतीं । जाण निश्चितीं जडलासी ॥ ३ ॥ हरिभक्तांमध्यें वरिष्ठ । यालागीं निजमुखें वैकुंठ । उद्धवासी म्हणे पुरुषश्रेष्ठ । भाग्यें उत्कृष्ट तूं एक ॥ ४ ॥ त्रिगुणगुणीं सविस्तारू । दृढ वाढला संसारतरू । त्याचे छेदाचा कवण प्रकारू । तो शार्ङ्गधरू सांगत ॥ ५ ॥

एताः संसृतयः पुंसो गुणकर्मनिबन्धनाः । येनेमे निर्जिताः सोम्य गुणा जीवेन चित्तजाः ।
भक्तियोगेन मन्निष्ठो मद्भावाय प्रपद्यते ॥ ३२ ॥

सत्वादि तिन्ही गुण एथ । केवळ आणि मिश्रित । पुरुषातें संसारीं करीत । गुणकर्मीं निश्चित बांधोनि ॥ ६ ॥ त्रिगुणकर्मास्तव जाण । जीवासी झालें दृढ बंधन । जेवीं घटमाजील जीवन । दावी आडकलेपण रविबिंबा ॥ ७ ॥ घटीं भरल्या समळ जळ । त्यामाजीं रवि दिसे समळ । घटींचें डोलतांचि जळ । कांपे चळचळ रविबिंब ॥ ८ ॥ तेवीं त्रिगुणांचें कर्माचरण । शुद्धासी आणी जीवपण । तें छेदावया जीवबंधन । भगवद्भजन साधावें ॥ ९ ॥ जिणावया गुणबंधन । रिघावें सद्गुरूसी शरण । तेथ मद्भावें करितां भजन । वाढे सत्वगुण अतिशुद्ध ॥ ४१० ॥ पायीं जडली लोहाची बेडी । ते लोहेंचि लोहार तोडी । तेवीं सत्वगुणाचिया वोढी । त्रिगुणांतें तोडी गुरुरावो ॥ ११ ॥ तेथ प्रवेशावया गुणातीतीं । अवश्य करावी गुरुभक्ती । जे गुरु-

---

सर्वदा पूर्णपणें निर्गुण असून आपल्या सत्तेनेंच गुणांना वागवितो. ४०० पुरुषावांचून प्रकृतीचें सगळें कार्य मिथ्याभूत आहे. उद्धवा ! असें जो जाणतो, तो गुणातीत होय. १ या मृत्युलोकांत मनुष्यजन्म प्राप्त झाला असतांहि जे गुणातीत होत नाहींत, ते पूर्णपणें नाडले गेले व आपल्या स्वार्थाला आंचवले म्हणून समजावें; २ पण तुझी बुद्धि तशी नाहीं. तूं भगवद्भक्तींत रंगलास तेव्हांच खरोखर गुणातीत झालास. ३ उद्धव हरिभक्तांत श्रेष्ठ होता, म्हणूनच श्रीकृष्णानें आपल्या मुखानें त्याला 'पुरुषश्रेष्ठ' असें संबोधून, तूंच काय तो खरा भाग्यवान् आहेस, असें म्हटलें. ४ तीन गुणांच्या विस्तारानेंच संसारवृक्ष पसरला आहे. तो कशा प्रकारें तोडावा हेंच आतां श्रीकृष्ण सांगत आहे. ४०५.

—आतां या उक्त त्रैगुण्याच्या संसारहेतूत्वाचा अनुवाद करणारे भगवान् त्रैगुण्याच्या विजयानें मोक्ष मिळतो असें पुढील दीड श्लोकांनीं सांगतात—

पुंसः एताः गुणकर्मनिबन्धनाः संसृतयः–पुरुषाच्या या गुणकर्ममूलक संसृति आहेत. सोम्य–हे प्रियदर्शना उद्धवा ! येन जीवेन इमे चित्तजाः गुणाः निर्जिताः–ज्या जीवानें हे चित्तापासून उत्पन्न झालेले गुण जिंकिले आहेत, सः भक्तियोगेन मन्निष्ठः सन् मद्भावाय प्रपद्यते–तो निश्चल भक्तियोगानें मन्निष्ठ होऊन मोक्षाला योग्य होतो. ३२.

हे सत्त्वादि तीन्ही गुण शुद्ध असोत किंवा मिश्र असोत, ते पुरुषाला गुण-कर्मांनीं बद्ध करून संसारी बनवितात. ६ घटांतील जल जसें सूर्याच्या प्रतिबिंबाला अडकवून ठेविलें आहे, असें भासवितें, त्याप्रमाणें या तीन गुणांमुळें जीव दृढ बंधनांत पडला आहे, असें दिसतें. ७ घागरींतील पाणी गढूळ असलें म्हणजे त्यांतील सूर्याचें प्रतिबिंबहि मलिन दिसूं लागतें, त्यांतील पाणी हालूं लागतांच प्रतिबिंबहि चंचल झालेलें दिसतें. ८ त्याप्रमाणें त्रिगुणाचें कर्माचरण शुद्ध आत्म्याला जीवपणा आणितें. यास्तव जीवबंधन तोडून भगवद्भजन साधावें. ९ गुणांच्या बंधनाला जिंकण्यासाठीं सद्गुरूला शरण जावें. तेथें भक्तिभावानें भजन केलें असतां अतिशय शुद्ध सत्त्वगुण वाढतो. ४१० पायांत लोखंडाची बेडी पडली असतां लोहार तिला लोखंडानेंच जसा तोडितो, त्याप्रमाणें सत्त्व गुण वाढला म्हणजे सद्गुरूच तीन्ही गुणांना तोडून टाकितो. ११ यास्तव गुणातीत होण्यासाठीं अवश्य गुरुभक्ति करावी.

भजनीं विश्वासती । त्यांसी चारी मुक्ती आंदण्या ॥ १२ ॥ ज्यासी गुरुचरणीं भगवद्भावो । त्याचे सेवेसी ये ब्रह्मसद्भावो । तेथ ब्रह्मसद्भावेंसी पहा हो । मी देवाधिदेवो सबाह्य तिष्ठें ॥ १३ ॥ जो गुरुचरणीं अनन्य शरण । तो सहजें होय ब्रह्मसंपन्न । गुरुरूपें करितां माझें भजन । ब्रह्मसमाधान मद्भक्ता ॥ १४ ॥ उद्धवा ऐसें माझें भजन । समूळ जाणशी तूं संपूर्ण । यालागीं ' सौम्य ' हें विशेषण । स्वमुखें श्रीकृष्ण संबोधी ॥ १५ ॥ भाग्यें नरदेह पावल्याजाण । अवश्य करावें माझें भजन । येचि अर्थीचें निरुपण । स्वमुखें श्रीकृष्ण प्रतिपादी ॥ १६ ॥

तस्माद्देहमिमं लब्ध्वा ज्ञानविज्ञानसंभवम् । गुणसङ्गं विनिर्धूय मां भजन्तु विचक्षणाः ॥ ३३ ॥

ज्या नरदेहाकारणें । अमर उत्कंठित मनें । त्या देहाचे जाहलेपणें । ज्ञान पावणें निष्टंक ॥ १७ ॥ नरदेह पावल्या जाण । आपणचि नव्हे ब्रह्मज्ञान । तेथें करावें माझें भजन । देहाभिमान सांडूनी ॥ १८ ॥ करितां माझें अनन्य भजन । सहजें वाढे सत्वगुण । सत्वगुणास्तव जाण । उपजे ज्ञान सविवेक ॥ १९ ॥ विवेकज्ञानाचिये वृत्ती । रज तम दोनी झडती । शोधित सत्वाचिये स्थिती । अभेद भक्ति उल्हासे ॥ ४२० ॥ करितां माझें अभेद भजन । होय स्वानंदाचें स्वादन । त्या नांव बोलिजे विज्ञान । तेथ तिनी गुण मिथ्यात्वें ॥ २१ ॥ नरदेह जोडलिया हातीं । प्राण्यासी एवढी प्राप्ती । यालागीं मनुष्यदेहीं भक्ती । अवश्य समस्तीं करावी ॥ २२ ॥ हें भागवतींचें अतिगुह्य ज्ञान । मुख्यत्वेंसी भक्तिप्राधान्य । भावें करितां माझें भजन । स्त्रिया शूद्रजन उद्धरती ॥ २३ ॥ नरदेह जोडल्या जाण । माझी भक्ति करिती विचक्षण । भजनें जिणोनि गुणागुण । ब्रह्म परिपूर्ण स्वयें होती ॥ २४ ॥ पूर्ण ब्रह्माचिया प्राप्ती । निरपेक्ष माझी भक्ति । तोचि भजनभाव श्रीपती । पुनः पुनः श्लोकार्थीं दृढ दावी ॥ २५ ॥

गुरुभक्तीवर विश्वास ठेवणारांच्या चारी मुक्ति दासी होतात. १२ गुरुचरणांवर ज्याचा भगवद्भाव असतो, त्याच्या सेवेला ब्रह्मभावना येत असते. इतकेंच केवळ नव्हे, तर मी देवाधिदेव त्याच्या सेवेंत अंतर्बाह्य तिष्ठत उभा असतों. १३ अनन्यभावानें गुरुचरणांना शरण जाणारा सहज ब्रह्मसंपन्न होतो. गुरुरूपानें माझें भजन करणाऱ्या माझ्या भक्तांना ब्रह्मसमाधान प्राप्त होतें. १४ उद्धवा ! असें माझें भजन तूं पूर्णपणें जाणतोस, असें म्हणून श्रीकृष्णानें त्याला हें ' सौम्य ' असें स्वमुखानें संबोधिलें. १६ मोठ्या भाग्यानें मनुष्यजन्म प्राप्त झाल्यावर माझें अवश्य भजन करावें. याविषयींचें निरूपण श्रीकृष्ण स्वतः करीत आहे. ४१६.

—तस्मात् विवेक्यांना हेंच युक्त आहे, असें सांगतात —

तस्मात् ज्ञानविज्ञानसंभवम् इमं देहं लब्ध्वा—म्हणून ज्यांत ज्ञान व विज्ञान यांची उत्पत्ति होते, अशा या नरदेहास प्राप्त होऊन, **गुणसङ्गं विनिर्धूय**—गुणासक्ति सर्वथा टाकून, **विचक्षणाः मां भजन्तु**—बुद्धिमान् लोक माझें भजन करोत. ३३.

ज्या नरदेहाच्या प्राप्तीसाठीं देवांचेंहि मन उत्सुक असतें, तो मनुष्यजन्म प्राप्त झाला असतां अखंड ज्ञान संपादावें. १७ मनुष्यजन्माच्या प्राप्तीबरोबर ब्रह्मज्ञान स्वभावतःच कांहीं प्राप्त होत नाहीं. त्यासाठीं देहाभिमान टाकून माझें भजन करावें लागतें. १८ माझें अनन्य भजन केलें असतां सत्त्वगुण सहज वाढत जातो. सत्त्वगुण वाढला म्हणजे विवेकयुक्त ज्ञान उपजतें. १९ विवेकज्ञानाच्या योगें रज-तम हीं दोन्हीं गळून जातात आणि अभेद भक्ति मोठ्या उल्हासानें शुद्धसत्वांत रहाते. ४२० माझें अभेद भजन केलें असतां स्वानंदाचें सेवन घडतें. त्यालाच विज्ञान असें म्हणतात. त्यायोगें त्रिगुण मिथ्या आहेत असा निश्चय होतो. २१ मनुष्यजन्म लाधला असतां जीवांला एवढी थोरली प्राप्ति होते. यास्तव सर्वांनीं मनुष्य देहांत अवश्य भक्ति करावी. २२ हें भागवतांतील अत्यंत गुह्य ज्ञान आहे. मुख्यत्वें करून तें भक्तिप्रधान आहे. भक्तिभावानें माझें भजन केलें असतां स्त्रिया आणि शूद्रहि उद्धरून जातात. २३ मनुष्यजन्माची प्राप्ति झाली असतां ज्ञाते लोक माझी भक्ति करितात आणि भजनानें गुण-अवगुणांना जिंकून स्वतःच पूर्ण ब्रह्म होऊन रहातात. २४ पूर्ण ब्रह्मप्राप्तीसाठीं माझी निरपेक्ष भक्ति करावी. तोच भजनाचा प्रकार श्रीहरि पुनः पुनः दृढ करून पुढील श्लोकांत सांगत आहे. ४२५.

निःसङ्गो मां भजेद्विद्वानप्रमत्तो जितेन्द्रियः । रजस्तमश्चाभिजयेत्सत्त्वसंसेवया मुनिः ॥ ३४ ॥
सत्त्वं चाभिजयेद्युक्तो नैरपेक्ष्येण शांतधीः ।

करूनि विषयांची विरक्ती । हृदयीं नापेक्षावी मुक्ती । ऐशी निरपेक्ष माझी भक्ती । वाढत्या प्रीती करावी ॥ २६ ॥ तेणें अनिवार सत्वशुद्धी । सर्व भूतीं भगवद्‌बुद्धी । दृढ वाढे गा त्रिशुद्धी । हे भजनसिद्धी साधकां ॥ २७ ॥ ऐसें करितां माझें भजन । विस्मरणासी ये मरण । सर्वेंद्रियीं सावधपण । सहजें जाण ठसावे ॥ २८ ॥ तेव्हां रज तम दोनी गुण । निःशेष जाती हारपोन । शुद्धसत्वाचें स्फुरण । तेणें स्वानंद पूर्ण साधकां ॥ २९ ॥ केवळ उरल्या सत्वगुण । साधका ऐसें स्फुरे स्फुरण । जगामाजीं एक पावन । धन्य धन्य मी होयें ॥ ४३० ॥ मी पावलों शुद्ध बोध । मज प्रकटला परमानंद । ऐसा सुखाचा जो स्फुंद । तो सत्वबोध साधकां ॥ ३१ ॥ ऐसा उरला जो सत्वगुण । तो निवारावया साधन कोण । मी स्वयें सुखस्वरूप आपण । मज सुखाचें स्फुरण ते माया ॥ ३२ ॥ गूळ गुळा गोडपणें पांगे । कीं दुधा दूध गोड लागे । तैसा सुखरूप मी सर्वांगें । वृथा सुखभोगें कां फुंजे ॥ ३३ ॥ ऐशी साधकीं स्फूर्ति स्फुरे । तंव सत्वगुण स्वरूपीं विरे । तेव्हां सुखाचाही फुंद सरे । निज-सुख उरे निजशांती ॥ ३४ ॥ ऐसे निवारल्या तिनी गुण । केवळ उरे निर्गुण । तेंचि अर्थीचें निरूपण । विशद श्रीकृष्ण सांगत ॥ ३५ ॥

संपद्यते गुणैर्मुक्तो जीवो जीवं विहाय माम् ॥ ३५ ॥ जीवो जीवविनिर्मुक्तो गुणैश्चाशयसम्भवैः ।
मयैव ब्रह्मणा पूर्णो न बहिर्नान्तरश्चरेत् ॥ ३६ ॥

—आतां पुढील दीड श्लोकांनीं भजनाचा प्रकार सांगतात—

विद्वान् निःसङ्गः अप्रमत्तः जितेंद्रियः मां भजेत्—विद्वानानें निःसंग, सावधान व जितेंद्रिय होऊन माझें भजन करावें. मुनिः सत्त्वसंसेवया रजः तमः च अभिजयेत्—पूर्वोक्त प्रकारें मुनीनें सर्व सात्त्विक पदार्थांच्या सेवनानें रज व तम यांना जिंकावें. शान्तधीः युक्तः नैरपेक्ष्येण सत्त्वं च अभिजयेत्—व शांतचित्त आणि समाहित होऊन उपशमात्मक सत्त्वानेंच सत्त्वालाहि जिंकावें. ३४.

विषयांविषयीं विरक्त होऊन, अंतःकरणांत मुक्तीची अपेक्षा न ठेवितां वाढत्या प्रीतीनें माझी निरपेक्ष भक्ति करावी. २६ त्याच्या योगें अत्यंत सत्त्वशुद्धि होऊन सर्व भूतांविषयीं भगवद्‌बुद्धि दृढ होते. हीच साधकाची भजन-सिद्धि आहे. २७ अशाप्रकारें माझें भजन केलें असतां विस्मरणालाच मरण येतें आणि सर्वेंद्रियांमध्यें सावधपणा सहज ठसतो.. २८ त्या वेळीं रज व तम हे दोन्ही गुण सहच नाहींसे होतात. शुद्ध सत्त्वाच्या स्फूर्तीनें साधकाला पूर्ण स्वानंद प्राप्त होतो. २९ केवल एक सत्त्वगुण उरला म्हणजे साधकाला असें स्फुरण होतें कीं, जगामध्यें मीच काय तो एक पावन आहें. मी धन्य धन्य होय. ४३० मला शुद्ध आत्मज्ञान प्राप्त झालें. माझ्या हृदयांत परम आनंद प्रकट झाला आहे. अशा सुखाचा ओलावा केवल आत्मज्ञान झालेल्या सात्त्विकांमध्येंच असतो ३१ असा जो सत्त्वगुण उरतो, त्याचें निवारण कोणत्या साधनानें करावें ! मी स्वतः तर सुखस्वरूप आहे. तेव्हां मला सुखाची स्फूर्ति होणें ही माया आहे. ३२ गुळाची गोडी गुळानें वाढते थोडीच ! किंवा दुधालाच दूध रुचकर लागतें का ! त्याप्रमाणें मी स्वतःच सर्वांगानें सुखस्वरूप असतां सुखाच्या भोगानें व्यर्थ कां फुगतों ! ३३ अशी साधकाला स्फूर्ति झाली म्हणजे सत्त्वगुण आत्मस्वरूपांत विरून जातो. तेव्हां सुखाचा गर्वेहि नाहींसा होतो. आत्मशांतीचेंच सुख उरतें. याप्रमाणें तीन्ही गुणांचें निवारण केल्यावर निर्गुण शिल्लक रहातें. श्रीकृष्ण आतां त्याविषयींचें निरूपण स्पष्ट करून सांगत आहे. ४३५.

—असें केलें असतां तो मला प्राप्त होतो असें सांगतात—

गुणैः मुक्तः जीवः जीवं विहाय मां संपद्यते—या त्रिगुणांपासून मुक्त झालेला जीव जीवत्वाचें कारण असें जें लिंग-शरीर त्याला सोडून मला प्राप्त होतो. ३५. (मला प्राप्त झालेल्या पुरुषाला पुनः संसार नाहीं असें आतां सांगतात—) जीवविनिर्मुक्तः आशयसंभवैः गुणैः च विनिर्मुक्तः जीवः मया एव ब्रह्मणा पूर्णः न बहिः न आन्तरः चरेत्—लिंगशरीरापासून व चित्तजन्यगुणांपासून सर्वथा मुक्त झालेला जीव मज ब्रह्मरूपानें परिपूर्ण होतो; मग त्यानें बाह्य विषयभोगानें व मनांतील विषयचिंतनानें स्वरूपस्थितीपासून च्युत होऊं नये. ३६.

वाढल्या सत्वगुणाचा हरिख । त्यातें निर्दळी शुद्ध सत्वविवेक । पाठी विवेकेंसीं सत्व देख । हारपे निःशेख निजात्मरूपीं ॥ ३६ ॥ ऐसे निमाल्या तिनी गुण । निमे कार्य कर्म कारण । लिंगदेह नाशे संपूर्ण । जीवासी जीवपण मिथ्या होय ॥ ३७ ॥ तेव्हां कार्य कर्म कर्ता । भोग्य भोग आणि भोक्ता । ज्ञान ज्ञेय मी एक ज्ञाता । याचि वार्ता असेना ॥ ३८ ॥ ऐसें हारपल्या जीवपण । स्वयें सहजें निज-निर्गुण । होऊनि ठाके ब्रह्म पूर्ण । अहंसोऽहंपण सांडूनी ॥ ३९ ॥ यापरी मद्भक्त जाण । ब्रह्म होती परिपूर्ण । तेंचि जाहलेपणाचें लक्षण । श्लोकार्धें श्रीकृष्ण सांगत ॥ ४४० ॥

प्रपंच एक पूर्वी होता । हे समूळ मिथ्या वार्ता । पुढें होईल मागुता । हेंही सर्वथा असेना ॥ ४१ ॥ जैसे आंत बाहेरी भाग । नेणे साखरेचें अंग । तैसें सबाह्याभ्यंतर चांग । ब्रह्म निर्व्यंग निजानंदें ॥ ४२ ॥ ऐसें पावल्या ब्रह्म परिपूर्ण । साधकासी न ये मरण । प्रारब्धें देहीं उरल्या जाण । देहाभिमान बाधीना ॥ ४३ ॥ बाह्य न देखे दृश्यदर्शन । अंतरीं नाहीं विषयस्फुरण । देहींचें न देखे देहपण । जीवन्मुक्तलक्षण या नांव ॥ ४४ ॥ बाह्य देखे दृश्यप्रतीती । अंतरीं विषयांची आसक्ती । या नांव अज्ञानाची स्थिती । अविद्याशक्ती बाधक ॥ ४५ ॥ तें निरसावया अविद्याबंधन । अवश्य करावें माझें भजन । हें जाणोनि साधुसज्जन । भक्तीसीं प्राण विकिला ॥ ४६ ॥ माझिये भक्तीपरती । आणिक नाहीं उत्तम गती । तेंही भजन अभेदयुक्तीं । तैं चारीं मुक्ती कामान्या ॥ ४७ ॥ हृदयीं विषयाची विरक्ती । वरी अभेदभावें माझी भक्ती । तें भजन अनन्य प्रीतीं । त्याचा मी श्रीपति आज्ञा-धार ॥ ४८ ॥ भक्तिनामाचा इत्यर्थ । माझे स्वरूपीं निजभावार्थ । येणेंचि लाभे परमार्थ । सुफळ शास्त्रार्थ या नांव ॥ ४९ ॥ माझिये भक्तीचेनि नांवें । पशु पक्षी उद्धरावे । मा मानवी भजनभावें । म्यां अवश्य न्यावे निजधामा ॥ ४५० ॥ यालागीं सांडोनि व्युत्पत्ती । जाणतीं नेणतीं गा

शुद्ध सत्त्वविवेक वाढलेल्या सत्त्वगुणाच्या हर्षाचा नाश करितो आणि नंतर विवेकासह सत्त्व निर्गुणामध्यें पूर्णपणें लीन होतें. ३६ जशाप्रकारें तीन्हीं गुण नाहीसे झाले म्हणजे कार्य, कर्म आणि कारण यांच्यासह लिंगदेहाचाहि नाश होऊन जीवाचा जीवपणा मिथ्या होतो. ३७ त्यावेळीं कार्य-कर्म-कर्ता; भोग्य-भोग-भोक्ता, ज्ञान-ज्ञेय; मीच काय तो एक ज्ञाता, या त्रिपुटींची वार्ताहि उरत नाहीं. ३८ अशा रीतीनें जीवपणा नाहींसा झाल्यावर निर्गुण स्वतःच 'अहं सोहं-' पणा टाकून पूर्ण ब्रह्म होऊन रहातें. ३९ अशाप्रकारें माझे भक्त परिपूर्ण ब्रह्म होतात. तेंच पूर्ण ब्रह्म होण्याचें लक्षण पुढील अर्ध्या श्लोकांत श्रीकृष्ण सांगत आहे. ४४०.

अगोदर 'एक प्रपंच आहे,' ही गोष्टच जर पूर्णपणें मिथ्या आहे, तर 'तो होईल' ही गोष्टहि खरी नव्हे. ४१ साखरेच्या स्वरूपांत जसें आंत-बाहेर कांहीं नसतें, ती जशी सर्वांगानें गोड असते, त्याप्रमाणें ब्रह्म अंतर्बाह्य-दोषरहित निजानंदानें परिपूर्ण असतें. ४२ अशा परिपूर्ण ब्रह्माला प्राप्त झालें असतां साधकाला मरण येत नाहीं. प्रारब्धवशात् आयुष्य शिल्लक असलें, तरी त्याला देहाभिमान बाधत नाहीं. ४३ तो बाहेरचें दृश्य पहात नाहीं, त्याच्या अंतःकरणांत विषयांची स्फूर्ति होत नाहीं. तो देहाचा देहपणाहि पहात नाहीं. यालाच जीवन्मुक्तीचें लक्षण म्हणतात. ४४ बाहेरच्या दृश्य पदार्थाचा अनुभव घेणें, मनांत विषयांची आसक्ति ठेवणें, यालाच अज्ञानाची स्थिति म्हणतात. ही अविद्येची शक्ति बाधक आहे. ४५ तें अविद्याबंधन नाहींसें करण्यासाठीं माझें भजन अवश्य करावें, हें जाणून संत-सज्जन भक्तीला आपले प्राण विकितात. ४६ माझ्या भक्तीवांचून दुसरी उत्तम गति नाहीं. तेंहि भजन अभेद-भावानें केलें असतां चारी मुक्ति दासी होतात. ४७ अंतःकरणांत विषयविरक्ति, त्यांत माझी अभेदभावानें भक्ति आणि तेंहि अनन्य प्रीतीनें माझें भजन अशा स्थितींत मी श्रीहरि भक्तांचा आज्ञाधारक होऊन रहातों. भगवत्स्वरूपांत अभि-न्नपणानें रहाणें हेंच भक्तीचें लक्षण आहे. त्यायोगें परमार्थाचा लाभ होतो. यालाच 'शास्त्रार्थ सफल होणे' असें म्हणतात. माझ्या भक्तीच्या योगानें पशु, पक्षी जर उद्धरून जातात, तर मग मनुष्यांनीं माझी भक्ति केली असतां त्यांस मला निजधामाला नेणें अवश्य आहे. ४५० यास्तव विद्वत्ता, शब्दशास्त्र हीं सर्व बाजूला सारून तज्ज्ञ आणि

समस्तीं । भावें करावी भगवद्भक्ती । तैं निजात्मप्राप्ती अनायासें ॥ ५१ ॥ भावें करितां माझें भजन । स्वयें निर्दळती तिन्ही गुण । सहजें प्रकटे निजनिर्गुण । हें सत्य जाण श्रीकृष्ण बोलिला ॥ ५२ ॥ जेथ उगवली गुणगुंती । तेथ प्रकटे निजशांती । हेंचि ये अध्यायीं श्रीपती । उद्धवाप्रती बोलिला ॥ ५३ ॥ यालागीं जेथ भगवद्भक्ती । तेथ गुणजयो लाभे वृत्ती । सहजें प्रकटे निजशांती । निजात्मप्राप्ती स्वतःसिद्ध ॥ ५४ ॥ ते निजभक्ति माझी जननी । ज्या पैठा केलों जनार्दनीं । एका जनार्दनचरणीं । मिळोनि मिळणी भजतचि ॥ ५५ ॥ पुढिले अध्यायीं कथा गहन । ऐलउर्वशीउपाख्यान । ज्या अध्यायाचें करितां पठण । अगम्यागमनदोष हरती ॥ ५६ ॥ ज्या पुरूरव्याची विरक्ती । स्वमुखें वर्णील श्रीपती । वैराग्यें निजात्मप्राप्ती । सभाग्य पावती वैराग्य ॥ ५७ ॥ त्या वैराग्याचें निरूपण । अतिगोड निरूपी श्रीकृष्ण । श्रोतां कृपा करावी पूर्ण । द्यावें अवधान कथेसी ॥ ५८ ॥ जे कथेचेनि अवधानें । दुरितदोष होती दहनें । ब्रह्मीं ब्रह्मत्व पावणें । होऊनि ठाकणें चिन्मात्र ॥ ५९ ॥ एकल्या निरूपणाची गोडी । पुढिले अध्यायीं आहे फुडी । एका जनार्दनकृपा गाढी । परापरथडीप्रापक ॥ ४६० ॥ भावें धरितां जनार्दनचरण । बाधूं न शके बाधकपण । एका जनार्दना शरण । रसाळ निरूपण पुढें आहे ॥ ४६१ ॥ इति श्रीभागवते महापुराणे एकादशस्कंधे श्रीकृष्णोद्धवसंवादे गुणनिर्गुणनिरूपणं नाम पंचविंशोऽध्यायः ॥ २५ ॥ ॥ श्रीकृष्णार्पणमस्तु ॥

इति श्रीमद्भागवते महापुराणे एकादशस्कन्धे श्रीकृष्णोद्धवसंवादे पंचविंशोऽध्यायः ॥ २५ ॥

अज्ञ लोकांनीं भक्तिभावानें माझें भजन केलें असतां त्यांस अनायासें आत्मप्राप्ति होते. ५१ श्रद्धेनें माझें भजन केलें असतां तीन्ही गुण आपोआप नाहींसे होतात आणि आत्मशांति सहज प्रकट होते, हें अगदीं सत्य समजावें असें श्रीकृष्णानें सांगितलें. ५२ जेथें त्रिगुणाची गुंत उकलते तेथेंच आत्मशांति प्रकट होते. हेंच या अध्यायांत श्रीपतीनें उद्धवाला सांगितलें. ५३ यास्तव जेथें भगवद्भक्ति असते, तेथेंच गुणांवर जय मिळविण्याची वृत्ति उद्भवते; मग सहजच आत्मशांति प्रकट होते आणि स्वभावसिद्ध आत्मप्राप्ति लाभते. ५४ ती आत्मभक्ति माझी माताच आहे आणि जनार्दन स्वामींनीं मला तिच्याजवळ नेऊन पोंचविल्यामुळें मी जनार्दनचरणांचें भजन करीत असतांच तिच्यामध्यें लीन झालों. ५५ आतां याच्या पुढल्या अध्यायांत ऐल-उर्वशीच्या उपाख्यानाची गूढ कथा आहे. त्या अध्यायाचें पठण केलें असतां परस्त्रीगमनादिकांसारखे दोष नाहींसे होतात. ५७ ज्या पुरूरव्याच्या विरक्तीचें वर्णन श्रीहरि स्वतः आपल्या मुखानें सांगणार आहे, त्या वैराग्यानें आत्मप्राप्ति होते. ५८ भाग्यवानालाच तें वैराग्य लाभतें. त्या वैराग्याचें रसाळ निरूपण श्रीकृष्ण करणार आहे. तरी श्रोत्यांनीं पूर्ण कृपा करून कथेकडे लक्ष द्यावें. ५९ या कथाश्रवणानें पातकादि दोष जळून भस्म होतात. ब्रह्मामध्यें ब्रह्मत्व पावून साधक ब्रह्मस्वरूप होऊन रहातो. पुढल्या अध्यायांत निरूपणाची अशी उत्कृष्ट गोडी आहे. मायेच्या परतीराला पोंचविणारी जनार्दनाची गाढ कृपा आहे. ४६० भक्तिभावानें ज्या जनार्दनाचे चरण धरितांच प्रपंचबाधा बाधत नाहीं, त्या जनार्दनाला एकनाथ शरण आहे. पुढील निरूपण रसाळ आहे ४६१.

इति श्रीमद्भागवतपुराणांतील एकादशस्कंधाचा परमहंससंहितेमधला श्रीधर-एकनाथविरचित

टीकानुसार विष्णुशर्मकृत सान्वयार्थ-भावार्थासह श्रीकृष्ण-उद्धव-संवादांतील

गुण-निर्गुणनिरूपण नांवाचा पंचविसावा अध्याय समाप्त झाला.